भारतीय मुसलमानांचे राजकारण

मे. पुं. रेगे

भारतीय मुस्लिमांच्या स्वातंत्र्यपूर्व राजकारणाची तीन स्वाभाविक कालखंडांत विभागणी होते. पहिला कालखंड म्हणजे १८५७ च्या बंडाच्या समाप्तीपासून ते डिसेंबर ३१, १९०६ रोजी झालेल्या मुस्लिम लीगच्या स्थापनेपर्यंतचा कालखंड. दुसऱ्या कालखंडाची अखेर आपल्या तीन वर्षांच्या इंग्लंडमधील विजनवासाची समाप्ती करून महंमदअली जीना मुस्लिम राजकारणाची सूत्रे परत हाती घेण्याच्या इराद्याने डिसेंबर १९३३ मध्ये भारतात परततात तेव्हा होते. तिसरा आणि अखेरचा कालखंड १९४७ मध्ये भारताची फाळणी होऊन पाकिस्तानची स्थापना होण्याने संपुष्टात येतो. महंमदअली जीना हे दुसऱ्या कालखंडात एक महत्त्वाचे मुस्लिम नेते होते आणि तिसऱ्या कालखंडात भारतीय मुस्लिम राजकारणाचे एकमेव सूत्रधार हे स्थान त्यांनी स्वतःसाठी प्राप्त करून घेतले होते.

पहिल्या कालखंडाचे अध्वर्यूपण सर सय्यद अहमदखान ह्यांच्याकडे होते ह्यात शंका नाही. प्लासीच्या लढाईनंतरचा काळ हा मोगल सत्तेच्या विघटनाचा आणि ब्रिटिश सत्तेच्या विस्ताराचा व दृढीकरणाचा काळ होता. सत्ता, अधिकारस्थाने, प्रतिष्ठा, संपत्ती आपल्या हातून निसटत आहेत ह्याचा तीव्र असंतोष मुसलमानांतील वरिष्ठ वर्गात होताच; पण ब्रिटिशांच्या आक्रमणापुढे आपण हतबल आहोत ही विषण्ण आणि नाउमेद करणारी जाणीवही त्याच्यात दृढमूल होत होती. गतवैभवाच्या, अनेकदा काल्पनिक असलेल्या स्मृतीत मश्गूल होऊन प्राप्त परिस्थितीचा विसर पाडून घेणे ही ह्या स्थितीला स्वाभाविक असलेली प्रतिक्रिया होती. आपण जिचे सत्तेपासून उच्चाटन केले त्या मुसलमान जमातीबद्दल ब्रिटिश सत्ताधीशांच्या मनात अविश्वास आणि संशय होताच. १७५८ मध्ये लिहिलेल्या एका पत्रात रॉबर्ट क्लाइव्ह म्हणतात, "हे मुसलमान, त्यांच्यात कृतज्ञतेची भावना यत्किंचितही नसते, ही अत्यंत कोत्या विचारांची अधम माणसे आहेत. राजकारणाच्या ज्या एका पद्धतीचा स्वीकार त्यांनी केला आहे ते ह्या देशाचे एक अनन्यसाधारण वैशिष्टच आहे– ही पद्धत म्हणजे आपल्याला जे साधायचे असेल ते बळाचा वापर करून न साधता विश्वासघाताने साधायचे."[१] नवीन ब्रिटिश सत्ताधाऱ्यांची पदच्युत मुस्लिम राज्यकर्त्यांविषयीची मनोवृत्ती पुढील वाक्यांतून चांगल्या प्रकारे व्यक्त होते. १८५७ च्या बंडाचा उद्रेक होण्यापूर्वीच्या नजीकच्या काळात प्लासीच्या लढाईच्या शतसांवत्सरीच्या निमित्ताने लिहिण्यात आलेल्या 'फ्रेंड ऑफ् इन्डिया' ह्या वर्तमानपत्राच्या संपादकीयातून ती उद्धृत करण्यात आली आहेत. "क्रूर, विषयासक्त, असहिष्णू असलेले हे (मुसलमान), त्यांच्यात राज्य करण्याची कुवत नाही आणि सेवा करण्याची इच्छा नाही... आम्ही ज्या चांगल्या गोष्टी त्यांना देऊ शकू, त्या ते कधी सहन करणार नाहीत आणि आमच्या वर्चस्वाबद्दल आम्हाला क्षमा करणार नाहीत."

१८५७ च्या बंडात इतर जमातींपेक्षा मुसलमानांचा सहभाग अधिक होता असे म्हणता येत नाही. तरी ह्या उद्रेकामागे मुसलमानांची प्रेरणा प्रामुख्याने होती असा संशय ब्रिटिशांना होता. बंड दडपून टाकण्यात आल्यानंतर लगेच 'टाइम्स' मध्ये प्रसिद्ध केलेल्या एका लेखात त्या पत्राचा भारतातील बातमीदार रसेल म्हणतो, "महंमदाच्या अनुयायांशी असलेले आमचे वितुष्ट शिव आणि विष्णू यांच्या उपासकांशी असलेल्या वितुष्टापेक्षा अधिक तीव्र आहे. आमच्या सत्तेला त्यांच्यापासून निःसंशय अधिक धोका आहे... एक जोमदार प्रयत्न करून महंमदाच्या परंपरेचा उच्छेद जर आपण करू शकलो आणि त्याची प्रार्थनास्थाने नष्ट करू शकलो तर ते ख्रिस्ती मताच्या प्रसारासाठी आणि ब्रिटिश सत्तेसाठी निश्चितपणे हितकर ठरेल."[२]

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष

एकंदरीत मुसलमानांनी ब्रिटिश राज्यकर्त्यांचा विश्वास गमावला होता. सरकारी नोकऱ्यांत त्यांना फारसे स्थान नव्हते आणि एकंदरीत राज्यकर्त्यांकडून त्यांना तुच्छतेची आणि उपेक्षेची वागणूक मिळत होती. उलट, हिंदूंविषयी सत्ताधाऱ्यांची वृत्ती औदार्याची होती. शासकीय सेवांमधील कनिष्ठ स्थानांवर त्यांच्या भराभर नेमणुका होत होत्या. हिंदू नोकरही आपल्या ब्रिटिश वरिष्ठांशी सर्वतोपरी सहकार्य करीत होते. ब्रिटिश सत्तेला त्यांनी आपली निष्ठा वाहिली होती.

ब्रिटिश राज्यकर्त्यांच्या मनात मुसलमानांविषयी ही जी अविश्वासाची आणि वितुष्टाची भावना होती तिला मुसलमानांकडून मिळणारा प्रतिसाद त्याच स्वरूपाचा होता. तेही ब्रिटिशांपासून फटकून वागत होते. सार्वजनिक हितासाठी म्हणून ब्रिटिशांनी टाकलेल्या प्रत्येक पाऊलात त्यांना आपल्याला आपल्या धर्मापासून भ्रष्ट करण्याचा डाव दिसत होता. पण त्याबरोबरच आपली दशा अत्यंत अवनत झाली आहे आणि तिच्यातून बाहेर पडायचा काही मार्ग नाही, हा इतिहासाचा नेम आहे अशी एक खोल निराशेची वृत्ती त्यांच्यात पसरली होती. त्यांचे नीतिधैर्य गळले होते. ब्रिटिश शासकीय सेवांच्या विस्तारामुळे उपलब्ध होणाऱ्या प्रत्येक संधीचा हिंदू उत्साहाने लाभ उठवीत होते तर मुसलमान त्या सर्वांपासून पूर्णपणे अलिप्त राहत होते.

ह्या कोंडीतून वाट काढण्याचा पहिला प्रयत्न सर सय्यद अहमदखान ह्यांनी केला. 'धि लॉयल मुहामेडन्स ऑफ् इन्डिया " – " भारताचे राजनिष्ठ मुसलमान " – ह्या १८६० मध्ये प्रसिद्ध केलेल्या एका उर्दू पुस्तिकेद्वारा मुसलमानांविषयीच्या ब्रिटिश मनोवृत्तीत बदल घडवून आणण्याचा प्रयत्न त्यांनी केला. बंडाविषयी अधिकाधिक माहिती बाहेर येईल तेव्हा एकंदरीत मुसलमान जमात ब्रिटिश सत्तेशी एकनिष्ठ राहिली होती हे स्पष्ट होईल असा विश्वास, अनेक उदाहरणे देऊन, ह्या पुस्तिकेत त्यांनी व्यक्त केला होता. "... भारतात जर कुठली एक जमात अशी असेल की तिच्या धर्माची तत्त्वे, सवयी, कल्पना, वृत्तिसाम्य ह्यांच्या बळावर ख्रिस्ती जमातीवर भयानक संकट कोसळलेल्या वेळी, ती ह्या जमातीशी मैत्री आणि सख्य ह्यांच्या धाग्यांनी बांधलेली राहील तर ती मुसलमान ही एकमेव जमात होय. " हे 'अनावृत सत्य' हळूहळू प्रकट होत जाईल अशी त्यांची खात्री होती.

मुसलमान जमात ब्रिटिश अमलापासून दुरावलेली आहे, ह्या अमलाने भारतीयांना उपलब्ध करून दिलेल्या शासकीय अधिकाराच्या व सन्मानाच्या पदांमध्ये मुसलमानांचा वाटा नगण्य आहे, ह्या बाबतीत हिंदू आणि मुसलमान ह्या दोन जमातींची तुलना केली तर हिंदूंकडे ह्या पदांचा भरघोस हिस्सा गेलेला आहे आणि मुसलमानांकडे, त्यांच्या संख्येच्या मानाने, अत्यल्प हिस्सा आहे आणि ही दरी निरुंद होण्याची चिन्हे नाहीत ह्या वस्तुस्थितीकडे ब्रिटिश धुरीण यांचेही लक्ष गेले होते. मुसलमानांसारखी एक मोठी आणि महत्त्वाची जमात राजवटीपासून अलिप्त, स्वतःत कुढत, धुमसत राहिली तर ती धोकादायक परिस्थिती ठरेल ह्याचे भान त्यांना होते. शासकीय सेवांमधील पदे हा ह्या प्रश्नाचा एक पैलू होता. ह्या पदांसाठी आणि आधुनिक व्यवसायांसाठी आवश्यक असलेली पात्रता कमावण्याचे साधन पाश्चात्त्य शिक्षण हे होते. आणि ह्या शिक्षणाविषयी मुसलमानात असलेली अनास्था, किंबहुना तिटकारा हा त्याचा दुसरा पैलू होता. सर विल्यम हंटर ह्यांनी १८७१ मध्ये प्रसिद्ध केलेल्या आपल्या ग्रंथात " इन्डियन मुसलमान्स : आर् दे बाउण्ड इन् कॉन्शन्स टु राइज अगेन्स्ट ध क्वीन ?" –" भारतीय मुसलमान : आपल्या (धार्मिक) श्रद्धेमुळे राणीविरुद्ध उठाव करायला ते बांधलेले आहेत का ?"–तपशीलवार आकडेवारी देऊन ह्या समस्येकडे लक्ष वेधले. मेयो, लिटन, रिपन, डफरिन इ. व्हाइसरॉयांनी ह्या समस्येच्या संदर्भात मुसलमानांविषयी सहानुभूतीचे धोरण स्वीकारले. पण मुसलमानांना शासकीय सेवांमध्ये अधिक प्रवेश देण्यात जी खरी अडचण होती तिचे स्वरूपही ब्रिटिश सरकारने दाखवून दिले.

जुलै १५, १८८५ रोजी ह्या संबंधात केलेल्या एका ठरावात भारतसरकारने परिस्थितीचे सर्वांगीण समालोचन करून पुढील निष्कर्ष स्वीकारला होता. "...भूतकाळात मुसलमान जमातीची प्रगती होण्यातील प्रमुख अडचण म्हणजे सरकारी शिक्षण-

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

व्यवस्थेचा पूर्ण लाभ उठविण्याची त्यांची असमर्थता किंवा अनिच्छा ही होय...म्हणून सार्वजनिक सेवांमध्ये इतर जमातींच्या तुलनेने मुसलमानांचे प्रमाण कमी असले तर, सरकारच्या मते, त्याचा दोष सरकार किंवा सरकारी अधिकारी ह्यांच्या कृत्यांकडे लक्षणीय प्रमाणात येतो असे मानता येणार नाही." उलट, कित्येक प्रांतांत मुसलमानांवर विशेष मेहेरबानी करण्यात येत होती असे नमूद करून ठरावात पुढे असे म्हटले आहे की, खुल्या स्पर्धेने ज्यांच्यावर भरती करण्यात येते अशा पदांच्या बाबतीत मुसलमानांना पक्षपाती वागणूक देणे अनिष्ट तर आहेच पण मुसलमानांच्या प्रगतीच्या दृष्टीनेही ते अपायकारक ठरेल. तथापि स्थानिक सरकारच्या मुखत्यारीत असणाऱ्या जागांवर मुसलमानांची अधिक प्रमाणात नेमणूक करून सध्याच्या विषम परिस्थितीत सुधारणा घडवून आणायला स्थानिक अधिकाऱ्यांना उत्तेजन देण्यात येईल हे धोरणही ठरावाच्या अखेरीस स्वीकारण्यात आले होते.

मुसलमानांनी बदललेल्या काळाला अनुसरून आपल्या सामाजिक सवयी बदलल्या पाहिजेत, आणि इंग्रजी शिक्षण आत्मसात केले पाहिजे ह्यातच त्यांचा तरणोपाय आहे ही जाणीव मुसलमान पुढाऱ्यांत हळूहळू पसरू लागली होती. ह्या मार्गाचा अवलंब करण्यात मुख्य अडसर मुस्लिम धर्मपंडितांच्या –उलेमांच्या–शिकवणुकीचा होता. ब्रिटिशांकडून येणाऱ्या कल्पना आणि संस्था ह्यांच्याविरुद्ध उलेमांनी एक प्रकारचे जिहाद–धर्मयुद्ध–पुकारले होते. वहाबीसारख्या अधिक सनातनी आणि परंपरानिष्ठ पंथाने तर ब्रिटिश अमलाखालील भारत हा दार्–उल्–हर्ब आहे, म्हणजे युद्धदेश आहे आणि म्हणून भारतीय मुसलमानांनी देशत्याग करून मुस्लिम देशात वसतीला जावे ह्या मताचा प्रचार चालविला होता. अशिक्षित मुस्लिम बहुजनसमाजावर तर उलेमांचा प्रभाव होताच पण उच्चवर्गीय मुसलमानांवरही त्यांचा पगडा होता. उदा., अकबर अलाहाबादी ह्या उर्दू कवीने उलेमांच्या मतांचा अनुवाद करून ब्रिटिशांच्या प्रभावामुळे मुसलमानांमध्ये ज्या नवीन प्रवृत्ती आणि पद्धती सुरू होत होत्या त्यांची सुरेख टिंगल उडविली आहे.

पण ह्या विरोधाला न जुमानता देशात निर्माण झालेल्या नवीन शक्तींचा प्रभाव मुसलमानांवर पडू लागला होता. ब्रिटिश सरकार इंग्रजी शिक्षणाला उत्तेजन देत होते आणि त्याचा लाभ घेऊन हिंदू, शीख आणि पारसी ह्या जमाती आपली भौतिक प्रगती करून घेत आहेत हे मुसलमानांना दिसत होते. जुन्या पद्धती आणि सवयी ह्यांना चिकटून राहिल्याने काहीच साधत नाही हा धडा त्यांना प्रत्यही मिळत होता. इस्लामी धर्मशास्त्रातील सिद्धांत आणि इस्लामच्या इतिहासातील दाखले यांचा आधार घेऊन शिब्ली ह्यांच्यासारखे धर्मपंडितही सनातनी उलेमांच्या मतांचा प्रतिवाद करीत होते. इस्लामने नेहमीच बदलत्या परिस्थितीशी जुळवून घेतलेले आहे, इतर समाजातील इष्ट आणि उपयुक्त चालीरीतींचे अनुकरण केले आहे आणि प्राप्त परिस्थितीत इंग्रजांचे अनुकरण करण्यात काहीच गैर नाही ह्या मताचा शिब्ली ह्यांनी जोमदारपणे आणि समर्थपणे पुरस्कार केला. मौलवी करामत अली ह्या जौनपूरच्या धर्मपंडिताने ब्रिटिश अमलाखालील भारत दार्–उल्–हर्ब नसून दार्–उल्–आमन (शांति–देश) आहे कारण ब्रिटिश राजवट मुसलमान धर्मात ढवळाढवळ करीत नाही, शुक्रवारच्या प्रार्थना निर्विघ्नपणे पार पडतात, ह्या परिस्थितीत ब्रिटिश राजवटीविरुद्ध जिहाद पुकारायला इस्लाममध्ये मुभा नाही ह्या भूमिकेचे प्रतिपादन केले. एकंदरीत ब्रिटिश सत्तेशी भारतीय मुसलमानांनी जुळवून घेतले पाहिजे हे मत हळूहळू जोम धरू लागले.

ह्या सर्व घटकांचा प्रभाव म्हणून मुस्लिम उच्चवर्गीयांत इंग्रजी शिक्षणाचा हळूहळू प्रसार होऊ लागला. ह्याचे एक फळ म्हणजे १८६५ मध्ये कलकत्ता येथे स्थापन झालेली 'धि मुहामेडन लिटररी सोसायटी' ही संस्था. 'मुसलमानांमधील उच्च आणि सुशिक्षित वर्गांमध्ये' पाश्चात्त्य साहित्य, विज्ञान आणि सामाजिक विचार ह्या विषयांसंबंधी आस्था निर्माण करून त्यांच्याविषयीची माहिती त्यांना करून देणे हे ह्या संस्थेचे उद्दिष्ट होते. राजकीय बाबतीत मात्र ही संस्था पूर्णपणे राजनिष्ठ होती. बंगालचे लेफ्टनन्ट-गव्हर्नर संस्थेचे आश्रयदाते होते. सरकारी धोरणांवर यत्किंचितही टीका करायला ती मुभा देत

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष

नसे. अशीच दुसरी एक संस्था म्हणजे सय्यद अहमदखान (हे पुढे 'सर' झाले) ह्यांनी १८६४ मध्ये घाझीपूर येथे स्थापन केलेली 'ट्रान्स्लेशन सोसायटी' – 'भाषांतर संस्था' –. हिचे पुढे अलिगड येथे स्थलांतर झाले आणि 'सायन्टिफिक सोसायटी' – 'वैज्ञानिक संस्था' – असे नामांतरही झाले. ह्या संस्थेच्या कार्याचा भर पाश्चात्त्य राज्यशास्त्रीय आणि अर्थशास्त्रीय विचारांची आणि व्यवहाराचे ज्ञान एतद्देशीय मुसलमानांना करून देण्यावर होता. ह्यामुळे ब्रिटिश सत्ताधाऱ्यांची धोरणे, त्यांनी घालून दिलेली शासकीय कार्यपद्धती ह्यांचे त्यांना ज्ञान होऊन राज्यकर्ते आणि मुसलमान प्रजा ह्यांच्यामधील सामंजस्य वाढेल अशी कल्पना होती. १८६६ मध्ये सय्यद अहमदखान ह्यांनी 'ब्रिटिश इन्डियन असोसिएशन' ही संघटना स्थापन केली. भारतीय प्रजेच्या गरजा आणि इच्छा ह्यांचे ब्रिटिश पार्लमेन्टला ज्ञान करून देणे आणि त्यायोगे पार्लमेन्टच्या सदस्यांची भारताविषयीची आस्था वाढवणे हे ह्या संघटनेचे उद्दिष्ट होते. पण सय्यद अहमदखान ह्यांच्या ह्या सर्व प्रयत्नांचेही 'राजनिष्ठा' आणि 'सत्ताधाऱ्यांवर विश्वास' हेच अधिष्ठान होते. भारतीय मुसलमानांमध्ये इंग्रजी शिक्षणाचा प्रसार करणे हेच त्यांनी आपले जीवितकार्य मानले होते आणि इतर सर्व उपक्रम त्यांच्या दृष्टीने गौण होते.

मध्यंतरात 'हिंदू' बाजूला ज्या घडामोडी झाल्या होत्या त्या ध्यानी घेणे आवश्यक आहे. राजा द्वारकानाथ टागोर ह्यांनी १८३३ मध्ये 'लँडहोल्डर्स असोसिएशन' – जमीनदार सभा – स्थापन केली. (भारतीय) ब्रिटिश सरकार आणि जमीनदार ह्यांच्यात परस्परसामंजस्याचे संबंध प्रस्थापित करणे हे ह्या संघटनेचे उद्दिष्ट होते. काही वर्षांतच तिने सरकारात आणि लोकांत स्वतःसाठी प्रतिष्ठेचे स्थान प्राप्त करून घेतले. भारतातील सनदशीर चळवळीचा पाया ह्या संघटनेने घातला, असे म्हणणे योग्य ठरेल. १८५१ मध्ये 'ब्रिटिश इन्डियन असोसिएशन' –'ब्रिटिश भारतीय परिषद'– ही दुसरी संस्था स्थापन करण्यात आली. "ग्रेट ब्रिटन आणि भारत ह्यांच्या समान हितसंबंधांचा परिपोष करण्यासाठी आणि एतद्देशीय जनतेची स्थिती सुधारण्यासाठी जे विविध उपक्रम चालविण्यात येत असतील" त्यांची माहिती सरकारला करून देण्याच्या हेतूने ही संस्था स्थापन करण्यात आली होती. 'धि हिंदू पेट्रिअट' हे तिचे अधिकृत मुखपत्र होते. सुशिक्षित हिंदू तरुण उदारमतवादी आणि राष्ट्रवादी सिद्धांत आत्मसात करू लागले होते. मिल, मॅझिनी, ऑस्टिन इ. विचारवंतांच्या राजकीय तत्त्वज्ञानाचा त्यांच्यात प्रसार होत होता आणि लोकांच्या पाठिंब्याचे अधिष्ठान नसलेल्या, निरंकुशपणे सत्ता वापरणाऱ्या भारतातील ब्रिटिश राजवटीचा नैतिक पाया डळमळीत आहे असे प्रतिपादन करण्याची धिटाई ते दाखवू लागले होते. ह्या वैचारिक आंदोलनाला जॉन ब्राइट, कॉब्डेन इ. उदारमतवादी ब्रिटिश राजकीय पुढाऱ्यांची सहानुभूती त्यांनी मिळविली होती.

हे आंदोलन जरी हिंदू असलेल्या व्यक्तींनी चालविले होते तरी ते राष्ट्रवादी आंदोलन होते; जातीयवादी नव्हते. पण मुसलमान पुढाऱ्यांच्या दृष्टीने ते 'हिंदू' होते. ह्या स्वरूपाची राजकीय जागृती जरी मुसलमानांत नव्हती तरीही राजकीय चळवळीत हिंदू आघाडीवर आहेत ह्या दृश्याची प्रतिक्रिया मुसलमानांत होणे अटळ होते. १८७८ मध्ये कलकत्ता येथे 'धि सेन्ट्रल नॅशनल मुहामेडन असोसिएशन' ही संघटना भारतीय मुसलमानांचे पहिले राजकीय व्यासपीठ म्हणून सैद अमीर अली ह्यांनी स्थापन केली. "राजनिष्ठ, पण स्वतंत्र दृष्टिकोणातून" भारतीय मुसलमानांच्या न्याय्य गरजा आणि इच्छा सरकारच्या कानावर घालणे हे तिचे उद्दिष्ट होते. आपली भूमिका हिंदूंच्या विरुद्ध नाही हे त्यांना पटवून देण्यासाठी दोघा हिंदूंना संघटनेच्या कार्यकारी समितीमध्ये घेण्यात आले होते. थोड्याच काळात मुंबई, लखनौ, अमृतसर अशा बऱ्याच शहरांत मुसलमानांच्या अशा संघटना स्थापन करण्यात आल्या. मुसलमानांच्या ह्या राजकीय संघटनांपासून सर सय्यद अहमदखान फटकून राहिले ही नमूद करण्यासारखी घटना आहे.

ह्या 'हिंदू' आणि मुसलमान राजकीय संघटनांचा काहीसा प्रभाव ब्रिटिश राज्यकर्त्यांवर पडू लागला. १८६१ च्या 'कौन्सिलस ॲक्ट' प्रमाणे गव्हर्नर जनरल आणि बंगाल, मद्रास व मुंबई येथील

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

गव्हर्नर यांच्या कौन्सिलांत–मंडळांत–काही 'वरिष्ठ एतद्देशीयांना' स्थान देण्यात आले. त्यांना अर्थात काही अधिकार नव्हते आणि कामही नव्हते. ह्या मंडळीत हिंदूंचाच अधिक भरणा होता.

एकंदरीत असे म्हणता येईल की, तत्कालीन हिंदू पुढारी हे इंग्रजी शिक्षणाने निर्माण केलेल्या आधुनिक मध्यमवर्गीय व्यवसायांतून आले होते तर मुसलमान पुढारी पारंपरिक नबाब–जमीनदार वर्गांतून आले होते. हिंदू पुढाऱ्यांनी पाश्चात्य उदारमतवादी, लोकशाहीवादी, राष्ट्रवादी विचारसरणी स्वीकारली होती तर मुसलमान पुढारी पारंपरिक मुस्लिम राजकीय विचारांच्या चौकटीतून बाहेर पडले नव्हते. हिंदू पुढारी केवळ भारताचा आणि अखिल भारताचा विचार करीत होते. मुसलमान पुढारी आपल्या जमातीकडे जागतिक मुसलमान जमातीचा भारतातील विभाग म्हणून पाहत होते. त्यांची दृष्टी भारताइतकीच तुर्कस्तान, इराण, इजिप्त, अरेबिया इ. मुसलमानी देशांकडे होती. थोडक्यात, तत्कालीन मुसलमान पुढाऱ्यांनी अलगतावादी आणि जातीयवादी भूमिका स्वीकारूनच भारताच्या राजकीय मंचावर पदार्पण केले होते.

१८८५ मध्ये इंडियन नॅशनल काँग्रेस–भारतीय राष्ट्रसभा–स्थापन होऊन देशात तोपर्यंत ठिकठिकाणी जागृत आणि विकसित झालेल्या राजकीय शक्ती एकत्र आल्या व संघटित झाल्या. काँग्रेसची स्थापना हा नवीन भारतीय सुशिक्षित वर्गात अगोदरच्या सुमारे अर्धशतकात झालेल्या राजकीय जागृतीचा व आकांक्षांचा परिपाक होता. काँग्रेस नवोदित भारतीय राष्ट्राचे प्रतिनिधित्व करू पाहत होती, ती कोणत्याही विशिष्ट जमातीशी किंवा वर्गाशी बांधलेली, त्याच्यापुरती मर्यादित नव्हती. सर्व भारतीयांच्या वतीने, सर्व भारतीयांसाठी ती राजकीय सुधारणांची मागणी करीत होती. पहिल्या काँग्रेसमध्ये काही युरोपिअन, पारसी, ख्रिस्ती आणि अर्थात हिंदू उपस्थित होते. अपरिहार्यपणे हिंदू बहुसंख्य होते.

पण प्रथमपासूनच काँग्रेसला 'हिंदू काँग्रेस' असे अभिधान देऊन तिचे अखिल भारतीय स्वरूप नाकारण्याचा आणि तिला हिंदू जमातीपुरते बंदिस्त करण्याचा विरोधकांचा प्रयत्न होता. 'इंग्लिशमन' ह्या त्या वेळच्या एका प्रतिष्ठित अँग्लो–इंडियन वृत्तपत्राने काँग्रेसचे पहिले अधिवेशन झाल्यानंतर लगेच तिचा उल्लेख 'हिंदू काँग्रेस' असा केला होता. पहिल्या काँग्रेसमध्ये अवघे दोन मुसलमान उपस्थित होते ह्याचा अँग्लो–इंडियन वृत्तपत्रे आणि ब्रिटिश अधिकारी आनंद व्यक्त करीत होते. पहिल्या काँग्रेसविषयी आपली प्रतिक्रिया व्यक्त करताना लंडनच्या 'टाइम्स'ने केलेले भाष्य असे होते की "आम्ही शक्तीच्या जोरावर भारत जिंकलेले आहे आणि शक्तीच्या जोरावरच आम्हाला भारतावर राज्य केले पाहिजे" आणि "आम्ही जर भारतातून निवृत्त झालो तर ते शब्दबंबाळ जिव्हाधाऱ्यांच्या आणि लेखणीबहाद्दरांच्या प्रीत्यर्थ असणार नाही तर ज्यांचे बाहू बळकट आहेत आणि ज्यांच्या तलवारीचे पाते तिखट आहे त्यांच्यासाठी होऊ." हिंदू ही बाबू लोकांची जमात आहे, मुसलमान आणि ब्रिटिश ह्या राज्यकर्त्या जमाती आहेत, ब्रिटिशांनी मुसलमानांपासून राज्य जिंकून घेतले, जर ब्रिटिशांना भारत कधीकाळी सोडावेच लागले तर राज्य परत मुसलमानांकडे स्वाभाविकपणे जाईल, ह्या घडामोडींमध्ये बाबू लोकांना काही स्थानच नाही असा हा सूर होता. नबाब–जमीनदार वर्गांतून आलेल्या मुसलमान पुढाऱ्यांचाही तोच सूर होता. पण काळ बदलला आहे ह्याचे अंधुक भानही ह्या दोघांना होते आणि म्हणून ते अस्वस्थही होते.

दुसऱ्या काँग्रेसच्या स्वागतसमितीने मुसलमानांनी काँग्रेसला अधिक संख्येने उपस्थित रहावे म्हणून 'धि सेन्ट्रल नॅशनल मुहामेडन असोसिएशन' आणि 'धि मुहामेडन लिटररी सोसायटी' ह्या प्रमुख मुस्लिम संघटनांना त्यांनी आपले प्रतिनिधी काँग्रेसला पाठवावे म्हणून खास आमंत्रण दिले. दोन्ही संघटनांनी ते झिडकारले. (दुसऱ्या काँग्रेसला जे ४१३ प्रतिनिधी उपस्थित होते त्यांतील २७ मुसलमान होते.) तिसऱ्या काँग्रेसचे बद्रुद्दिन तैयबजी हे अध्यक्ष बनले तेव्हा काँग्रेसच्या संघटकांना तो आपला विजयच वाटला. "सर्व (भारतीयांच्या) लाभासाठी म्हणून ज्या महान सामान्य सुधारणांची आणि ज्या महान सामान्य हक्कांची" मागणी काँग्रेस करीत आहे, त्या ध्यानी घेतल्या तर भारतीय जमातीला

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

अशा प्रयत्नांपासून अलिप्त रहायचे काही कारण नाही असे तय्यबजी ह्यांनी अध्यक्षपदावरून जाहीर केले.

आता मात्र सय्यद अहमदखान ह्यांना राहवेना. त्यांनी १८८७ मध्ये लखनौ येथे केलेल्या भाषणात काँग्रेसवर हल्ला चढविला. बंगाली बाबूंचा त्यांनी आपल्या भाषणात अत्यंत तुच्छतेने उल्लेख केला आणि तेच प्रामुख्याने काँग्रेसच्या चळवळीमागे आहेत असे जाहीर केले. आपल्या धर्मबांधवांना काँग्रेस-मध्ये सहभाग घेण्यापासून परावृत्त करण्यासाठी त्यांनी मांडलेले मुद्दे असे होते : "हिंदू आणि मुसलमान ही भिन्न राष्ट्रे आहेत. कुराणात म्हटले आहे त्याप्रमाणे एक राष्ट्र दुसऱ्या राष्ट्राकडून मैत्रीची किंवा ममतेची अपेक्षा करू शकत नाही. तेव्हा आपल्या हितसंबंधांचे रक्षण करण्यासाठी मुसलमानांना ब्रिटिशांचीच कास धरली पाहिजे. प्रातिनिधिक लोकशाही भारतात योग्य ठरणार नाही. कारण हिंदू हे संख्येने मुसलमानांच्या चौपट असल्याने हिंदू नेहमीच सत्ताधारी राहतील. भारतात लोकशाही येणे ह्याचा अर्थ मुसलमान जमात हिंदू जमातीच्या अधीन होणे." तेव्हा मुसलमानांनी काँग्रेसशी कोणताही संबंध न ठेवणे हेच त्यांच्या हिताचे आहे.

'राष्ट्रवादी' किंवा 'भारतीयवादी' वर्तमानपत्रांनी अर्थात ह्या 'जातीयवादी' भूमिकेचा कमी-अधिक कडवटपणे निषेध केला. सय्यद अहमदखान हिंदू आणि मुसलमान ह्या जमातींत वितुष्ट निर्माण करीत आहेत आणि ब्रिटिशांची खुशामत करीत आहेत हे त्यांचे मुख्य आरोप होते. "भारतातील (हिंदू आणि मुसलमान ह्या) दोन जमातींमध्ये सख्य आणि ऐक्य नांदावे, आणि एकीने दुसरीला साहाय्य करावे अशी इतर कुणाइतकीच माझीही इच्छा आहे. भारत हा एका पक्ष्यासारखा आहे आणि हिंदू आणि मुसलमान हे त्याचे दोन डोळे आहेत असे मी अनेकदा म्हणतो. ह्या दोन्ही डोळ्यांचे तेज सारखेच असण्यात ह्या पक्ष्याचे सौंदर्य सामावलेले आहे." पण काँग्रेसच्या चळवळीचे उद्दिष्ट अखेरीस देशातील अंतर्गत सत्ता स्वतःच्या हातात घेणे हे आहे. म्हणजे काँग्रेसने अंतर्गत 'यादवी युद्ध' सुरू केले आहे. "हे शस्त्रांशिवाय होणारे यादवी युद्ध आहे. **ते शस्त्रांच्या साहाय्याने व्हावे** हे आम्ही पसंत करतो." (अधोरेखा मुळात नाही.) सय्यद अहमदखानांचा मथितार्थ असा की काँग्रेसचे अंतिम उद्दिष्ट देशात लोकशाही आणावी हे आहे आणि ह्याचा सरळ अर्थ असा की, बहुसंख्य हिंदू जमातीची अल्पसंख्य मुसलमान जमातीवर सत्ता स्थापन करावी हे काँग्रेसचे ईप्सित आहे. म्हणून काँग्रेसची चळवळ हे हिंदूंनी सनदशीर मार्गाने मुसलमानांविरुद्ध सुरू केलेले युद्ध आहे. पण जर हे युद्ध शस्त्रांनी झाले तर मुसलमान डरणार नाहीत. ते हे युद्ध जिंकतील. उलट, लोकशाहीचा नवा खेळ येथे सुरू झाला आणि त्यात मुसलमानांनी भाग घेतला तर ते अटळपणे हरतील. तेव्हा ह्या खेळात मुसलमानांनी भाग घेऊच नये. तेव्हा मुसलमानांनी काँग्रेसविरुद्ध ब्रिटिश सत्तेला धरून रहावे हेच तर्कशुद्ध आहे.

आपल्याला हिंदू व मुसलमान ह्यांच्यात ऐक्य व सलोखा पाहिजे असे मुसलमान पुढारी प्रथमपासून व आवर्जून सांगत होते. ह्यासाठी त्यांची प्रारंभापासून अखेरपर्यंत एकच अट राहिली. ती ही की, राजकीय सत्तेच्या विभागणीत हिंदूंच्या बहुसंख्यत्वाचे यत्किंचितही प्रतिबिंब पडता कामा नये, सत्तेत दोघांना पूर्णपणे समान वाटा असला पाहिजे. ब्रिटिश सत्ता फार काळ टिकून राहणार नाही आणि एकसंध भारतात आपल्याला सत्तेमध्ये समान वाटा मिळू शकणार नाही हे स्पष्ट झाले तेव्हा त्यांनी भारतातील ज्या प्रदेशांत आपली बहुसंख्या आहे त्यांचे वेगळे राज्य बनवावे ही मागणी केली. सत्तेचे विभाजन करता येत नाही म्हणून देशाचे विभाजन केले. मुसलमान पुढाऱ्यांच्या दृष्टीने स्वातंत्र्याचे आंदोलन हे हिंदूंनी स्वतःसाठी ब्रिटिशांपासून सत्ता हिसकावून घेण्यासाठी चालविलेले आंदोलन होते. ह्या वितुष्टात मुसलमान आणि ब्रिटिश ह्यांचे हितसंबंध समान होते आणि म्हणून ते एका पक्षाचे होते. मुसलमान पुढाऱ्यांच्या मताप्रमाणे भारतीय राजकीय आंदोलनात एक पोट-आंदोलन होते. ते मुसलमानांचे हिंदूंविरुद्ध असलेले आंदोलन होते. जेवढी सत्ता ब्रिटिशांकडून भारतीयांकडे हस्तांतरित होईल तिच्यात ब्रिटिशांच्या पाठिंब्याने मुसलमानांसाठी जास्तीत जास्त, लोकसंख्येच्या मानाने कितीतरी अधिक वाटा हस्तगत करणे, हा त्यांच्या रणनीतीचा

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष

एक भाग होता. ह्याची किंमत म्हणून ब्रिटिश सत्तेची सतत साथ करणे हा दुसरा भाग होता.

हिंदू-मुसलमानांमधील 'यादवी' शस्त्रांच्या साहाय्याने व्हावी ही सय्यद अहमदखानांची इच्छा पुढे जीनांच्या आधिपत्याखालील मुस्लिम लीगने देशात पद्धतशीरपणे जातीय दंगली घडवून आणून पुरी केली. ह्याची भयानक किंमत हिंदू आणि मुसलमान ह्या दोन्ही जमातींनी दिली आणि भरतखंडातील हिंदू आणि मुसलमान अजून देत आहेत. सय्यद अहमदखान एक श्रेष्ठ द्रष्टे होते ह्यात शंका नाही. पाकिस्तानची बीजे त्यांनी रोविली होती.

सय्यद अहमदखान ह्यांनी स्थापन केलेल्या धि मुहामेडन अँग्लो-ओरिएन्टल कॉलेजच्या प्राचार्यपदी नियुक्त झालेले थिओडोर बेक ह्यांची साथ काँग्रेसवर ते करीत असलेल्या टीकेत सय्यदसाहेबांना होती. बेक ह्यांनीही हिंदू व मुसलमान ही दोन भिन्न राष्ट्रे आहेत आणि भारतात लोकशाही आली, तर हिंदू-मुसलमानांच निरंकुश मालक बनतील हे विचार स्वतंत्रपणे मांडले होते. मुसलमान जरी राजकीय दृष्ट्या संघटित नव्हते तरी मुंबई, लाहोर, अलाहाबाद, मद्रास इ. अनेक ठिकाणच्या मुसलमानांनी भरविलेल्या सभांत सय्यदसाहेबांच्या भूमिकेला पाठिंबा व्यक्त करण्यात आला. ह्या उत्तेजनाचा परिणाम म्हणून आणि काँग्रेसच्या वाढत्या प्रभावाला पायबंद घालण्यासाठी म्हणून सय्यदसाहेबांनी धि इन्डियन पेट्रिऑटिक असोसिएशन स्थापन केली. ह्यात मुसलमानांबरोबर राजा शिवप्रसाद यांसारखे हिंदू जमीनदारही त्यांचे साहाय्यक होते.

काँग्रेसमध्ये खरोखर किती प्रमाणात मुसलमान आहेत हा ह्या काळातील एक महत्त्वाचा वादाचा विषय होता. मुसलमानांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात पाहिले तर काँग्रेसच्या एकूण ४३१ प्रतिनिधीतील ९७ प्रतिनिधी मुसलमान असणे आवश्यक होते, तर प्रत्यक्षात ते ३३ होते; तुलनेने मुसलमानांत इंग्रजी शिक्षणाचा प्रसार कमी असल्यामुळे ह्या कमी प्रमाणाची उपपत्ती लावता येते, मुसलमान जनतेचा काँग्रेसला विरोध नाही असे स्पष्टीकरण काँग्रेसच्या सचिवांनी १८८६ मध्ये दिले. उलट, काँग्रेसच्या अधिवेशनात भाग घेत असलेले मुसलमान प्रतिष्ठित व प्रातिनिधिक नाहीत, भूलथापांचा वापर करून त्यांना काँग्रेसमध्ये आणले जाते किंवा ते लाचारीने जातात असा आरोप मियां महंमद शफी यांच्यासारखे मुसलमान पुढारी करीत होते. (हे पुढे अखिल भारतीय मुस्लिम लीगचे अध्यक्ष झाले.)

ब्रिटिश राजकीय पुढारी आणि सनदी अधिकारी ह्यांच्यात दोन प्रवृत्ती होत्या. ग्लॅडस्टन आणि इतर उदारमतवादी पुढाऱ्यांच्या, तसेच मँचेस्टर गार्डियन, डेली क्रॉनिकल इ. उदारमतवादी वृत्तपत्रांच्या दृष्टीने काँग्रेसची चळवळ प्रागतिक व स्वागतार्ह होती. लॉर्ड लँड्स्डाउन ह्या व्हाइसरॉयनेही तिला आशीर्वाद दिला होता. काँग्रेसच्या पुढाऱ्यांची राजनिष्ठा वास्तविक संशयातील होती. त्यांना ब्रिटिश सत्तेला अजिबात आव्हान द्यायचे नव्हते. "आमच्याजवळ जे काही आहे ते सर्व, आमचे स्थान, आमची प्रतिष्ठा ब्रिटिश संबंधामुळे आहे हे न ओळखण्याइतकी आमची मती भ्रष्ट झालेली नाही" असे उद्गार सुरेन्द्रनाथ बॅनर्जींनी काँग्रेसच्या अध्यक्षपदावरून काढले होते. (१८८८) बादशहाच्या सर्व नागरिकांना आपण वंशनिरपेक्ष समानतेने वागवू असे जे अभिवचन ब्रिटिश सत्ताधीशांनी दिले होते त्याची पूर्तता त्यांनी करावी एवढीच त्यांची विनीत मागणी होती. पण अनेक ब्रिटिश अधिकाऱ्यांना काँग्रेसच्या चळवळीमुळे आपले विशेषाधिकार आणि आपली निरंकुश सत्ता धोक्यात येईल ह्याची जाणीव झाली होती आणि त्यांनी काँग्रेसविरुद्ध मोहीम उघडली होती. ह्या मोहिमेत त्यांना मुसलमानांना स्वतःच्या बाजूला वळवून घ्यायचे होते. हुजूर (कॉंझर्व्हेटिव्ह) पक्षही काँग्रेसविरुद्ध होता. "आमचे मुसलमान प्रजाजनच आमच्या धोरणांचे समंजस आणि नेमस्त दृष्टीने आकलन करू शकतील' असे समाधान व्यक्त करणारे विधान लंडन टाइम्सने केले होते.

ब्रिटिश सत्ताधारी आणि मुसलमान यांमधील दुरावा संपला होता.

ह्या परिस्थितीत आपल्याला मुसलमान जमातीचा पाठिंबा आहे हे दाखवून देण्याचा आणि मुसलमानांना वळवून घेण्याचा निकराचा प्रयत्न काँग्रेसच्या नेत्यांनी सुरू केला. "गेल्या काँग्रेसला ८३ मुसलमान प्रति-

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष

अनुक्रमणिका

निधी उपस्थित होते; ह्या काँग्रेसला त्याच्या दुप्पट (आवाज : नाही, तिप्पट, तिप्पट !) प्रतिनिधी हजर आहेत आणि त्यांतील काही राजघराण्यातील आहेत" असे अलाहाबाद काँग्रेसमध्ये एका वक्त्याने दाखवून दिले. (१८८८) ह्या काँग्रेसमध्ये बद्रुद्दिन तय्यबजी ह्यांच्या प्रेरणेने संमत करण्यात आलेल्या एका ठरावाप्रमाणे एखाद्या विषयाची चर्चा होण्याला हिंदू प्रतिनिधी किंवा मुसलमान प्रतिनिधी ह्यांचा एकमताने किंवा जवळजवळ एकमताने विरोध असेल तर तो विषय चर्चेसाठी घ्यायचा नाही किंवा त्याविषयी ठराव संमत करायचा नाही असे ठरविण्यात आले.

तथापि ह्या प्रयत्नांना फारसे फळ आले नाही. १८९४ मध्ये मद्रास येथे भरलेल्या काँग्रेसच्या १२०० प्रतिनिधींपैकी फक्त २४ मुसलमान होते व त्यांतील बहुसंख्य मद्रासजवळील ठिकाणांहून आले होते. पुढल्या, पुणे येथे भरलेल्या काँग्रेसच्या १५८४ प्रतिनिधींतील १९ मुसलमान होते आणि त्यांतील १७ पुण्याचे होते.

डिसेंबर ३०, १८९४ ला सय्यद अहमदखान ह्यांनी 'धि मुहामेडन अँग्लो-ओरिएन्टल डिफेन्स असोसिएशन ऑफ अपर इन्डिया' ह्या लांबलचक नावाची संघटना स्थापन केली. ह्याच्यामागची प्रेरणाही थिओडोर बेक ह्यांचीच होती. स्थापनेपूर्वी बेक ह्यांनी केलेल्या मार्गदर्शक भाषणाचे सार असे होते : "देशात अलीकडे दोन आंदोलनांनी जोर धरला आहे. एक काँग्रेसचे. ते ब्रिटिशांविरुद्ध आहे. दुसरे गोहत्याविरोधी आंदोलन. ते ब्रिटिश व मुसलमान ह्या दोघांविरुद्ध आहे. देशात लोकशाहीची वाढ होण्याने दोघांनाही धोका संभवतो. तेव्हा दोघांचे हितसंबंध समान आहेत. दोघांनी एक झाले पाहिजे आणि दोघांमध्ये जो अनुबंध आहे त्याची मुसलमान जनतेला जाणीव करून दिली पाहिजे." ही संघटनाही फारशी प्रभावी ठरली नाही.

मुसलमानांना वळवून घेण्याचे काँग्रेस नेत्यांचे प्रयत्न चालूच होते. १८९६ मध्ये कलकत्ता येथे भरलेल्या बाराव्या काँग्रेसचे अध्यक्ष म्हणूच रहिमतुल्ला सयानी ह्या मुंबईच्या एका सॉलिसिटर गृहस्थांची निवड करण्यात आली. ह्या प्रसंगी सय्यदसाहेबांचे एक जवळचे साहाय्यक हाजी महंमद इस्माइल खान ह्यांनी सयानी ह्यांच्याकडे हिंदू आणि मुसलमान ह्यांच्यामध्ये राजकीय समझोता घडवून आणण्यासाठी एक प्रस्ताव पाठविला. काँग्रेसने सरकारच्या मंडळांत (काउन्सिल्स), तसेच नगरपालिका आणि लोकल बोर्डात हिंदू आणि मुसलमान ह्यांच्यात समान प्रतिनिधित्व असेल हे जर मान्य केले आणि तसा ठराव मंजूर केला तर हिंदू-मुसलमान ऐक्याचा पाया घातला जाईल आणि मुसलमान काँग्रेसमध्ये प्रवेश करतील अशी ही सूचना होती. सय्यदसाहेबांनी तिच्याविषयी फारसा उत्साह दाखविला नाही पण मुस्लिम वर्तमानपत्रांनी तिचे स्वागत केले.

रहिमतुल्ला सयानी ह्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात मुसलमानांनी काँग्रेसला मिळू नये म्हणून सामान्यपणे जी कारणे आणि युक्तिवाद पुढे करण्यात येत असत त्यांचे समालोचन केले. ही कारणे अशी होती :

१) मुसलमानांनी काँग्रेसमध्ये प्रवेश करणे धर्माच्या विरुद्ध होते. २) मुसलमानांनी काँग्रेसमध्ये प्रवेश घेतला तर सरकारची त्यांच्यावर इतराजी होईल आणि सरकारचे साहाय्य त्यांना मिळणार नाही. ३) काँग्रेस यशस्वी झाली तर ब्रिटिशांच्या राज्याऐवजी हिंदू राज्य देशात स्थापन होईल. ४) काँग्रेस सर्व जमातींचे प्रतिनिधित्व करीत नाही. तिचे हेतू प्रामाणिक नाहीत आणि तिची ध्येयधोरणे व्यवहार्य नाहीत. ५) पश्चिमेकडील प्रातिनिधिक लोकशाहीची पद्धती भारताला योग्य नाही. ती येथे आणली तर सर्व सरकारी अधिकारस्थाने आणि नोकऱ्या हिंदूंना मिळतील. ६) हिंदूंची प्रचंड बहुसंख्या असल्यामुळे काँग्रेसमध्ये हिंदूंचे वर्चस्व राहील आणि काँग्रेस हे केवळ हिंदू हितसंबंधांचे साधन बनेल.

ह्यांतील काही आक्षेपांत तथ्य होते. पण कोणताही आक्षेप टिकण्यासारखा नव्हता असे मत सयानी ह्यांनी व्यक्त केले. १) काँग्रेसचा कोणत्याही धर्माशी कसलाही संबंधच नाही. २) काँग्रेस सरकारविरुद्ध नाही. भारतीय जनतेची रास्त गाऱ्हाणी सरकारच्या कानी घालणे हेच केवळ काँग्रेसचे कार्य आहे. ३) म्हणून ब्रिटिश सरकार संपुष्टात आणणे हे काँग्रेसचे साध्य नव्हे. काँग्रेसच्या

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

कार्यामुळे सरकार आणि भारतीय जनता ह्यांच्यात अधिक सलोखा निर्माण होऊन सरकार कायम टिकायला साहाय्य होईल. ४) काँग्रेसने मुसलमानांसमोर नेहमीच मैत्रीचा हात पुढे केला आहे. जर मुसलमानच काँग्रेसशी फटकून राहिले तर काँग्रेस सर्व जमातींचे प्रतिनिधित्व कसे करू शकेल ? ५) इस्लामची परंपरा ही लोकशाहीची आणि मानवी बंधुत्वाची आहे. मुसलमान लोकशाही पद्धतीला कसा विरोध करू शकतील ? नोकऱ्या मिळवायच्या तर मुसलमानांनी विद्येमध्ये प्रावीण्य मिळवून आवश्यक ती पात्रता संपादन केली पाहिजे. ६) काँग्रेस ही काही व्यापारी पेढीसारखी संघटना नाही. म्हणजे भागधारकांना नफा करून देणे हे तिचे उद्दिष्ट नाही. कोणत्याही विशिष्ट जमातीचे किंवा विभागाचे हित साधायला काँग्रेसला कुणी राबवू शकणार नाही.

इस्माइलखान हृयांनी जी सूचना केली होती तिच्याविषयी सयानी हृयांचे म्हणणे असे होते की, ती चांगली सूचना होती, पण मुसलमान उत्साहाने काँग्रेसमध्ये आल्यानंतरच तिचा विचार करणे शक्य होईल आणि योग्य ठरेल. उलट, इस्माइलखान हृयांची भूमिका अशी होती की, हृया प्रस्तावाची पूर्तता ही मुसलमानांनी काँग्रेसमध्ये प्रवेश करण्याची अट राहील.

सयानी हृयांच्या भाषणामुळे मुसलमानांनी काँग्रेसमध्ये प्रवेश घ्यावा की नाही ह्याविषयीच्या विचाराला काहीशी चालना मिळाली. "काँग्रेसमध्ये प्रवेश न केल्याने आम्हाला काय मिळाले ? सरकार कायदेमंडळे, नगरपालिका इत्यादींमध्ये निवडणुकीचे तत्त्व हळूहळू मान्य करीत आहे. अखेरीस येथे प्रातिनिधिक सरकार येणार. आम्ही सरकारला चिकटून राहिलो म्हणून ही प्रक्रिया काही थांबणार नाही. फक्त तिच्यात हिंदूंना आपण साथ दिली नाही म्हणून हिंदूंचा राग मात्र आपण ओढवून घेऊ. तेव्हा खूप उशीर होण्यापूर्वी ह्या दोन जमातींत समझोता घडवून आणणे इष्ट ठरेल" असे विचार काही मुसलमानांनी मांडले. पण एकंदरीत मुस्लिम मत सयानींविरुद्धच राहिले. काँग्रेसशी फटकून राहिल्याने आणि ब्रिटिश सरकारला साथ दिल्याने मुसलमानांचा एकंदरीत फायदाच झाला आहे असा बहुमताचा सूर होता. बेक ह्यांनीही ह्या विवादात भाग घेऊन ब्रिटिश सरकारशी एकनिष्ठ राहिल्याने मुसलमानांची प्रतिष्ठा वाढलेली आहे, त्यांना नोकऱ्यांतही लाभ झाला आहे असे दाखवून देण्याचा प्रयत्न केला. भारतात प्रातिनिधिक लोकशाही संस्था रुजवायचा ब्रिटिश सरकारचा इरादा नाही, निवडलेले लोकप्रतिनिधी कायदेमंडळात किंवा अन्यत्र कधीही बहुसंख्य असणार नाहीत, सरकार सत्ता आपल्या हातातच ठेवील ही गोष्टही त्यांनी स्पष्ट केली.

कर्झन ह्यांनी व्हाइसरॉय म्हणून भारतात एका शुक्रवारी पदार्पण केले ही गोष्ट मुसलमानांना शुभ वाटली. धि सेन्ट्रल मुहामेडन असोसिएशनने नवीन व्हाइसरॉयचे स्वागत करणारे निवेदन सादर केले आणि त्याच्यात नेहमीच्या, नोकऱ्यांत मुसलमानांसाठी अधिक राखीव जागा ठेवण्यात याव्या इ. मागण्या केल्या. कर्झन ह्यांनी "ह्या हृद्य स्वागताला माझ्या हृदयाने प्रतिसाद दिला नाही तर ते अचेतन आहे असे म्हणावे लागेल" असे भावुक उद्‌गार काढले तरी सरकार मुसलमानांना नेहमीच उत्तेजन देत आले आहे, "सार्वजनिक सेवांमध्ये (सरकारी नोकऱ्यांमध्ये) सरकारने मुसलमानांना दिलेला वाटा न्याय्य आणि उदार आहे" आणि तुमच्या प्रयत्नांकडे सरकार सख्यत्वाच्या दृष्टीने पाहत आहेच, तथापि अखेरीस तुमचे भवितव्य तुमच्याच हातांत आहे हे स्पष्ट केले. हा प्रतिसाद मुसलमानांना निराशाजनक वाटला.

ह्या सुमारास सय्यदसाहेबांचे निधन झाले. (१८९८) मुसलमान पुढाऱ्यांत पोरकेपणाची भावना पसरली. आधारासाठी ते बेक ह्यांच्याकडे वळले. ह्या इंग्रज आणि ख्रिस्ती माणसावर भारतीय मुसलमानांची जी निष्ठा बसली होती तिला तोड नव्हती. पण वर्षभरात बेक हेही मृत्यू पावले. ह्या निर्नायकी अवस्थेत सुशिक्षित मुसलमानांत एका बाजूला वैफल्याची भावना पसरली होती तर दुसऱ्या बाजूला आपल्या राजकीय भूमिकेचा पुनर्विचार करण्याकडे त्यांचा कलही वाढत होता. हिंदू पुढारी अनेकदा विद्रोही विचार मांडतात, सरकारविरुद्ध चळवळी करतात आणि तरीही हिंदूंची राजकीय प्रगती झपाट्याने होत आहे. उलट, राजनिष्ठ आणि हिंदूंपासून अलग राहूनही आपल्या

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष

हाताला काही लागत नाही असा विचार त्यांच्यात बळावत होता. ह्या परिस्थितीत एक पर्याय असा होता की, काँग्रेसमध्ये मोठ्या संख्येने प्रवेश करावा तिच्या कार्यक्रमांत भाग घ्यावा आणि आपल्या हितसंबंधांचे आणि हक्कांचे रक्षण करावे. दुसरा पर्याय म्हणजे मुसलमानांनी आपली वेगळी राजकीय संघटना निर्माण करावी हा होता. बेक ह्यांच्यानंतर मुहामेडन अँग्लो-ओरिएन्टल कॉलेजचे अध्वर्यू बनलेले थिओडोर मॉरिसन ह्यांना सुशिक्षित मुसलमानांमधील राजकीय अस्वस्थता जाणवत होती. पण राजकीय चळवळीपासून पूर्णपणे अलिप्त राहून, ब्रिटिश सरकारचा व अधिकाऱ्यांचा विश्वास संपादन करून मुसलमानांनी आपली शैक्षणिक, सामाजिक आणि आर्थिक प्रगती करून घ्यावी ह्या सय्यदसाहेबांच्या धोरणापासून फारकत घेण्यात धोकाही होता. धि सेन्ट्रल नॅशनल मुहामेडन असोसिएशन आणि धि मुहामेडन लिटररी सोसायटी ह्या संघटना क्षीण झाल्या होत्या. ह्या परिस्थितीत काही मुसलमान पुढाऱ्यांनी हिंदूंबरोबर एकी करून मुसलमानांनी राजकीय चळवळीत भाग घ्यावा हा पक्ष उचलून धरला. तर मॉरिसन आणि त्यांचे मुस्लिम सहकारी यांनी प्रतिष्ठित मुसलमान पुढाऱ्यांचे एक 'महामंडळ' (ग्रँड काउन्सिल) संघटित करावे आणि त्याने मुसलमानांच्या हितसंबंधांचे पालकत्व करावे असा आग्रह धरला. एकंदर मुसलमानी मताचा कल मुसलमानांची स्वतंत्र राजकीय संघटना असावी असा होता.

बरीच भवती न भवती होऊन जुलै १९०३ मध्ये सहरणपूर (उ. प्र.) येथे 'धि मुहामेडन पोलिटिकल असोसिएशन'ची स्थापना करण्यात आली. तिच्यात पुढाकार घेतलेले नबाब विक्र-उल्-मुल्क ह्यांनी ह्या संघटनेचा काँग्रेसशी कोणताही संबंध नाही हे स्पष्ट केले. संघटनेची उद्दिष्टे अशी होती : १) ब्रिटिश सत्तेच्या स्थैर्यावर आणि सातत्यावर मुसलमानांचे कल्याण आणि भरभराट सर्वस्वी अवलंबून आहे ही गोष्ट मुसलमानांच्या मनावर बिंबविणे; २) सरकारपुढे मुसलमानांची गाऱ्हाणी नेमस्तपणे आणि आदरपूर्वक मांडणे; ३) इतर जमातींशी विरोधीवृत्ती धारण करण्यापासून निवृत्त होणे आणि ४) प्रातिनिधिक सरकार आणि स्पर्धात्मक परीक्षांविषयीच्या काँग्रेसच्या प्रमुख मागण्यांना विरोध करणे.

पण ही संघटना अल्पजीवी ठरली.

कर्झन ह्यांनी केलेल्या बंगालच्या फाळणीमुळे (१९०५) मुसलमानांमधील राजकीय जागृतीला नवी चालना मिळाली. ही फाळणी केवळ शासकीय सोयींसाठी करण्यात आली नव्हती. हिंदु–मुसलमानांमध्ये फूट पाडणे हे राजकीय उद्दिष्टही तिच्यामागे होते. पूर्व बंगाल आणि आसाम मिळून मुसलमानी बहुसंख्येचा प्रांत तिच्यामुळे निर्माण झाला होता आणि त्याच्यात मुसलमानांचे वर्चस्व राहणार होते. म्हणून अनेक मुस्लिम संघटनांनी फाळणीचे स्वागत केले. तथापि काही बंगाली मुसलमान फाळणीच्या विरुद्ध होते. उदा. कलकत्ता, ढाक्का, फरीदपूर आणि मेमनसिंग येथे फाळणीचा निषेध करण्यासाठी झालेल्या सभांचे अध्यक्ष मुसलमान होते. पूर्व बंगाल व आसाम प्रांताचे पहिले ले. गव्हर्नर बॅम्फिल्ड फुलर हे उघडउघड मुसलमानांचे पक्षपाती होते. त्यांनी फाळणीला पाठिंबा देणारी मुस्लिम संघटना निर्माण करायला उत्तेजन दिले. पण तो डाव फसला. फाळणीमुळे झालेला लोकक्षोम इतका वाढला की फुलर ह्यांना राजीनामा द्यावा लागला. त्याची प्रतिक्रिया म्हणून ढाक्क्याच्या नबाबांनी मुसलमानांची एक प्रचंड सभा भरवून सरकारच्या दुबळ्या धोरणाचा निषेध केला.

ह्याच सुमाराला संयुक्त प्रांतात (उत्तरप्रदेशात) ते तत्पूर्वी सरकारी कामकाजात प्रचलित असलेल्या उर्दू लिपीबरोबर नागरी लिपीलाही मान्यता देण्यात आली होती. हिंदू संघटनांनी केलेल्या चळवळीची ही निष्पत्ती होती आणि तिच्यामुळे आपली सांस्कृतिक पीछेहाट झाली आहे अशी भावना मुसलमानांमध्ये पसरली. बंगालच्या फाळणीला जी देशभर प्रतिक्रिया झाली होती तिच्यामुळे उफाळून आलेल्या ब्रिटिशविरोधी राजकीय चैतन्याला काही प्रमाणात हिंदू पुनरुज्जीवनवादी रूपही प्राप्त झाले होते. ह्या सर्व गोष्टींमुळे आपली स्वतंत्र राजकीय संघटना स्थापन करणे अगत्याचे आहे ही मुसलमानांची धारणा दृढ होत गेली. तिच्या पूर्तीसाठी जी पूर्वतयारी आवश्यक होती ती करण्यात ढाक्क्याचे नबाब आणि आगाखान हे प्रमुख होते.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे

ह्या सुमाराला पुढे 'मॉर्ले-मिंटो सुधारणा' म्हणून ओळखण्यात येणाऱ्या घटनात्मक सुधारणा भारतीयांच्या पदरात टाकण्याचे घाटत होते. तेव्हा मुसलमानांची वेगळी राजकीय संघटना निर्माण करायला ही अनुकूल वेळ होती. नवीन व्हाइसरॉय मिंटो ह्यांना मुसलमानांविषयी विशेष सहानुभूती होती. तेव्हा मुसलमानांनी त्यांच्याकडे एक भारदस्त प्रतिनिधि-मंडळ न्यावे आणि आपली गाऱ्हाणी व आकांक्षा त्यांच्या कानावर घालाव्या असे ठरले. व्हाइसरॉयना सादर करावयाच्या विज्ञापनापत्राचा मसुदा 'पेशावरपासून मद्रासपर्यंत'च्या प्रमुख मुसलमानांच्या साहाय्याने अतिशय काळजीपूर्वक बनविण्यात आला होता.

ह्या घडामोडींची कुणकूण कॉंग्रेसला लागली होती. तिच्या दृष्टीने ही चिंताजनक बाब होती. सुरेन्द्रनाथ बॅनर्जी ह्यांनी मुसलमान पुढाऱ्यांना त्यांनी हिंदूंशी सहकार्य करावे, हिंदू व मुसलमान यांची संयुक्त आघाडी बनवावी आणि तिने दोन्ही जमातींना समान असलेल्या शैक्षणिक, आर्थिक औद्योगिक इ. मागण्या सरकारवर दडपण आणून पदरात पाडून घ्याव्या असे आवाहन केले. ते निष्प्रभ ठरले. ऑक्टोबर १, १९०६ रोजी अखिल भारतातील पन्नास मुसलमान पुढाऱ्यांच्या शिष्टमंडळाने मिंटो यांची भेट घेतली आणि आपले विज्ञापना-पत्र त्यांना सादर केले. मागण्या अर्थात मुसलमानांना अधिक प्रतिनिधित्व आणि नोकऱ्या पाहिजेत, वेगवेगळ्या मंडळांचे मुसलमान सदस्य मुसलमान जमातीचे प्रतिनिधी असले पाहिजेत आणि म्हणून त्यांना निवडून देणारे मुसलमानांचे निर्वाचन-संघ (इलेक्टोरल कॉलेज) बनविण्यात यावेत अशा होत्या. मुसलमानांचे प्रतिनिधित्व त्यांच्या संख्येच्या प्रमाणात न ठरविता मुसलमान जमातीचे राजकीय महत्त्व आणि साम्राज्याच्या संरक्षणाला ती करीत असलेले योगदान (म्हणजे मुसलमानांची सैन्यातील संख्या) ध्यानात घेऊन निश्चित करण्यात यावे अशीही मागणी होती. मिंटो ह्यांनी विभक्त मतदारसंघ स्थापन करण्याचे ठाम आश्वासन न देता विज्ञापना-पत्राला एकंदरीत सहानुभूतिपूर्ण आणि अनुकूल प्रतिसाद दिला.

ह्या घटनेने ब्रिटिश अधिकाऱ्यांना अतिशय आनंद झाला. 'राजद्रोही चळवळीपासून ६·२ कोटी लोकांना मागे खेचणारी' आणि 'भारतावर आणि भारताच्या इतिहासावर दीर्घकाल परिणाम करणारी' घटना असे तिचे स्वागत करण्यात आले. विज्ञापना-पत्रात मुस्लिम हितसंबंधांचा मुसलमानांचे राष्ट्रीय हितसंबंध असा उल्लेख करण्यात आला होता.

ह्यानंतर थोड्याच दिवसांनी ३१ डिसेंबर १९०६ रोजी 'धि ऑल इंडिया मुस्लिम लीग'ची स्थापना करण्यात आली. मुस्लिम लीगची अधिकृत उद्दिष्टे अशी होती : "(अ) भारतातील मुसलमानांमध्ये ब्रिटिश सरकारविषयी निष्ठेची भावना वृद्धिंगत करणे आणि सरकार करीत असलेल्या उपाययोजनांमागील उद्दिष्टांविषयी जर काही गैरसमजुती उपस्थित झाल्या तर त्यांचे निवारण करणे; (ब) भारतातील मुसलमानांचे राजकीय अधिकार व हितसंबंध ह्यांचे संरक्षण व संवर्धन करणे व त्यांच्या गरजा व आकांक्षा सरकारला विनीतभावाने कळविणे; (क) ह्या उद्दिष्टांत विक्षेप येणार नाही अशा रीतीने, भारतातील मुसलमानांमध्ये अन्य जमातींविषयी वितुष्टाची भावना निर्माण होण्याला प्रतिबंध करणे."

अखिल भारतीय मुस्लिम लीगच्या स्थापनेने भारतीय मुसलमानांच्या ब्रिटिश राजवटीतील राजकारणाचे एक पर्व संपते. ह्या राजकारणाची प्रमुख उद्दिष्टे आणि त्यातील प्रमुख प्रवृत्तींचे सारांशाने असे वर्णन करता येईल : १) ब्रिटिश सत्ताधारी आणि भारतीय मुसलमान (म्हणजे त्या जमातीतील पारंपरिक वरिष्ठ वर्ग) ह्यांच्यात सामंजस्य निर्माण करणे; २) मुसलमानांतील वरिष्ठ वर्गात इंग्रजी शिक्षणाचा प्रसार करून त्याचा शासकीय सेवांमधील सहभाग वाढविणे; ३) कॉंग्रेसच्या राष्ट्रवादी चळवळीपासून मुसलमान जमातीला अलग राखणे; ४) भारताच्या शासकीय व्यवस्थेत प्रातिनिधिक लोकशाहीचा सावकाश विस्तार व्हावा आणि शासकीय सेवांच्या सर्व श्रेणींमध्ये भारतीयांचा सहभाग वाढवीत न्यावा ह्या कॉंग्रेसच्या मागण्यांना निकराने विरोध करणे; ५) आपण भारतीय राष्ट्रवादी आंदोलनाचे प्रतिनिधित्व व नेतृत्व करीत आहोत हा कॉंग्रेसचा दावा

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष

नाकारणे आणि काँग्रेसला हिंदू राजकीय संघटना असे मर्यादित, जातीय स्वरूप देण्याचा प्रयत्न करणे.

भारतीयांनी, विशेषतः सुशिक्षित भारतीयांनी 'आधुनिक' उदारमतवादी मूल्ये आत्मसात करावी, आधुनिक ज्ञान आणि कौशल्ये प्राप्त करून घेऊन लोकशाही राज्यव्यवस्थेत आणि तिचे साधन असलेल्या आधुनिक शासकीय सेवांमध्ये सहभाग घेण्याची पात्रता त्यांनी कमवावी आणि त्याबरोबरच ब्रिटिशांनी लोकशाहीच्या तत्त्वाचा भारतात विस्तार करावा आणि शासकीय सेवांमध्ये भारतीयांचा वाटा वाढवीत न्यावा ह्या मागण्यांचा रेटा धरावा हे काँग्रेसचे धोरण होते. मुसलमान वरिष्ठ वर्गाची मनोवृत्ती त्याला पूर्णपणे प्रतिकूल होती. आम्ही राज्यकर्ती जमात होतो, ब्रिटिशांनी राज्य आमच्यापासून जिंकून घेतले. येथे लोकशाही आली तर हिंदूंचे आम्ही अंकित होऊ, ते आम्हाला खपणार नाही, तेव्हा ब्रिटिश येथे कायमचे रहावेत, त्यांनी आमच्या 'महत्त्वा'च्या प्रमाणात आम्हाला शासनात वाटा द्यावा, निवडणुकीचे तत्त्व येथे लावता कामा नये, लोकांनी प्रतिनिधी निवडण्यापेक्षा ब्रिटिशांनी नेमणुकी कराव्या, स्पर्धात्मक परीक्षांच्या द्वारा शासकीय सेवांमध्ये भरती न करता कुलशील वगैरे पाहून ती करावी, असे ह्या वर्गाचे विचार व भावना होत्या. काँझर्व्हेटिव्ह मनोवृत्तीचे ब्रिटिश राजकारणी आणि अधिकारी ह्यांच्या दृष्टिकोनाशी संवादी असा हा दृष्टिकोन होता. भराभर परीक्षा पास होणाऱ्या, उदारमतवादी राजकीय तत्त्वे, ब्रिटिश न्यायव्यवस्थेचे आधारभूत नियम तुमच्या तोंडावर अस्खलितपणे केव्हाही फेकू शकणाऱ्या बाबू लोकांविषयी विशेषतः बंगाली बाबूंविषयी ब्रिटिश अधिकारी आणि वरिष्ठवर्गीय मुसलमान ह्यांना सारखीच भीती व तुच्छता होती. तुच्छता बरीचशी भीतीतून निर्माण झाली होती. उलट, उदारमतवादी ब्रिटिश राजकारणी व अधिकारी ह्यांची काँग्रेसला सहानुभूती होती. आपण ज्या तत्त्वांना आधारभूत मानतो त्यांचीच सावकाश अमलबजावणी भारतात करा एवढीच मागणी करणारे हे आंदोलन कायद्यांचा आदर करीत, शांततेने आणि नेमस्तपणे चालविलेले आहे; त्याला विरोध कसा करावा, त्याच्या मागण्या कशा नाकाराव्या हे त्यांना समजत नव्हते.

जेव्हा प्रातिनिधिक लोकशाही किंचित अंशाने का होईना भारतात अवतरणार हे अटळ झाले तेव्हा मुसलमान पुढाऱ्यांनी आपली अलग राजकीय संघटना स्थापन केली आणि विभक्त मतदारसंघाची मागणी केली.

सर्वच सुशिक्षित मुसलमान ह्या प्रवृत्तीचे होते असे नाही. मुसलमानांनी आधुनिक शिक्षणाबरोबर येणारी उदारमतवादी मूल्ये स्वीकारावी, लोकशाहीचे स्वागत करावे, इतर जमातींबरोबर, विशेषतः हिंदूंबरोबर सहकार्य करून आधुनिक राजकीय तत्त्वज्ञानावर आधारलेल्या भारतीय राष्ट्राच्या उभारणीत सहभाग घ्यावा ह्या मताचेही अनेक मुसलमान होते. उदा. महंमदअली जीना ह्यांनी मुसलमानांसाठी स्वतंत्र मतदारसंघ असावा, ह्याला मुस्लिम लीगच्या नागपूर येथील अधिवेशनात विरोध केला होता. पण प्रागतिक राष्ट्रवादी मुसलमानांचा आवाज आणि प्रभाव क्षीण ठरला. १९०९ च्या इन्डियन काउन्सिल्स ॲक्टने ज्या सुधारणा भारतीयांच्या पदरात घातल्या त्यांत मुसलमानांसाठी स्वतंत्र मतदारसंघ आणि संख्येच्या प्रमाणापलीकडे अधिक जागा ह्या मुसलमानांच्या मागण्या मान्य झाल्या. कुणाच्याही डोळ्यांवर यावा एवढा पक्षपात मुसलमानांच्या बाजूने करण्यात आला होता.

ऑल इन्डिया मुस्लिम लीगने आपल्या पहिल्या सहा अधिवेशनांत केलेल्या मागण्या अशा होत्या: मध्यवर्ती ('इंपीरियल') कायदेमंडळापासून नगरपालिका, जिल्हा बोर्डापर्यंत आणि विद्यापीठांच्या मंडळांत मुसलमानांना वेगळे प्रतिनिधित्व असावे; सरकारी नोकऱ्यांत मुसलमानांना त्यांची संख्या आणि 'राजकीय महत्त्व' यांना अनुसरून वेगळ्या जागा असाव्यात (मौलवी मुहम्मद याकूब यांनी १९०८ च्या अमृतसर येथील अधिवेशनात "आमचे विशेष महत्त्व आणि शंभराहून थोड्याच अधिक वर्षांपूर्वी हिंदुस्थानात आमचे जे स्थान होते त्याला अनुसरून आमच्या हिंदू बांधवांइतक्या जागा आम्हाला असाव्या अशी आमची न्याय्य मागणी आहे" असे विधान केले होते.); देशाची राष्ट्रभाषा उर्दू असावी इत्यादी. बंगालच्या फाळणीनंतर

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

देशात जो दहशतवाद उफाळून आला होता त्याच्या निषेधपर ठरावांनी मुस्लिम लीगने आपली राजनिष्ठा व्यक्त केली होती. पण ह्या सुमारास घडलेल्या काही घटनांनी मुस्लिम लीगच्या धोरणाला वेगळे वळण लागले. तुर्कस्तानच्या साम्राज्याचा भाग असलेल्या ट्रिपोलीवर इटलीने हल्ला केला आणि रशियाने इराणच्या उत्तर प्रदेशावर आक्रमण केले. ह्या झगडचात ब्रिटिश सरकारची आणि जनतेची सहानुभूती ‘ ख्रिस्ती ’ राष्ट्रांच्या बाजूने आणि ‘ मुस्लिम ’ देशांविरुद्ध होती असे भारतीय मुसलमानांना आढळून आले. बंगालची फाळणी सरकारने रद्द केली हाही मुसलमान पुढाऱ्यांना आपला विश्वासघात वाटला. ब्रिटिश आणि मुसलमान यांच्या राजकीय युतीला अशा रीतीने तडा गेला. अलिगड येथून जे सुशिक्षित मुसलमान तरुण बाहेर पडत होते तेही त्यांच्या ब्रिटिश सदुपदेशांना जुमानीतसे झाले होते. त्यांच्या अगोदरच्या पिढीने ब्रिटिश प्रभुत्व ज्या प्रकारे मान्य केले होते तो त्यांना सहन होण्यासारखा नव्हता. १९१२ च्या डिसेंबरमध्ये भरलेल्या लीग काउन्सिलच्या बैठकीत बहुसंख्य सभासदांच्या पाठिंब्याने स्वीकृत करण्यात आलेल्या ठरावात ब्रिटिश सम्राटाविषयीच्या निष्ठेचा परिपोष करणे आणि मुसलमानांच्या राजकीय आणि इतर हितसंबंधांचे संरक्षण व संवर्धन करणे ह्यांबरोबरच; इतर जमातींच्या सहकार्याने ‘ भारताच्या शासनव्यवस्थेत स्थिरपणे सुधारणा घडवून आणून भारताला साजेल अशी स्वायत्त राज्यपद्धती प्राप्त करून घेणे ’ हे साध्यही मान्य करण्यात आले. ह्या प्रस्तावाला लीगच्या ज्येष्ठ सदस्यांनी विरोध केला; पण जीना आणि इतर काही तरुणांनी ह्या विरोधाला जुमानले नाही. मुस्लिम लीगचे ‘ कायमचे ’ अध्यक्ष असलेल्या आगाखानांनी राजीनामा दिला.

जीना ह्यांनी आपल्या राजकीय जीवनाची सुरवात काँग्रेसमध्ये केली होती. ‘ हिंदु–मुस्लिम ऐक्याचे राजवकील ’ (ॲम्बॅसडर) होण्याची त्यांची महत्त्वाकांक्षा होती. तथापि ते विभक्त मुस्लिम मतदार संघातून मध्यवर्ती कायदेमंडळात निवडून आले होते (१९१०). ह्या गोष्टीला अर्थात त्या परिस्थितीत त्यांचा नाइलाज होता. १९१२ पासून ते काँग्रेस आणि लीग ह्या दोन्ही संघटनांच्या अधिवेशनांना हजर राहू लागले. १९१३ पासून मुस्लिम लीगच्या पुढाऱ्यांनी काँग्रेसच्या आणि काँग्रेसच्या पुढाऱ्यांनी मुस्लिम लीगच्या अधिवेशनांना उपस्थित रहावे अशी प्रथा पडू लागली. स्वराज्याचे साध्य दोघाही संघटनांनी स्वीकारले होते. लीगमधील जुन्या आणि वरिष्ठ वर्गाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या नेत्यांचा अर्थात ह्याला विरोध होता. १९१६ मध्ये मुंबई येथे भरलेल्या लीगच्या अधिवेशनात हा विरोध तीव्रपणे प्रकट झाला. तरीही ह्या अधिवेशनात लीग आणि काँग्रेस ह्यांनी परस्परांत बोलणी करून उभयमान्य अशी सुधारणांची योजना तयार करावी असा ठराव जीना यांनी संमत करून घेतला. काँग्रेसनेही समांतर ठराव संमत केला. आणि उभय पक्षांत बोलणी सुरू झाली.

ह्या वाटाघाटींचे फलित म्हणून उभयपक्षांना मान्य असलेली सुधारणांची जी योजना बनविण्यात आली, ती डिसेंबर १९१६ मध्ये पृथक्पणे भरलेल्या काँग्रेस व लीग यांच्या अधिवेशनांत अधिकृत रीत्या स्वीकारण्यात आली. तिच्याप्रमाणे काँग्रेसने विभक्त मतदारसंघ आणि मुसलमानांसाठी प्रमाणाधिक राखीव जागा ही तत्त्वे मान्य केली. पंजाबमध्ये लोकनिर्वाचित जागांच्या पन्नास टक्के आणि बंगालमध्ये चाळीस टक्के जागा मुसलमानांसाठी राखून ठेवण्यात आल्या. ‘ इंपीरियल ’ कायदेमंडळात त्या तेहतीस टक्के होत्या व ह्या प्रमाणात इतर प्रांतांत होत्या. हे भरघोस प्रमाणाधिक्य होते. शिवाय हिंदू आणि मुसलमान ह्या दोन्ही जमातींच्या प्रतिनिधींना, आपापल्या जमातीच्या व्यवहारांत दुसऱ्या जमातींकडून संभाव्यपणे होणाऱ्या हस्तक्षेपाला प्रतिबंध करता यावा ह्यासाठी ‘ नकाराधिकार ’ देण्यात आला होता. ह्यासंबंधीचे कलम असे होते : ‘ ज्या विधेयकाचा किंवा विधेयकाच्या एखाद्या कलमाचा किंवा बिन-सरकारी सदस्याने मांडलेल्या प्रस्तावाचा ह्या दोहोंपैकी एखाद्या जमातीवर परिणाम होणार असेल तर त्या विशिष्ट कायदेमंडळातील त्या जमातीच्या सदस्यांतील तीन-चतुर्थांश सदस्यांनी त्याला विरोध केला असता त्या विधेयकाविषयी किंवा कलमाविषयी किंवा प्रस्तावाविषयी पुढे कार्यवाही करू नये; आणि विशिष्ट जमातीवर त्या विधेयकाचा, इ. परिणाम होणार आहे की नाही, ह्याचा निर्णय त्या जमातीच्या

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

प्रतिनिधींनी करावा.' ह्याशिवाय ह्या 'लखनौ करारा'त ब्रिटिश सरकारकडे अनेक लोकशाहीवादी घटनात्मक सुधारणांची मागणी करण्यात आली होती. जीनांचा विभक्त मतदारसंघांना असलेला तात्त्विक विरोध अशा रीतीने विरघळून गेला होता.

ह्या मागण्यांचा पाठपुरावा करण्यासाठी जीना, श्रीनिवास शास्त्री, सप्रू आणि वझीर हुसेन यांचे शिष्टमंडळ इंग्लंडला गेले. बहुधा ह्याचा परिणाम म्हणून भारतमंत्र्यांनी ब्रिटिश सरकारच्या भारता-विषयीच्या धोरणाची अधिकृत घोषणा केली. "(भारताच्या) शासनाच्या प्रत्येक शाखेशी भारतीयांचें साहचर्य वाढविणे आणि ब्रिटिश साम्राज्याचा अंतर्गत भाग म्हणून राहणाऱ्या भारतात लोकमता-नुवर्ती शासनाची क्रमशः उत्क्रांती साधण्यासाठी स्वयंशासित संस्थांचा पायरीपायरीने विकास करणे हे ब्रिटिश सरकारचे धोरण आहे व त्याच्याशी भारतसरकार सहमत आहे. ह्या दिशेने भरघोस पावले टाकण्याचा निर्णय त्यांनी घेतला आहे."

जून १९१८ मध्ये मॉंटेग्यू-चेम्सफर्ड सुधारणा जाहीर करण्यात आल्या. त्या निराशाकारक होत्या. लखनौ-करारातील एकच कलम ह्या सुधारणांत स्वीकारण्यात आले होते. ते म्हणजे मुसलमानांसाठी स्वतंत्र मतदारसंघ आणि त्यांना दिलेले प्रमाणाधिक्य. 'इंपीरियल' काउन्सिलच्या जीना आणि इतर सदस्यांनी ह्या सुधारणांविषयीची आपली तीव्र निराशा जाहीर करणारे निवेदन प्रसिद्ध केले.

ह्या सुधारणा राबवाव्या की नाही, ह्याची चर्चा सुरू झाली असतानाच देशात एक नवीन वावटळ उठली. महायुद्धाच्या काळात भारतातील ब्रिटिश सरकार उलथून टाकण्यासाठी होत राहिलेले कट, वाढती दहशतवादी चळवळ आणि लोकांचा उग्र होत जाणारा असंतोष ह्यांच्याशी मुकाबला करण्यासाठी सरकारला दडपशाही करण्याचे अधिकार देणारी "रौलट विधेयके" जेव्हा कायदेमंडळात मांडण्यात आली, तेव्हा देशभर निषेध सुरू झाले. त्यांचा प्रतिकार करण्याच्या प्रयत्नांतून जालियन-वालाबाग हत्याकांड घडून आले. युद्धानंतर तुर्कस्तानला, तुर्कस्तानच्या सुलतानाला– जो सर्व मुसलमानांचा खलिफा होता– जी वागणूक देण्यात आली तिच्यामुळे भारतीय मुसलमानांत तीव्र असंतोष निर्माण झाला होता. खिलाफतीचा बचाव करण्यासाठी खिलाफत समिती स्थापन करण्यात आली. १९१९ मध्ये जमियत-उल् उलेमा-इ-हिंद ही परिषद स्थापन करण्यात आली. तिची उद्दिष्टे अशी होती : १. धार्मिक दृष्ट्या राजकीय आणि राज-कीयेतर बाबतीत मुसलमानांचे मार्गदर्शन करणे आणि त्यांचे धार्मिक व राष्ट्रीय हक्क संपादन करून ह्या हक्कांचे संरक्षण करणे; २. इस्लाम, इस्लामी राष्ट्रवाद, पवित्र स्थाने, विधी आणि रूढी ह्यांचे संरक्षण करणे; ३. जमातीचे संघटन करून तिची नैतिक व धार्मिक सुधारणा करण्यासाठी कार्यक्रम सुरू करणे; ४. इतर जमातींशी सख्याचे संबंध स्थापन करणे आणि देशाच्या स्वातंत्र्यासाठी लढणे; ५. धर्मप्रसार करणे आणि धार्मिक न्यायालये स्थापन करणे; ६. देशाबाहेरच्या मुसलमानांशी ऐक्याचे बंध आणि भ्रातृसंबंध प्रस्थापित करणे व वृद्धिंगत करणे.

खिलाफत चळवळीला हिंदूंनी संपूर्णपणे पाठिंबा द्यावा असे आवाहन गांधीजींनी केले. "गायीला वाचविण्याचा सर्वोत्कृष्ट आणि एकमेव मार्ग म्हणजे खिलाफतीला वाचविणे" हे विधान त्यांनी वारंवार केले. खिलाफतीचा बचाव करण्यासाठी असहकारितेची चळवळ सुरू करण्याचा इरादा त्यांनी जाहीर केला. १९२० मध्ये नागपूर येथे वेगवेगळ्या वेळी भरलेल्या लीग आणि कॉंग्रेस ह्यांच्या खास अधिवेशनांत असहकारितेचा गांधीजींनी मांडलेला कार्यक्रम स्वीकारण्यात आला. लीगच्या अधिवेशनाचे जीना अध्यक्ष होते. असहकारितेच्या कार्यक्रमाविषयी त्यांनी स्वतःचे मत व्यक्त केले नाही; पण प्रतिनिधींनी सर्व साधकबाधक घटकांचा विचार करून असह-कारितेचे तत्त्व आणि तपशील स्वीकारार्ह आहे की नाही हे ठरवावे असे आवाहन केले. कॉंग्रेसच्या अधिवेशनात मात्र त्यांनी असहकारितेला कडाडून विरोध केला आणि बहुमत आपल्याविरुद्ध आहे हे पाहून सभात्याग केला.

असहकारितेची चळवळ ऐन भरात असताना मलबारमध्ये मोपल्यांनी बंड केले. ह्या बंडात ६०० हिंदूंना ठार मारण्यात आले, हजारोंचे सक्तीने धर्मांतर घडवून आणले, अनेक हिंदू देवळे 'भ्रष्ट' करण्यात आली आणि हिंदूंची मालमत्ता मोठ्या प्रमाणावर लुटण्यात किंवा जाळण्यात

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

आली. ह्या घटनांना सरकारने भरपूर प्रसिद्धी दिली. काँग्रेसच्या अधिवेशनात ह्या बंडाची चर्चा होण्याला मुसलमान प्रतिनिधींनी निकराचा विरोध केला आणि मुसलमान पुढाऱ्यांचा एकंदर कल मोपल्यांचे समर्थन करण्याचा होता. पुढे चौरीचौऱ्याला जमावाने एका पोलिसचौकीत एक पोलिस सबइन्स्पेक्टर आणि एकवीस पोलिस यांना बंदिस्त करून जाळण्याची घटना घडल्यानंतर गांधीजींनी असहकारितेची चळवळ एकाएकी तहकूब केली. १९२४ मध्ये तुर्कस्तानने खलिफाला हद्दपार करून खिलाफत रद्द केली आणि खिलाफत चळवळ संपुष्टात आली.

काँग्रेसने खिलाफत आंदोलनाला पाठिंबा दिल्यामुळे काही काळ हिंदु-मुसलमानांच्या एकतेचा आभास निर्माण झाला व बरेच मुल्लामौलवी राष्ट्रीय चळवळीत आले हे खरे; पण जातीयवादी मुसलमानांची वृत्ती बदलली नाही. लखनौ कराराने मुसलमानांना जे लाभले होते त्यावर ते संतुष्ट नव्हते. मुसलमान अल्पसंख्य असलेल्या प्रांतांत ज्याप्रमाणे त्यांना प्रमाणाधिक्य देण्यात आले होते त्याप्रमाणे मुसलमान बहुसंख्य असलेल्या पंजाब आणि बंगाल या प्रांतांत त्यांना घटनात्मक बहुसंख्या हवी होती. माँटफर्ड सुधारणांना अनुसरून बनविण्यात आलेल्या कायदेमंडळांत मुसलमान पुढाऱ्यांनी सरकारच्या दडपशाही धोरणाला सतत पाठिंबा दिला.

मध्यंतरात जवळजवळ बंद पडलेल्या मुस्लिम लीगचे १९२४ साली फजली हुसेन आणि जीना ह्यांच्या नेतृत्वाखाली पुनरुज्जीवन करण्यात आले. लीगच्या ह्या नवीन पर्वात द्विराष्ट्रवादाचा पुनरुच्चार करण्यात आला, ब्रिटिश सरकारला पाठिंबा आणि लखनौ करारापलीकडे जाऊन मुसलमानांना अधिक राखीव जागा मिळाव्या ही तिच्या धोरणाची मुख्य सूत्रे होती. १९२४ साली सर्व राजकीय पक्षांनी मिळून स्वतंत्र भारतासाठी राज्यघटनेचा आराखडा बनविण्याच्या उद्देशाने एक सर्वपक्षीय समिती नेमली. जीना तिचे सदस्य होते. तिच्या एकंदर विचारविनिमयात जीनांनी भाग घेतला नाही. ते केवळ शेवटच्या बैठकीला उपस्थित होते आणि लखनौ करार कायम ठेवावा, फक्त पंजाब आणि बंगाल ह्यांमध्ये मुस्लिम प्रतिनिधित्व वाढवावे एवढी मागणी सादर करून ते निघून गेले. मुस्लिम लीगच्या १९२५ डिसेंबरच्या अलिगड येथील अधिवेशनात ह्याच धर्तीचा ठराव संमत करण्यात आला. लखनौ कराराप्रमाणे मुसलमानांना जे संरक्षण मिळाले होते ते कायम राखावे; पुढे जाऊन पंजाब, बंगाल आणि वायव्य सरहद्द प्रांत ह्यांत मुसलमानांना घटनात्मक बहुसंख्यत्व मिळावे; आणि लखनौ करारात दोन्ही जमातींना जो नकाराधिकार देण्यात आला होता तो घटनेचा भाग बनविण्यात यावा. १९२५ च्या पूर्वीच्या दहा वर्षांत काँग्रेसच्या अधिवेशनाला मुसलमान प्रतिनिधी मोठ्या संख्येने हजर राहत असत. त्या वर्षीच्या अधिवेशनाला अलीबंधू आणि मौलाना आझाद ह्यांच्याशिवाय कुणी मुस्लिम पुढारी उपस्थित नव्हता. पंडित मालवीय ह्या अधिवेशनाला उपस्थित होते. मुसलमानांनी काँग्रेसचा त्याग केला आहे असे उद्‌गार ही परिस्थिती पाहून त्यांनी काढले. हिंदु-मुसलमान युती संपुष्टात आली होती.

माँटफर्ड सुधारणांनी प्रांतांमध्ये लोकप्रतिनिधींना जे मर्यादित अधिकार मिळाले होते त्यांचा उपयोग मुस्लिम (आणि अन्य) जातीयवादींनी प्रांतिक कारभाराला जातीय वळण देऊन आपले राजकीय स्थान आणि देशातील जातीयवादी प्रवाह ह्यांना बळकट करण्यासाठी केला. पंजाबमध्ये फजली हुसेन ह्यांनी काउन्सिलच्या मुस्लिम सदस्यांना एकत्र करून, सरकारी सदस्यांच्या पाठिंब्याने आपले बहुमत प्रस्थापित केले. लखनौ कराराच्या धर्तीवर सरकारी नोकऱ्यांतही मुसलमानांना पन्नास टक्के जागा असल्या पाहिजेत अशी मागणी त्यांच्या पक्षाने केली आणि ती सरकारने मान्य केली. वरिष्ठ जागांमध्ये गुणवत्ता, ज्येष्ठता इ. निकष बेगुमानपणे बाजूला सारून मुसलमानांची भरती करण्यात आली. १९१९ साली ढवळून निघालेल्या पंजाबी लोकमताची भीती वाटून पंजाब सरकारने जनतेत ग्रामीण विरुद्ध शहरी अशी फूट पाडण्याचा प्रयत्न केला होता. सरकारने शेतकरी जमातींना सरकारी नोकऱ्यांत साठ टक्के जागा राखीव म्हणून ठेवल्या. आता पन्नास टक्के जागा मुसलमानांसाठी राखण्यात आल्यामुळे शहरी पंजाबी हिंदूंना सरकारी नोकऱ्यांचे क्षेत्र बंद झाल्यासारखे झाले. परिणामी पंजाबी हिंदूंना हिंदू म्हणून

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष

अनुक्रमणिका

राजकीय दृष्ट्या संघटित होण्याची गरज भासू लागली. फजली हुसेन ह्यांनी जिल्हा बोर्डाच्या निर्वाचन-क्षेत्रांचीही, जास्तीत जास्त बोर्डात मुसलमानांची बहुसंख्या व्हावी अशा रीतीने फिरून आखणी केली. त्यांच्या अमदानीत पंजाब सरकारचा कारभार, गव्हर्नरच्या पाठिंब्याने उघडपणे मुसलमानांना पक्षपाती होता.

बंगालमध्ये स्वराज्य पक्षाने कौन्सिलच्या मुस्लिम सदस्यांच्या एका गटाशी केलेल्या करारा-प्रमाणे लखनौ करारापलीकडे जाऊन मुसलमानांना बंगालमध्ये संख्येच्या प्रमाणात बहुमत असावे हे मान्य करण्यात आले. प्रत्येक जिल्ह्यात मुसलमानांना साठ टक्के जागा राखून ठेवण्यात आल्या. तसेच मुसलमानांसाठी सरकारी नोकऱ्यांत पंचावन्न टक्के जागा राखण्यात आल्या. मशिदीपुढे दिवसातल्या चोवीस तासांत वाद्ये वाजविण्यात येणार नाहीत आणि गोहत्येला पूर्ण मोकळीक असावी ह्या मुसलमानांच्या मागण्याही मान्य करण्यात आल्या. अनेक हिंदू पुढाऱ्यांनी बंगाल कराराला विरोध केला हे समजण्यासारखे आहे; पण ए. के. गझनबी आणि फजलूल हक इ. मुसलमान पुढाऱ्यांनीही त्याला, त्यांत मुसलमानांना देण्यात आलेल्या सवलती अपुऱ्या आहेत ह्या कारणासाठी विरोध केला. मात्र लखनौ कराराला मूठमाती देण्यासाठी बंगाल कराराचा त्यांनी उपयोग करून घेतला.

मध्यवर्ती कायदेमंडळात लोकप्रतिनिधींनी सरकारला सतत अडचणीत आणण्याच्या धोरणाचा यशस्वीपणे अवलंब केल्यामुळे आणि देशातील असंतोष वाढत गेल्यामुळे राजकीय सुधारणांचा पुढचा हप्ता जाहीर करण्याची पूर्वतयारी सुरू करणे सरकारला भाग पडले. भारतमंत्री बर्कनहेड यांनी १९२७ मध्ये जॉन सायमन ह्यांच्या अध्यक्षत्वाखाली ह्यासंबंधी शिफारसी करण्यासाठी एक आयोग नेमला. ह्या आयोगाचे सर्व सदस्य इंग्रज असल्यामुळे भारतीयांनी त्याच्यावर बहिष्कार घालावा असे विविध पक्षांच्या राजकीय नेत्यांनी ठरविले. त्यांत जीना समाविष्ट होते. मुस्लिम लीगच्या काही सदस्यांना हे धोरण मान्य नव्हते आणि महंमद शफी यांच्या नेतृत्वाखाली ते एकत्र आले. मुस्लिम लीगमध्ये दुफळी पडली. बहुसंख्य सदस्य जीनांच्या गटात होते. सायमन आयोगावर बहिष्कार संघटित करण्यात जीनांनी उत्साहाने सहभाग घेतला आणि महत्त्वाची कामगिरी बजाविली. जीना काही काळ पुन्हा राष्ट्राच्या मध्यवर्ती प्रवाहात सामील झाले.

तत्पूर्वी काही काळ जीनांनी २७ प्रमुख मुस्लिम नेत्यांची परिषद भरवून मुसलमानांच्या राजकीय मागण्यांविषयीचा एक ठराव सर्वानुमते स्वीकृत करून घेतला होता. त्याचा आशय असा होता : मुसलमानांना मध्यवर्ती कायदेमंडळात एकतृतीयांश जागा असतील अशी घटनात्मक तजवीज असावी; पंजाब आणि बंगाल ह्या प्रांतांत मुसलमानांना लोकसंख्येच्या प्रमाणात जागा असाव्या; वायव्य सरहद्द प्रांत आणि बलुचीस्तान ह्या विभागांत राजकीय सुधारणा अंमलात आणाव्यात; सिंध प्रांत, मुंबई इलाख्यापासून अलग करावा; आणि ह्या मागण्या मान्य झाल्या तर मुसलमानांसाठी असलेले विभक्त मतदारसंघ रद्द करून संयुक्त मतदारसंघ सर्वत्र लागू करावेत. पण ह्या मागण्यांना संमती दिलेल्या महंमद शफी आणि झुल्फिकार अलीखान यांनी आपली संमती मागे घेतली आणि मुसलमान संयुक्त मतदारसंघ कधीही स्वीकारणार नाहीत असे जाहीर केले. मुस्लिम लीगच्या जीना गटाच्या कलकत्ता येथे झालेल्या (१९२७) अधिवेशनात सायमन आयोगावर बहिष्कार घालण्याच्या धोरणाला आणि वरील मागण्यांना पाठिंबा देण्यात आला. अबुल कलम आझाद ह्यांनी ठरावावर अनुकूल भाषण करताना, लखनौ कराराने मुसलमानांच्या हिताची हानी झाली होती, प्रस्तुत तरतुदी स्वीकारण्यात आल्या तर मुसलमानांना पाच प्रांतांत बहुमत मिळेल आणि हिंदूंना नऊ प्रांतांत मिळेल, अशा आशयाची विधाने केली होती. "...नऊ प्रांतांत हिंदू मुसलमानांना जी वागणूक देतील तीच ह्या पाच प्रांतांत मुसलमान हिंदूंना देतील. हा मुसलमानांचा मोठा लाभ नाही का ? मुस्लिम हक्कांची अमलबजावणी करण्यासाठी मुसलमानांना हे नवीन शस्त्र मिळालेले नाही का ?" पुढे देशाची फाळणी झाल्यावर हिंदुस्थानातील मुसलमान किंवा पाकिस्तानातील हिंदू हे ओलीस आहेत असे मानायला आझाद ह्यांनी कडाडून विरोध केला होता. वरील भाषणात ह्या ओलीसतत्त्वाचा त्यांनी स्पष्टपणे

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

स्वीकार केला आहे. जीनांचा पहिल्यापासून संयुक्त मतदारसंघांना पाठिंबा होता. पण मुसलमानांतील नेतृत्वाचा मोठा भाग त्याच्या विरोधी आहे ह्याची दखल त्यांना घ्यावी लागत होती. ह्या ठरावावरील त्यांचे भाष्य असे होते : "...लोकांना (हृचा प्रश्नाचे) आकलन घडवून त्यांची खात्री पटविणे हे आता आपले काम आहे आणि त्यासाठी आपण शिकस्तीचे प्रयत्न केले पाहिजेत; कारण हा प्रस्ताव मुसलमानांच्या आणि भारताच्या दृष्टीने सर्वांत अधिक हितकर आहे अशी माझी खात्री आहे." शफी गटाने लाहोर येथे भरविलेल्या वेगळ्या अधिवेशनात सायमन आयोगाशी सहकार्य करावे असे आवाहन करण्यात आले होते.

१९२८ च्या प्रारंभी काँग्रेस वर्किंग कमिटीने देशातील सतरा भिन्न राजकीय पक्षांना व संस्थानांतील प्रजा, कामगार, जमीनदार, उद्योजक–व्यापारी यांच्या प्रतिनिधींना एका सर्वपक्षीय राजकीय परिषदेसाठी आमंत्रण दिले. मुस्लिम लीगच्या दोन्ही गटांनी परिषदेत भाग घेण्याचे नाकारले. पण मुस्लिमेतर राजकीय पक्षांनी, कलकत्ता येथे आपण संमत केलेल्या तजविजींना अनुमती देईपर्यंत देशाची राज्यघटना बनविण्याचे काम स्थगित करावे असा ठराव जीना लीगने केला. सर्वपक्षीय परिषदेने राज्यघटनेचा आराखडा तयार करण्यासाठी मोतीलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली. ह्या समितीचे तेजबहाद्दूर सप्रू (लिबरल पक्ष), अलिइमाम आणि शुऐब कुरेशी (मुस्लिम प्रतिनिधी), अणे व जयकर (हिंदू महासभा), प्रधान (ब्राह्मणेतर प्रतिनिधी), मंगलसिंग (शीख प्रतिनिधी), ना. म. जोशी (कामगार प्रतिनिधी) आणि सुभाषचंद्र बोस असे इतर सदस्य होते. हृचा समितीच्या शिफारसी 'नेहरू अहवाल' म्हणून प्रसिद्ध आहेत.

देशात (आणि विशेषतः पंजाब व बंगाल हृचा प्रांतांत) मुसलमानांच्या वसतीचे वितरण असे आहे की प्रौढ मताधिकार जर स्वीकारण्यात आला तर मुसलमानांच्या लोकसंख्येच्या प्रमाणापेक्षा अधिक मुसलमान प्रतिनिधी निवडून येतील ही गोष्ट समितीने दाखवून दिली. तसेच विभक्त मतदारसंघ राष्ट्रीय वृत्ती आणि अल्पसंख्याकांचे हित हृचा दोहोंना प्रतिकूल आहे हे आपले मत तिने नोंदविले. हृचा कारणासाठी विभक्त मतदारसंघ रद्द करावे अशी शिफारस समितीने केली. सिंध प्रांत मुंबई इलाख्यापासून वेगळा करावा, वायव्य सरहद्द प्रांत आणि बलुचिस्तान येथे राजकीय सुधारणा कराव्या हृचा मुसलमानांच्या मागण्याही अहवालात स्वीकारण्यात आल्या. सर्वपक्षीय परिषदेच्या लखनौ येथे भरलेल्या पुढल्या अधिवेशनात अहवालाचा विचार करण्यात आला. अधिवेशन चालू असतानाच पंजाब प्रांताच्या हिंदू आणि मुसलमान पुढाऱ्यांमध्ये जर प्रौढ मताधिकार देण्यात आला तर संयुक्त मतदारसंघ असावेत आणि कोणत्याही जमातीला राखीव जागा असू नयेत असा समझोता झाला. असाच समझोता बंगालच्या हिंदू-मुसलमान पुढाऱ्यांत झाला. अधिवेशनाने देवनागरी किंवा अरबी लिपीमध्ये लिहिलेली हिंदुस्थानी देशाची समान भाषा असावी असा ठराव मंजूर केला. अहवालाच्या मसुद्याचा अधिक विचार करण्यासाठी आणि त्याच्याविरुद्ध घेण्यात आलेल्या आक्षेपांचे समाधान करण्यासाठी विस्तारित समिती नेमण्यात आली. तिच्यावर अॅनी बेझंट, एम्. ए. अन्सारी, मालवीय, लजपतराय, आझाद, जीना, विजयराघव चारियार आणि अब्दुल कादिर कसुरी हृयांना स्वीकृत करून घेण्यात आले. पण जीनांनी समितीवर काम करण्याचे नाकारले.

राजनिष्ठ मुसलमान पुढाऱ्यांनी नेहरू अहवालाचा अव्हेर केला. हृचात आगाखानांचा पुढाकार होता. केंद्र सरकारचे स्वरूप आणि अधिकारक्षेत्र काय असावे हा विविध राष्ट्रीय पक्ष आणि राजनिष्ठ मुसलमान पुढारी हृयांच्यामधील एक वादाचा विषय होता. नेहरू अहवालाने भारत हे संघराज्य (फेडरेशन) असेल आणि प्रांतांना स्वायत्तता असेल हृचा तत्त्वांचा स्वीकार केला होता. तरीही आगाखान आणि इतर राजनिष्ठ मुसलमानांनी नेहरू अहवालाला ब्रिटिश सरकारच्या जागी हिंदू सरकार स्थापन करावयाचे आहे असा प्रचार सुरू केला. शफी लीगने आपले १९२८ चे अखिल भारतीय अधिवेशन भरविले नाही. परंतु प्रांतिक अधिवेशनांत नेहरू अहवालाचा धिक्कार केला, प्रौढ मताधिकाराला विरोध केला, मुस्लिमांसाठी स्वतंत्र मतदारसंघ, सर्व प्रांतिक मंडळांत ५० टक्के आणि केंद्र मंत्रिमंडळात ३३ टक्के जागा, सार्वजनिक सेवांत

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष

३३ टक्के राखीव जागा, सैन्य आणि पोलिस दलात ५० टक्के राखीव जागा इ. मागण्या जाहीर केल्या.

जीना लीगने १९२८ मध्ये कलकत्ता येथे भरविलेल्या अधिवेशनात बहुसंख्याक हिंदू दृष्टिकोण आणि अल्पसंख्य मुस्लिम दृष्टिकोण यांच्यातील अंतर संकुचित झाले आहे आणि मतभेद फक्त तीन मुद्द्यांसंबंधी आहे असा विचार मांडण्यात आला. हे तीन मुद्दे म्हणजे : १. बहुसंख्य मुस्लिम प्रांतांत मुसलमानांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात त्यांना राखीव जागा असाव्यात का ? २. भारत हे संघराज्य असावे की एकात्म राज्य असावे ? ३. केंद्र सरकारात मुसलमानांना कोणत्या प्रमाणात राखीव जागा असाव्यात ? जीना लीगने सर्वपक्षीय परिषदेच्या पुढील अधिवेशनासाठी एक प्रतिनिधिमंडळ पाठविण्याचा ठराव मंजूर केला. नेहरू-अहवालाला अंतिम स्वरूप देण्यासाठी भरविलेल्या सर्वपक्षीय परिषदेच्या अधिवेशनाला जीना हजर राहिले. प्रौढ मताधिकार स्वीकारण्यात आला तर पंजाब आणि बंगाल ह्या प्रांतांत मुसलमानांना राखीव जागा देण्याचे कारण नाही हे त्यांनी मान्य केले. पण नाहीतर ह्या प्रांतांत मुसलमानांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात त्यांना राखीव जागा असाव्यात ही त्यांची पहिली मागणी होती. केंद्र कायदेमंडळात मुसलमानांना ३३ टक्के राखीव जागा असाव्यात, म्हणजे पंजाब व बंगाल ह्या प्रांतांतील मुसलमानांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात व इतर प्रांतांतील मुसलमानांना प्रमाणाधिक्याने राखीव जागा असाव्यात ही दुसरी मागणी होती. तिसरी मागणी म्हणजे अवशिष्टाधिकार (रेसिड्युअल पॉवर्स) हे प्रांतांकडे असावेत.

परिषदेचे बहुमत जीनांविरुद्ध गेले व त्यांच्या मागण्या फेटाळण्यात आल्या. मुसलमान जमातीसाठी जर राखीव जागा मान्य करण्यात आल्या तर शीख, ख्रिश्चन, दलित इ. जमातीही तशी मागणी करतील ही मुख्य भीती होती. सर्वपक्षीय परिषदेला शह देण्यासाठी दिल्ली येथे १९२९ च्या वर्षारंभदिनी आगाखानांच्या अध्यक्षतेखाली मुस्लिम सर्वपक्षीय परिषद भरविण्यात आली. आपल्या अध्यक्षीय भाषणात आगाखानांनी भारतीय मुसलमान ही जमात नसून अनेक जमातींचे बनलेले ते एक राष्ट्र आहे असे जाहीर केले. परिषदेत पुढील मागण्या अंतर्भूत करणारा ठराव स्वीकृत करण्यात आला. शफी मुस्लिम लीग, खिलाफत परिषद आणि जमियत उल् उलेमा ह्यांच्या या संयुक्त मागण्या होत्या : १. विभक्त मतदार संघ; २. पूर्ण प्रांतिक स्वायत्तता व अवशिष्टाधिकार प्रांतांकडे; ३. केंद्र सरकारकडे घटकप्रांत देतील तेवढेच अधिकार; ४. जातीय नकाराधिकार; ५. मुसलमान बहुसंख्य असलेल्या प्रांतांत मुसलमानांना बहुसंख्य प्रतिनिधित्व आणि अल्पसंख्य असतील तेथे प्रमाणाधिक्य; ६. सिंध प्रांताची फारकत आणि वायव्य सरहद्द प्रांत आणि बलुचिस्तान ह्यांना प्रांतांचा पूर्ण दर्जा; ७. सार्वजनिक सेवांमध्ये पुरेशा जागा; ८. मुस्लिम संस्कृती, धर्म, भाषा, इत्यादींना संरक्षण; ९. सरकारी अनुदानात योग्य तो वाटा; १०. संघराज्याच्या सर्व घटक प्रांतांच्या अनुमतीशिवाय घटनेत बदल न करणे.

जीना मुस्लिम लीगने मुस्लिम सर्वपक्षीय परिषदेचे आमंत्रण नाकारून तिच्यात भाग घेतला नव्हता. परंतु मुस्लिम सर्वपक्षीय परिषदेच्या ह्या मागण्या जाहीर झाल्यानंतर जीनांचे अनुयायी गळू लागले. जीनांनी आपल्या लीगची दिल्ली येथे बैठक घेतली आणि तिच्यापुढे एक निवेदन ठेवले. त्याच्यात त्यांनी आपले प्रसिद्ध चौदा मुद्दे मांडले होते. दिल्ली येथील मुस्लिम सर्वपक्षीय परिषदेने केलेल्या सर्व मागण्या ह्या चौदा मुद्द्यांत समाविष्ट होत्या आणि शिवाय सायमन कमिशनपुढे इतर काही जणांनी सादर केलेल्या काही मागण्याही त्यात अंतर्भूत केल्या होत्या. ज्या अर्थी कलकत्ता सर्वपक्षीय परिषदेत जीना मुस्लिम लीगच्या प्रतिनिधींनी मांडलेल्या सूचना फेटाळल्या गेल्या, त्या अर्थी मुस्लिम लीगला आपल्या मागण्या स्वतंत्रपणे मांडण्याची मोकळीक मिळालेली आहे अशी भूमिका त्यांनी घेतली. अखेरीस बैठकीने सर्वपक्षीय परिषदेच्या कलकत्ता अधिवेशनात संमत झालेल्या निर्णयांना, त्यांत पुढील बदल करण्यात येतील ह्या अटीवर, मान्यता दिली : १. मध्यवर्ती कायदेमंडळाच्या दोन्ही गृहांत मुसलमानांना एकतृतीयांश जागा असतील अशी घटनेत तरतूद असावी; २. जर प्रौढ मताधिकार स्वीकारण्यात आला नाही तर पंजाब आणि बंगाल ह्या प्रांतांत मुसलमानांना लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्व असावे;

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

३. केंद्र सरकारला प्रांतांच्या व्यवहारात हस्तक्षेप करायला प्रतिबंध असावा; ४. पूर्ण प्रांतिक स्वायत्तता असावी; ५. मध्यवर्ती किंवा प्रांतिक कायदेमंडळाने, त्या कायदेमंडळातील मुसलमान सदस्यांचा बहुमताने पाठिंबा असल्याशिवाय, मुस्लिम कायद्यांत बदल करू नये. आपल्या लीगने कलकत्ता अधिवेशनात केलेल्या मागण्या आणि मुस्लिम सर्वपक्षीय परिषदेने केलेल्या मागण्या ह्यांत काही फरक नाही असे निवेदन जीनांनी लगेच प्रसिद्ध केले. हे अर्थात असत्य होते आणि त्याचा इन्कार अबुल कलम आझाद ह्यांनी ताबडतोब केला.

सायमन आयोगाने, अपेक्षेप्रमाणे, मुस्लिम पुढाऱ्यांच्या मागण्या बऱ्याच प्रमाणात उचलून धरल्या. मुस्लिम अल्पसंख्य असलेल्या प्रांतांच्या कायदेमंडळांत मुसलमानांना विभक्त मतदारसंघ आणि प्रमाणाधिक जागा बहाल केल्या. प्रौढ मताधिकार अमान्य करून मताधिकार २० टक्के प्रौढांपर्यंत मर्यादित केला. पंजाब आणि बंगाल ह्या प्रांतांत मात्र लखनौ कराराला अनुसरून मुसलमानांच्या जागा निश्चित व्हाव्यात किंवा आपल्या बहुसंख्येच्या जोरावर संयुक्त मतदारसंघातून निवडून येऊन मुसलमानांनी कायदेमंडळात बहुमत प्रस्थापित करावे अशी शिफारस त्याने केली. (पण भारत सरकारने सायमन आयोगाच्या अहवालावरील आपले जे मत व्यक्त केले त्यात ह्या शिफारशीला विरोध करून ह्या प्रांतांत मुस्लिम लोकसंख्येच्या प्रमाणात मुस्लिम प्रतिनिधींच्या जागा निश्चित व्हाव्यात अशी सूचना केली.) राष्ट्रीय चळवळीच्या दृष्टीने महत्त्वाचा मुद्दा असा की, भारताच्या संरक्षणासाठी, अंतर्गत शांतता राखण्यासाठी आणि भारतातील भिन्न जमातींना निःपक्षपातीपणे वागविले जाईल ह्याची हमी म्हणून भारतात ब्रिटिश सत्तेचे अस्तित्व बराच काळ टिकणे आवश्यक आहे ह्या भूमिकेचा अहवालात पुरस्कार करण्यात आला होता. पण मुसलमान पुढाऱ्यांना सायमन आयोगाच्या शिफारसी अपुऱ्या वाटल्या. त्यांचा मुख्य असंतोष सरकारी नोकऱ्यांमध्ये मुसलमानांना खास हिस्सा असावा ही मागणी आयोगाने स्वीकारली नाही ह्यामुळे होता.

सायमन आयोगाचा अहवाल १९३० मध्ये प्रसिद्ध झाला. पण त्यापूर्वीपासूनच देशातील राजकीय वातावरण तापू लागले होते. काँग्रेसमधील तरुण पिढीचा वाटाघाटी आणि समझोता ह्या मार्गांवरील विश्वास ढळू लागला होता. विद्यार्थी, शेतकरी, कामगार ह्यांच्या चळवळी जोम धरू लागल्या होत्या आणि दहशतवादी चळवळही नव्याने संघटित होऊ लागली होती. मे १९२९ मध्ये व्हाइसरॉय आर्यविन ह्यांनी केंद्रीय कायदेमंडळाची मुदत बेमुदत वाढविली. ह्या वातावरणात निवडणूक घेणे सरकारला परवडणारे नव्हते. ह्यानंतर लवकरच लंडनशी सल्लामसलत करून व्हाइसरॉय ह्यांनी "डोमिनीअन स्टेटसची अंतिम स्थापना १९१७ च्या जाहीरनाम्यात अभिप्रेत आहे आणि राज्यघटनेतील तरतुदीविषयी भारतीय पुढाऱ्यांत शक्य तितके एकमत निर्माण करण्याच्या उद्देशाने एक गोलमेज परिषद बोलविण्याचा सरकारचा इरादा आहे" असे जाहीर केले. १९३० च्या काँग्रेसच्या अधिवेशनात 'नेहरू-अहवालाला रावीच्या प्रवाहात जलसमाधी देण्यात आली', संपूर्ण स्वातंत्र्य हे राष्ट्रीय साध्य म्हणून स्वीकारण्यात आले आणि देशव्यापी सविनय कायदेभंगाची चळवळ सुरू करण्याचा इरादा जाहीर करण्यात आला.

ब्रिटिश सत्ता आणि काँग्रेसच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्योत्सुक भारतीय जनता परस्परांविरुद्ध ठाकलेले आहेत अशा ह्या संघर्षाच्या परिस्थितीत स्पष्टपणे राष्ट्रवादी भूमिका घेणाऱ्या मुसलमानांचा एक लहान पण प्रभावी गट उदयाला आला. जुलै १९२९ मध्ये युसुफ मेहेरअली आणि एस्. ए. ब्रेलवी ह्यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस मुस्लिम पक्षाची स्थापना करण्यात आली. आगाखान आणि महंमद शफी इ. 'हुजरे, खुशामतखोर' पुढारी भारतीय मुसलमानांचे खरे नेते नव्हेत असे जाहीर करण्यात आले. ह्याच महिन्यात अलाहाबाद येथे अखिल भारतीय राष्ट्रवादी मुस्लिम परिषद भरविण्यात आली. आझाद हे तिचे अध्यक्ष होते आणि राष्ट्राच्या स्वातंत्र्याची किंमत देऊन मुस्लिम पक्ष आपला राजकीय स्वार्थ साधत असतात, असा आरोप परिषदेत करण्यात आला. लाहोर येथेही राष्ट्रवादी मुस्लिमांची परिषद भरविण्यात आली. काँग्रेसने सुरू केलेल्या स्वातंत्र्यसंग्रामात मुसलमानांनी मोठ्या संख्येने भाग घ्यावा असे आझाद व अन्सारी यांनी आवाहन केले.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष

विशेषत: वायव्य सरहद्द प्रांतात खान अब्दुल गफारखान ह्यांच्या नेतृत्वाखाली पठाणांनी राजकीय सुधारणांसाठी उग्र आंदोलन केले. अन्य ठिकाणीही अनेक मुसलमान पुढारी स्थानिक लढ्या समितीमध्ये भाग घेत होते आणि लढ्याचे नेतृत्व करीत होते.

जातीयवादी मुसलमानांची प्रतिक्रिया अपेक्षित होती. त्यांनी, उदा. अलिबंधु, शफी, दाउदी, इस्माइल खान इत्यादींनी देशाचे स्वातंत्र्य जाहीर करणाऱ्या लाहोर काँग्रेसच्या ठरावाचा निषेध केला आणि स्वातंत्र्यसमारंभात मुसलमानांनी सहभागी होऊ नये असे आवाहन केले. मुस्लिम लीगचे जीना आणि शफी गट एक झाले आणि त्यांनीही लाहोर ठराव आणि सविनय कायदेभंगाची चळवळ ह्यांचा निषेध केला. ठिकठिकाणी मुसलमान-हिंदू दंगली झाल्या. पोलिसांची वागणूक स्पष्टपणे मुसलमानांना पक्षपाती होती. विशेषत: संयुक्त प्रांतात मुसलमान जमीनदारांनी सरकारच्या दडपशाहीला सक्रिय साहाय्य केले.

दरम्यान लंडनला गोलमेज परिषदेचे पहिले अधिवेशन भरले. मुसलमानांना पुरेसे संरक्षण देण्यात येईपर्यंत, म्हणजे त्यांचे समाधान होईपर्यंत कोणत्याही राजकीय सुधारणा करण्यात येऊ नयेत असा मुसलमान सदस्यांनी एकमुखी आग्रह धरला. ह्या परिषदेत जीना हे काँग्रेस आणि सविनय कायदेभंगाची चळवळ ह्यांच्या विरोधात उभे राहिलेल्या जातीयवादी मुसलमानांना पूर्णपणे सामील झालेले दिसले. काँग्रेसच्या पुढाऱ्यांना गोलमेज परिषदेत भाग घेता यावा म्हणून ब्रिटिश सरकारने पुढाकार घेऊन गांधीजींशी समझोता केल्यावर परिषदेच्या पुढील अधिवेशनाची पूर्वतयारी सुरू झाली. राष्ट्रवादी मुसलमानांनी मुस्लिम लीग आणि मुस्लिम परिषद यांच्या पुढाऱ्यांशी बोलणी सुरू केली, पण ती फिसकटली. त्यांच्या आग्रहामुळे काँग्रेस वर्किंग कमिटीने जातीय प्रश्नावर एक दीर्घ ठराव स्वीकृत केला. त्यात भारतातील प्रत्येक जमातीला तिची संस्कृती, भाषा, लिपी, शिक्षण, धार्मिक श्रद्धा आणि आचरण व व्यक्तिगत कायदे ह्यांच्या बाबतीत पूर्ण संरक्षण मिळेल अशी हमी देण्यात आली. देशाची भावी राज्यघटना संघराज्यात्मक असेल व अविशिष्टाधिकार घटक-राज्यांकडे राहतील हे स्पष्ट करण्यात आले. घटनेत प्रौढ मताधिकार व संयुक्त मतदारसंघ यांची तजवीज असेल, सिंधमध्ये हिंदूंना, आसाममध्ये मुसलमानांना, पंजाब व वायव्य सरहद्द प्रांत यांत शिखांना त्यांच्या संख्येच्या प्रमाणात राखीव जागा असतील इत्यादी आश्वासने देण्यात आली. केंद्र आणि प्रांतीय मंत्रिमंडळांत अल्पसंख्याकांना प्रतिनिधित्व असेल असे संकेत पाळण्यात येतील असे वचन देण्यात आले. मुस्लिम लीग आणि मुस्लिम परिषद यांनी हा ठराव फेटाळून लावला. जीनांचे १४ मुद्दे आणि मुस्लिम परिषदेच्या मागण्या (ह्या दोन भिन्न गोष्टी नव्हत्याच) सर्व राजकीय पक्षांनी स्वीकारल्याशिवाय जातीय प्रश्न सुटणार नाही असे त्यांनी जाहीर केले. मुस्लिम परिषदेच्या अधिवेशनाला जीना विशेष निमंत्रित म्हणून उपस्थित होते. मुसलमानांनी स्वत:मध्ये ऐक्य प्रस्थापित करावे असे कळकळीचे आवाहन त्यांनी केले आणि राष्ट्रवादी मुसलमानांनी मुस्लिम जमातीच्या मध्यवर्ती प्रवाहात सामील व्हावे असे त्यांना आमंत्रण दिले. जीना आता मुस्लिम जमातीच्या मुख्य प्रवाहात निष्ठेने प्रविष्ट झाले होते. गांधीजींनी जीनांबरोबर बोलणी सुरू करण्याचा प्रयत्न केला आणि राष्ट्रवादी मुसलमान धरून सर्व मुसलमान पुढारी एकमताने ज्या मागण्या सादर करतील त्या मान्य करण्याचे आगाऊ आश्वासन दिले. पण दोन अटी होत्या. संपूर्ण राष्ट्रीय स्वातंत्र्यासाठी काँग्रेसने चालविलेल्या प्रयत्नांत मुसलमानांनी सहभागी झाले पाहिजे ही एक अट आणि दुसरी, हिंदू-मुसलमानांचा समझोता इतर अल्पसंख्याकांना अन्याय्यकारक असता कामा नये. जीनांनी ह्या बोलण्यात भाग घेण्याचे नाकारले आणि "हजारो गांधींशी लढा द्यायला पुढे या" असे मुसलमानांना आवाहन केले.

गांधीजी दुसऱ्या गोलमेज परिषदेला आल्याबरोबर त्यांना अल्पसंख्याक उपसमितीवर घेण्यात आले. उपसमितीच्या पहिल्याच बैठकीत आंबेडकर आणि अँग्लो-इन्डियन प्रतिनिधींनी, गांधीजी आणि मुस्लिम प्रतिनिधी ह्यांच्यात झालेला कोणताही समझोता जर इतर अल्पसंख्याकांना अन्याय करणारा असेल तर तो आपण स्वीकारणार नाही असे जाहीर केले. विविध जमातींच्या प्रतिनिधींनी जातीय प्रश्न सर्वांचे समाधान होईल अशा रीतीने सोडविण्याचे

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष

केलेले अनेक प्रयत्न असफल ठरल्यानंतर गांधीजींनी ह्या प्रश्न लीग ऑफ नेशन्स, वरिष्ठ न्यायाधीश ह्यांसारख्या एखाद्या अपक्ष मंडळाकडे सोपवावा असे सुचविले. इतर सर्व पक्ष विभागीय हितसंबंधांचे प्रतिनिधित्व करतात, फक्त काँग्रेस सबंध भारतीय जनतेचे प्रतिनिधित्व करते, काँग्रेस सर्व प्रकारच्या जातीय वादाविरुद्ध आहे, ती वंश–धर्म–वर्ण अशा भेदांना थारा देत नाही असा काँग्रेसच्या वतीने त्यांनी दावा केला. ब्रिटिश पंतप्रधान मॅक्डोनाल्ड ह्यांनी, जर भारतीय प्रतिनिधींना लवकरच जातीय प्रश्न सोडविता आला नाही तर ब्रिटिश सरकार जातीय निवाडा देईल; पण अखिल भारतीय संघराज्य अस्तित्वात आणण्याचा सरकार प्रयत्न करील आणि नव्या राज्यघटनेत अल्पसंख्याकांच्या नैसर्गिक हक्कांचे संरक्षण करणाऱ्या तरतुदी असतील असे जाहीर केले.

दुसऱ्या गोलमेज परिषदेने राजनिष्ठ जातीयवादी मुसलमान पुढारी आणि ब्रिटिश सरकार ह्यांच्यामधील पूर्वापार एकजुटीला नवीन बळकटी आली. ह्या स्नेहरज्जूमध्ये एक नवीन धागाही गुंफण्यात आला. तो म्हणजे पूर्वास्पृश्य आणि संस्थानिक ह्या भारतीय राजकारणात उदयाला आलेल्या नवीन शक्ती. पूर्वास्पृश्यांचे एक पुढारी एम्. सी. राजा ह्यांनी आपल्या जमातीने मुस्लिम, अँग्लो-इंडियन, भारतीय ख्रिस्ती, इत्यादी जमातींशी हातमिळवणी करून संयुक्त मतदारसंघाला विरोध केला पाहिजे असे प्रतिपादन केले. ब्रिटिश सरकारने भारतीय लोकप्रतिनिधींकडे भरघोसपणे सत्तांतर केले तर इथे हिंदूंचे (किंवा सवर्ण हिंदूंचे) जुलमी राज्य प्रस्थापित होईल ह्या कारणासाठी ह्या जमातींच्या प्रतिनिधींचा सत्तांतराला विरोध होता. आंबेडकरांनी गोलमेज परिषदेत केलेली विधाने अशी होती, "ब्रिटिशांपासून भारतीय जनतेकडे ताबडतोब सत्तांतर व्हावे यासाठी डिप्रेस्ड वर्ग उत्सुक नाहीत, ते तसा आरडाओरडा करीत नाहीत, ह्या मागणीसाठी त्यांनी आंदोलन सुरू केलेले नाही... पण जर राजकीय सत्तेचे हस्तांतर व्हावे म्हणून कलकलाट करणाऱ्या ज्या शक्ती देशात निर्माण झाल्या आहेत त्यांचा प्रतिकार करायला ब्रिटिश सरकार असमर्थ असेल– आणि आम्हाला हे माहीत आहे की डिप्रेस्ड वर्ग आजच्या परिस्थितीत ह्या मागणीला विरोध करायला असमर्थ आहेत– तर आमचे म्हणणे असे आहे की जर तुम्ही सत्तांतर केले तर त्या सत्तांतराबरोबर अशा अटी आणि तरतुदी असल्या पाहिजेत की त्यांच्यामुळे सत्ता एका कंपूच्या... हाती पडणार नाही; सर्व जमातींचा त्यांच्या संख्येच्या प्रमाणात सत्तेमध्ये हिस्सा असेल अशा रीतीने हा प्रश्न सोडविला पाहिजे."

दुसऱ्या गोलमेज परिषदेच्या अपयशानंतर देशातील राजकीय आंदोलनाने फिरून जोर धरला आणि व्हाइसरॉय विलिंग्डन यांनी दडपशाहीचे धोरण उग्रतर केले. ह्या संघर्षात (राष्ट्रवादी मुसलमान सोडले तर) एकंदर मुस्लिम नेतृत्व सरकारच्या बाजूने उभे राहिले. जून १९३१ मध्ये वीस राजनिष्ठ मुस्लिम नेत्यांनी भारत व इंग्लंड येथे एकाच वेळी एक जाहीरनामा प्रसिद्ध केला. त्यात मुसलमान जमातीने ब्रिटिशांविषयी जो स्नेहभाव व्यक्त केला आहे त्याची ब्रिटिशांनी योग्य ती दखल घ्यावी आणि पुढील कारणांसाठी मुस्लिम जमातीच्या मागण्या मान्य कराव्या असे आवाहन केले : (१) ब्रिटिशांच्या भारतीय सैन्यात बहुसंख्य मुसलमान आहेत; (२) वायव्य सरहद्द प्रांत सोडला तर काँग्रेसच्या चळवळीपासून ते अलिप्त आहेत; (३) एकही मुसलमान दहशतवादी चळवळीत सामील झालेला नाही; (४) मुस्लिम वर्तमानपत्रांनी सरकारला सातत्याने, एकनिष्ठपणे पाठिंबा दिला आहे. ह्याबरोबरच ब्रिटिशांनी आपली सत्ता भारतीय संघराज्याकडे किंवा केंद्राकडे सुपूर्द न करता ती सरळ स्वायत्त प्रांतांकडे सुपूर्द करावी ही मुस्लिम मागणी अधिक नेटाने पुढे करण्यात येऊ लागली. अनेक ब्रिटिश अधिकारीही भारत हा एक देश नसून एक उपखंड आहे अशी भाषा बोलू लागले. अलिगडच्या मुहामेडन अँग्लो-इन्डियन कॉलेजचे भूतपूर्व प्राचार्य थिओडोर मॉरिसन ह्यांनी १९३२ मध्ये प्रसिद्ध केलेल्या एका लेखात असे प्रतिपादन केले की, "हिंदू आणि मुसलमान ही दोन भिन्न राष्ट्रे आहेत. कोणत्याही दोन युरोपिअन राष्ट्रांएवढीच ती परस्परांहून भिन्न आहेत. 'परक्या' सरकारखाली, विशेषतः सर्व नागरिकांना समान साच्यात घालू पाहणाऱ्या लोकशाही सरकारखाली

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

मुस्लिम संस्कृती टिकू शकणार नाही. आपल्या वैशिष्टयपूर्ण संस्कृतीचे संरक्षण करण्याविषयी मुसलमानांना जी कळकळ, अगत्य वाटत आहे त्यात ते एकाकी नाहीत असा भरवसा मुसलमानांनी बाळगावा."

राष्ट्रीय आंदोलन सुरू झाले की त्याला छेद देणाऱ्या जातीय दंगलींमध्ये लक्षणीय वाढ होते हा जुना अनुभव ह्या वेळीही आला. मुस्लिम जातीय प्रचाराला नवीन भर आला. परदेशी मालावर बहिष्कार घालण्याचे आंदोलन मुसलमान दुकानदारांविरुद्ध आहे असा शौकत अली यांनी १९३२ मध्ये आरोप केला. मुस्लिम सनातनीवादाचे पुरस्कर्ते मौलाना मौदुदी यांनी स्वामी श्रद्धानंदांच्या (पूर्वी झालेल्या) खुनाचे, मुसलमानांचे अनिवार्य कर्तव्य असलेल्या जिहादमधील एक कृत्य म्हणून समर्थन केले. देशात आदर्श इस्लामी सरकार स्थापन करणे हे जिहादचे साध्य आहे, 'अयोग्य' माणसांनी चालविलेले अधार्मिक सरकार हे स्वतः अनिष्ट असतेच पण त्यातून सर्व प्रकारचा नैतिक भ्रष्टाचार माजतो हे त्यांच्या भूमिकेचे सार होते.

मुसलमानांना स्वातंत्र्य-आंदोलनापासून अलिप्त राखण्यासाठी हे सर्व भगीरथ प्रयत्न चालले असताना अनेक मुसलमान स्वातंत्र्यसैनिक त्याच्यात सहभागी होत होते. १९३० च्या जागतिक मंदीमुळे कनिष्ठ मध्यमवर्गीय आणि शेतकरी-कामगार यांची आर्थिक दुरवस्था वाढली होती आणि सर्वसामान्य हिंदू-मुसलमान जनतेला ब्रिटिशांनी चालविलेल्या राजवटीत आपली आर्थिक पिळवणूक होते आणि तिच्यात वरिष्ठवर्गीय हिंदू-मुसलमान यांची भागीदारी असते हे दिसू लागले होते. राजकारणात आर्थिक प्रश्नांना प्राधान्य येऊ लागले. बंगालमध्ये ८६ टक्के जनता शेतकरी-शेतमजूर आहे, तिला पुरेसे प्रतिनिधित्व मिळाले पाहिजे, मुसलमान शेतकऱ्यांनी हिंदू शेतकऱ्यांशी एकजूट करून उभयतांची स्थिती सुधारण्याचा प्रयत्न केला पाहिजे, ह्यासाठी ह्या दोघांत भिंत उभी करणारे स्वतंत्र मतदारसंघ रद्द करून संयुक्त मतदारसंघ स्थापन केले पाहिजेत अशी बंगाल मुस्लिम लीगने मागणी केली व तिला अनुसरून बंगालच्या कायदेमंडळाने स्वतंत्र मतदारसंघ नाहीसे करावे आणि संयुक्त मतदारसंघांची निर्मिती करावी असा ठरावही केला. पूर्वास्पृश्यांचे एक पुढारी एम्. सी. राजा ह्यांनीही ज्यात डिप्रेस्ड वर्गाला राखीव जागा आहेत अशा प्रौढ मताधिकारावर आधारलेल्या संयुक्त मतदारसंघांची मागणी केली आणि प्रौढ मताधिकाराला विरोध करणाऱ्या आणि वरिष्ठवर्गीय मुसलमान नेतृत्वाशी हातमिळवणी करणाऱ्या डॉ. आंबेडकरांविरुद्ध पवित्रा घेतला.

स्वतंत्र मतदारसंघ रद्द करायची ब्रिटिश सरकारला ही चांगली संधी होती. पण मॅक्डोनाल्ड ह्यांनी जो जातीय निवाडा दिला त्यात मुस्लिम, शीख, ख्रिश्चन, अँग्लो-इन्डियन आणि युरोपिअन ह्यांच्यासाठी वेगवेगळे मतदारसंघ कायम करण्यात आले. पूर्वास्पृश्यांसाठी काही वेगळे मतदारसंघ स्थापन करण्यात आले. आणि उरलेल्या सर्वसामान्य मतदार संघांतही त्यांना मताधिकार देण्यात आला. मुसलमानांना ते अल्पसंख्य असलेल्या प्रांतांत पूर्वी जे प्रमाणाधिक्य देण्यात आले होते ते राखण्यात आले. एकंदरीत मुसलमानांच्या बाजूने ह्या निवाड्यात बराच पक्षपात करण्यात आला होता. मुसलमान पुढाऱ्यांनी निवाड्याचे सामान्यपणे स्वागत केले; पण पंजाब आणि बंगाल या प्रांतांत मुसलमानांना घटनात्मक बहुमत देण्यात आले नाही म्हणून त्याचा निषेधही त्यांनी केला.

ह्या घडीला आझाद, सय्यद महमूद, इ. राष्ट्रवादी मुसलमानांनी परस्परांत वाटाघाटी करून एक करार घडवून आणावा म्हणून प्रयत्न सुरू केले. अपेक्षेप्रमाणे राजनिष्ठ मुसलमानांनी त्यांचा कडाडून निषेध केला. तरीही काँग्रेस, हिंदू महासभा, लिबरल फेडरेशन, नॅशनलिस्ट पार्टी, खिलाफत कॉन्फरन्स, मुस्लिम कॉन्फरन्स, राष्ट्रवादी मुस्लिम, जमियत-उल-उलेमा, मुस्लिम लीग, अहरार, शिया कॉन्फरन्स, वेगवेगळे शीख पक्ष, ख्रिश्चन संघटना, सिंध व पंजाब हिंदू इत्यादींनी अलाहाबादच्या 'एकता परिषदे'त भाग घेतला. परिषदेने मुसलमानांना पंजाब आणि बंगाल ह्या प्रांतांत घटनात्मक बहुमत दिले; मुस्लिम अल्पसंख्य असलेल्या प्रांतांत मुसलमानांना प्रमाणाधिक्य दिले; मध्यवर्ती कायदेमंडळात मुसलमानांना ३२ टक्के राखीव जागा दिल्या, इ. आणि संयुक्त मतदारसंघाला मान्यता

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

दिली. पण मुस्लिम कॉन्फरन्स आणि जमियत-उल-उलेमाचा फुटून निघालेला गट यांनी ह्या शिफारसी फेटाळल्या. यानंतर दोनच दिवसांनी भारतमंत्र्यांनी जातीय निवाड्याचा अवशिष्ट भाग जाहीर करून मुसलमानांना संघराज्याच्या कायदेमंडळात आणि मंत्रिमंडळात ३३$\frac{1}{3}$ टक्के जागा राखीव असतील असे जाहीर केले. एकता परिषदेचे प्रयत्न निरर्थक ठरले. ह्या संदर्भात आझादांनी केलेले विधान असे होते की ते जीनांची १४ कलमे स्वीकारायच्या विरुद्ध होते, पण समझोता व्हावा म्हणून त्यांनी ती स्वीकारली; पण ही १४ स्वीकारली जाण्याबरोबरच समझोता घडून येऊ नये म्हणून आणखी ६ कलमे पुढे करण्यात आली. ह्या संदर्भातील जीनांची प्रतिक्रिया नमूद करण्यासारखी आहे. मुसलमानांनी आपल्या १४ कलमांना चिकटून रहावे आणि ह्या बाबतीत समाधान झाले तर केवळ विभक्त मतदारसंघाच्या मागणीला चिकटून राहू नये असा त्यांचा प्रारंभीचा सल्ला होता. पण अलाहाबाद समझोता घडून येण्याच्या सुमाराला त्यांनी त्याच्या उपयुक्ततेविषयी निराशा व्यक्त करणारे निवेदन प्रसिद्ध केले.

एव्हाना जातीयवादी मुस्लिम राजकारणाचे नेतृत्व करणारी ज्येष्ठ पुढाऱ्यांची पिढी अस्तंगत झाली होती. जीनांना मुस्लिम लीगचे तहहयात अध्यक्ष होण्यासाठी पाचारण करण्यात आले. ते स्वीकारून त्यांनी मुस्लिम लीग कौन्सिलची फेब्रुवारी १९३४ मध्ये सभा भरविली. जातीय निवाड्याला त्यांनी आपली संपूर्ण संमती व्यक्त केली, पण राष्ट्रीय स्वायत्ततेच्या मागणीला पाठिंबा देण्याची तयारीही दाखविली. ह्याने राष्ट्रीय मुसलमानांच्या आशा उंचावल्या. ऑगस्ट १९३४ मध्ये जातीय निवाड्याचा तिसरा भाग जाहीर करण्यात आला. मुसलमानांना मध्यवर्ती सरकारी आणि रेल्वे नोकऱ्यांत २५ टक्के जागा राखीव म्हणून देण्यात आल्या. इतर अल्पसंख्याकांसाठी ८$\frac{1}{3}$ टक्के जागा राखून ठेवण्यात आल्या. ह्या जागा केवळ लोकसंख्येच्या प्रमाणात आहेत, प्रमाणाधिक्याचे तत्त्व स्वीकारून ३३$\frac{1}{3}$ टक्के जागा मुसलमानांना देण्यात आल्या नाहीत म्हणून जीनांच्या अध्यक्षतेखाली मुस्लिम लीगने निषेध केला. वर्षाच्या अखेरीस मध्यवर्ती कायदेमंडळाच्या झालेल्या निवडणुकीत जीना धरून जीना गटाचे २२ सदस्य निवडून आले. जीनांनी एकंदरीत अधिकारी सदस्य आणि सरकारने नेमलेले सदस्य ह्यांच्या गटाच्या पाठिंब्याने कायदेमंडळात काँग्रेसविरोधी धोरणाचा अवलंब केला. जातीय प्रश्न सोडविण्यासाठी काँग्रेसचे अध्यक्ष राजेंद्रप्रसाद ह्यांनी जीनांशी परत बोलणी सुरू केली आणि उभयतांना मान्य असा एक आराखडाही बनविण्यात आला. पण त्याला काँग्रेसने हिंदू महासभेचीही संमती मिळवावी असा जीनांनी आग्रह धरला. जातीय निवाड्याला हिंदू महासभेने सतत केलेला विरोध ध्यानी घेता हे शक्य नव्हते. तेव्हा ह्या बोलण्यातून काही निष्पन्न झाले नाही. जीनांचे अडवणुकीचे धोरण कधी बदलले नाही.

१९३५ च्या कायद्यात जातीय निवाडा समाविष्ट करण्यात आला, प्रांतांना बऱ्याच प्रमाणात स्वायत्तता देण्यात आली, आणि प्रांत आणि संस्थाने ह्यांच्या मिळून बनलेल्या संघराज्याची योजना स्वीकारण्यात आली. पन्नास टक्के संस्थानिक स्वखुषीने संघराज्यात सामील होईपर्यंत, संघराज्य अस्तित्वात येईपर्यंत केंद्र सरकार १९१९ च्या कायद्याप्रमाणे चालणार होते. अर्थात संस्थानिक कधी संघराज्यात सामील झाले नाहीत आणि ते अस्तित्वात आले नाही. थोडक्यात, जातीयवादी मुसलमानांची सत्तांतर केंद्राकडे न होता सरळ प्रांतांकडे व्हावे ही मागणी मान्य झाली.

जीनांच्या अध्यक्षतेखाली पुनःसंघटित झालेल्या मुस्लिम लीगचे उद्दिष्ट भारतीय मुसलमानांची एकमेव प्रतिनिधी हे स्थान लीगला प्राप्त करून देण्याचे होते. ह्यासाठी नव्या कायद्याखाली होणाऱ्या प्रांतिक निवडणुकांत बहुसंख्याक मुस्लिम प्रांतांत लीग सरकारे स्थापन करू शकेल आणि अल्पसंख्याक प्रांतांत सरकारांत हिस्सा मिळवू शकेल–जीनांच्या १४ कलमांप्रमाणे $\frac{1}{3}$ हिस्सा एवढे लीगचे उमेदवार निवडून आणणे आवश्यक होते. पण हे साधण्याचा प्रयत्न करण्याइतकेही मुस्लिम लीगचे सामर्थ्य नव्हते. पंजाबमधील शिकंदर हयत खान यांचा युनियनिस्ट पक्ष, बंगालमधील फजलूल हक यांचा कृषक प्रजा समिती पक्ष, इ. प्रादेशिक मुस्लिम पक्षांनी मुस्लिम लीगमध्ये विलीन होण्याची गोष्ट सोडाच, पण

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष

तिच्याशी पूर्णपणे सहकार्य करण्याचेही नाकारले. अखिल भारतीय बाबींमध्ये ते लीगचे नेतृत्व स्वीकारायला तयार होते; पण प्रादेशिक बाबींत त्यांना सवतासुभा हवा होता. संयुक्त प्रांतासारख्या लीगच्या दृष्टीने महत्त्वाच्या असलेल्या प्रांताच्या लीगमध्ये तीन भिन्न गटांची तिफळी होती. संयुक्त प्रांताच्या ६६ मुस्लिम जागांतील फक्त ३५ जागांसाठी लीग उमेदवार उभे करू शकली.

निवडणुकीचे निकाल जाहीर झाले तेव्हा सर्वांना धक्का बसला. मुस्लिम अल्पसंख्य असलेल्या प्रांतांत काँग्रेसने झंझावाती विजय मिळविला होता. हिंदू महासभेचे उमेदवार कोसळले होते. उलट लीगची दुर्दशा झाली होती. बहुसंख्य मुसलमान प्रांतांतील पंजाबात लीगला ८४ पैकी १, सिंधमध्ये ३३ पैकी ३, आणि वायव्य सरहद्द प्रांतात ० जागा मिळाल्या होत्या. अल्पसंख्य प्रांतांत ती अधिक यशस्वी ठरली होती. मुंबई प्रांतात २९ तील २०; संयुक्त प्रांतात ६४ तील २७, मद्रासमध्ये २८ तील १० आणि आसामात ३४ तील ९ असा ह्या यशाचा हिशोब होता.

काँग्रेसच्या यशाने राष्ट्रवादी मुसलमानांची उमेद वाढली. अलाहाबादमध्ये १९३६ च्या मेमध्ये भरलेल्या राष्ट्रवादी मुस्लिम परिषदेत मुसलमानांनी मोठ्या संख्येने काँग्रेसमध्ये यावे आणि स्वातंत्र्य-लढ्यात सहभागी व्हावे असे आवाहन करण्यात आले. आर्थिक प्रश्नांना महत्त्व येत आहे आणि जातीय प्रश्न मागे पडत आहेत, धार्मिक विभागणी अस्पष्ट होत जाऊन जमीनदार-तालुकदार, शेतकरी-कुळे, मालक-कामगार हे वर्ग त्यांची जागा घेत आहेत, मुसलमान कुळे आणि हिंदू कुळे ह्यांचे हितसंबंध समान आहेत ह्याची जाणीव शेतकरी वर्गात, हिंदूंत आणि मुसलमानांत पसरत आहे असे दृश्य दिसू लागले होते. काँग्रेसने मुसलमान बहुजनसमाजाशी संपर्क वाढविण्याची – 'मास-कॉन्टॅक्ट' – मोहीम हाती घेतली. तिला जीनांनी तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली. जातीय प्रश्न सोडविण्यापूर्वी बहुजन समाजाचे भुकेचे व गरिबीचे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करणे हा 'आधी कळस मग पाया' असा प्रकार आहे, ह्या पद्धतीने हे प्रश्न सोडविण्यात कुणाला यश येणार नाही असा इशारा त्यांनी दिला.

सर्व भारतीय मुसलमानांना मुस्लिम लीगच्या छत्राखाली संघटित करण्याचा निकराचा प्रयत्न जीनांनी सुरू केला. मे महिन्यात संयुक्त प्रांताच्या मुस्लिम लीगच्या संसदीय मंडळाच्या बैठकीत काही सदस्यांनी काँग्रेसशी आपण सहकार्य करावे असे जेव्हा सुचविले, तेव्हा "सध्या तरी आपण काँग्रेसशी किंवा सरकारशी जूट न करता, मुसलमानांना संघटित करून शक्ती कमावेपर्यंत वाट पाहू या" असा सल्ला त्यांनी दिला. जूनमध्ये एका पोटनिवडणुकीत लीगच्या उमेदवाराविरुद्ध काँग्रेसने जेव्हा आपला उमेदवार उभा केला तेव्हा यामुळे इस्लाम धोक्यात आला आहे अशी गर्जना जीनांनी केली आणि मुस्लिम मतदारांना अतिरेकी जातीय भाषेत आवाहन केले. जवाहरलाल नेहरूंनी धार्मिक व जातीय भावना भडकविण्याच्या ह्या प्रयत्नाचा तीव्र निषेध केला. जीना भारताला परत कृष्णयुगाकडे घेऊन जाण्याच्या खटपटीत आहेत असे भाष्य त्यांनी केले.

ह्या सुमाराला घडलेला एक प्रसंग नमूद करणे आवश्यक आहे. चौधरी खलिक उझामन ह्या संयुक्त प्रांतातील मुस्लिम लीगच्या पुढाऱ्याने संयुक्त प्रांतात काँग्रेस-लीग यांचे संयुक्त मंत्रिमंडळ बनविण्यात यावे म्हणून प्रयत्न सुरू केले होते. जीनांनी त्यांना काही अटींवर आशीर्वाद दिला होता. अखिल भारतीय पातळीवर जातीय समझोता होईपर्यंत जातीय निवाड्याला आणि स्थानिक संस्थांमध्ये मुसलमानांच्या वेगळ्या प्रतिनिधित्वाला बाधा येईल असे काही करू नये ही त्यांतील एक अट होती. चौधरी खलिक उझामन यांनी मंत्रिमंडळात मुसलमानांना ३३⅓ टक्के प्रतिनिधित्व पाहिजे अशी मागणी केली; ती आझादांनी मान्य केली. पण आपण मंत्रिमंडळाच्या संयुक्त जबाबदारीचे तत्त्व मान्य करू, आणि कायदेमंडळात वेगळा गट म्हणून बसणार नाही अशा करारनाम्यावर चौधरींनी सही करावी असे सुचविले. हे चौधरींनी मान्य केले, पण दोन अटी पुढे केल्या. एक म्हणजे जातीय प्रश्नांच्या बाबतीत मुस्लिम लीगला कृतिस्वातंत्र्य आणि उच्चारस्वातंत्र्य दिले पाहिजे; त्यांच्या कृती आणि मते काँग्रेसच्या विरुद्ध असली तरी त्यांना आक्षेप घेता कामा नये. दुसरी अट म्हणजे आपण स्वतः आणि नबाब इस्माइल खान यांना मंत्रिमंडळात

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

घेतले पाहिजे. ह्या अटी स्वीकारणे अशक्य होते. जातीय प्रश्न धरून सर्व बाबतीत मंत्रिमंडळाच्या संयुक्त जबाबदारीचे तत्त्व स्वीकारले पाहिजे असा काँग्रेसचा आग्रह होता. शिवाय नबाव इस्माइल खान हे बडे जमीनदार होते. त्यांना मंत्रिमंडळात घेण्याला बऱ्याच काँग्रेसजनांचा तीव्र विरोध होता. ही बोलणी अर्थात फिसकटली.

काँग्रेसने अधिकारग्रहण करून सात प्रांतांत मंत्रिमंडळे बनविल्यानंतर जीनांनी मुसलमानांचा एकमेव प्रातिनिधिक राजकीय पक्ष ह्या स्वरूपात मुस्लिम लीगचे संघटन करण्याचे काम जिद्दीने हाती घेतले. ह्या कामाला पोषक ठरावे म्हणून काँग्रेस राजवटीत मुसलमानांच्या हक्कांची पायमल्ली होत आहे, काँग्रेसकडून मुसलमानांना न्याय किंवा रास्त वागणूक मिळणे अशक्य आहे अशी हाकाटी त्यांनी सतत सुरू ठेवली. लखनौला ऑक्टोबर १९३७ मध्ये भरलेल्या मुस्लिम लीगच्या अधिवेशनात, गांधीजींच्या शब्दांत बोलायचे तर जीनांनी काँग्रेसविरुद्ध युद्ध पुकारले. गांधीजी, नेहरू, काँग्रेसचे अध्यक्ष सुभाषचंद्र बोस या नेत्यांनी जीनांना भेटण्याची उत्सुकता दाखविली. जीनांनी अशी भेट होऊन बोलणी करण्यासाठी पुढील अट घातली : गांधीजींना ३ मार्च १९३८ रोजी लिहिलेल्या पत्रात ते म्हणतात, " आपण आता अशा टप्प्यावर येऊन पोचलो आहोत की, आता कोणतीही संदिग्धता राहू देता कामा नये तुम्ही अखिल भारतीय मुस्लिम लीग ही भारतातील मुसलमानांची एकमेव अधिकृत आणि प्रातिनिधिक संघटना आहे आणि दुसऱ्या पक्षी तुम्ही स्वत: काँग्रेस व सबंध देशातील इतर सर्व हिंदू यांचे प्रतिनिधित्व करता ह्याला मान्यता द्या. ह्याच एका पायावर आपण पुढे जाऊ शकू आणि पुढील कार्यवाहीसाठी यंत्रणा उभारू शकू. " गांधीजींनी आणि इतर पुढाऱ्यांनी अर्थात ही अट मान्य करण्याचे नाकारले. लीगच्या लखनौ अधिवेशनात काँग्रेस राजवटीवर जे आरोप करण्यात आले होते त्यांचा नेहरूंनी तपशीलवार परामर्ष घेऊन त्यांत काही तथ्य नसल्याचे दाखवून दिले. तितक्याच तपशीलात जाऊन त्यांनी जीनांच्या नेमक्या मागण्या काय आहेत ह्याची जीनांकडे चौकशी केली. जीनांनी त्रागा केला, पण उत्तर दिले नाही. जीनांनी जाणीवपूर्वक जातीय वातावरण तापत ठेवले.

ह्या सुमाराला पाकिस्तानची मागणी जोर धरू लागली होती. इक्बाल यांनी जीनांना मे १९३७ मध्ये लिहिलेल्या पत्रात असे म्हटले होते की, " इस्लामी कायद्याच्या दीर्घकाळ आणि काळजीपूर्वक केलेल्या अभ्यासानंतर मी ह्या निष्कर्षाला येऊन पोचलो आहे, की ह्या कायद्याचे सम्यक् आकलन करून जर तो अंमलात आणला तर प्रत्येकाला निर्वाहाचा जो हक्क आहे त्याचे संरक्षण होईल. पण ह्या देशात स्वतंत्र मुसलमान राज्य किंवा राज्ये असल्याशिवाय इस्लामच्या शरियतची अमलबजावणी आणि विकास होणे अशक्य आहे... ही गोष्ट जर हिंदुस्थानात अशक्य असेल तर यादवी युद्धाशिवाय पर्याय नाही." पुढल्या पत्रात त्यांनी " हिंदुस्थानच्या वायव्य प्रदेशातील आणि बंगालमधील मुसलमान हे हिंदुस्थानातील आणि बाहेरील इतर राष्ट्रांप्रमाणे स्वायत्ततेचा अधिकार असलेली राष्ट्रे आहेत असे का मानू नये ? " असा प्रश्न उपस्थित केला. ऑक्टोबर १९३८ मध्ये कराचीला भरलेल्या सिंध मुस्लिम लीग परिषदेत जीनांच्या उपस्थितीत हिंदू व मुसलमान ही दोन राष्ट्रे आहेत आणि ह्या दोन्ही राष्ट्रांना 'सन्माननीय आणि न्याय्य' राज्ये लाभतील अशी भारताची राज्यघटना असली पाहिजे अशी मागणी करण्यात आली. " जर आठ वर्षांचा पोरगा असलेला महंमद बिन कासिम १८ सैनिकांसह सिंध जिंकू शकतो तर मग ८ कोटी मुसलमान खात्रीने सबंध भारत जिंकू शकतील " असे फझलूल हक यांनी विधान केले आणि टाळ्यांचा कडकडाट झाला. " तुम्ही हुकूम करा आणि आम्ही प्राणांची बाजी करतो " असा त्याला प्रतिसादही मिळाला.

१९३५ च्या कायद्याखाली संघराज्य अस्तित्वात येऊ नये अशी जीनांची इच्छा होती कारण मुस्लिम लीगला मध्यवर्ती कायदेमंडळात तुटपुंजे प्रतिनिधित्व मिळणार होते. काँग्रेसचा संघराज्याला विरोध होता; कारण त्या योजनेप्रमाणे १) लोकप्रतिनिधी असलेल्या मंत्र्यांना खरीखुरी सत्ता मिळणार नव्हती आणि २) संस्थानांच्या लोकप्रतिनिधींऐवजी संस्थानिकांनी नेमलेले प्रतिनिधी कायदेमंडळात बसणार होते. काँग्रेसने संस्थानांमध्ये लोकशाही राजवट सुरू

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष

अनुक्रमणिका

व्हावी म्हणून चळवळ सुरू करायला स्थानिक जनतेला उत्तेजन दिले. जीनांनी हैदराबादसारख्या मुस्लिम संस्थानात लोकशाहीवादी चळवळ चालविण्याला सक्त विरोध केला.

१९३८ मध्ये पाटणा येथे भरलेल्या मुस्लिम लीगच्या अधिवेशनात बिहार, संयुक्त प्रांत आणि मध्य प्रांत यांतील कॉंग्रेस सरकारांविरुद्ध 'प्रत्यक्ष कृती' करण्याचा ठराव स्वीकृत करण्यात आला. मुस्लिम लीगच्या घटनात्मक आंदोलन करण्याच्या परंपरेत झालेला क्रांतिकारक बदल असे जीनांनी त्याचे वर्णन केले.

१९३५ च्या कायद्याखालील संघराज्य अस्तित्वात आणायला ब्रिटिश सत्ताधीश फारसे उत्सुक होते असे नाही. मुसलमान नेतृत्वाचा संघराज्याला असलेला विरोध हे त्यांना ह्या बाबतीत चालढकल करायला एक चांगले कारण सापडले. ऑगस्ट १९३८ मध्ये हंगामी व्हाइसरॉय ब्रेबर्न ह्यांची जीना व शिकंदर हयत खान ह्यांनी वेगवेगळ्या वेळी गाठ घेऊन केंद्र सरकार १९१९ च्या कायद्याप्रमाणे चालावे आणि कॉंग्रेस राजवटीतील अल्पसंख्य मुसलमानांना संरक्षण द्यावे अशी त्यांना गळ घातली आणि त्याबद्दल परतफेड म्हणून मुस्लिम लीग सरकारला मध्यवर्ती कायदेमंडळात पूर्ण पाठिंबा देईल असे आश्वासन दिले. भारतमंत्री मार्क्विस ऑफ् झेटलंड हे मुसलमानांचा विरोध ध्यानी घेता संघराज्याची स्थापना करण्याची घाई करू नये ह्या मताचे होते; तर व्हाइसरॉय लिन्लिथगो ह्यांचे कायद्याप्रमाणे संघराज्याची स्थापना करण्याचे प्रयत्न करायला आपण बांधलेले आहोत आणि मुसलमानांच्या आक्षेपांत काही तथ्य नाही असे मत होते. ऑगस्ट १९३९ मध्ये संस्थानिक आणि ब्रिटिश राजप्रतिनिधी (क्राउन रेप्रेझेन्टेटिव्ह) यांची बैठक झाली आणि तिच्यात संस्थानिकांनी उपस्थित केलेल्या शंकांचे समाधान करण्यात आले. संघराज्य लवकरच अस्तित्वात येईल अशी चिन्हे दिसू लागली.

मुसलमानी राजकारणाचे एक स्थायी सूत्र केंद्र सरकारमध्ये आपल्याला हिंदूंएवढा, पूर्णपणे समान असा वाटा असला पाहिजे हे होते. तेव्हा मुसलमान पुढारी ब्रिटिश भारताचे प्रांत आणि संस्थाने हे घटक असलेल्या संकल्पित संघराज्याला वेगवेगळे पर्याय सुचवू लागले. एक पर्याय उत्तर हिंदुस्थान मुसलमानांना आणि दक्षिण हिंदुस्थान हिंदूंना द्यावा असा होता. दुसरा पर्याय हिंदुस्थानात पाच मोठे आणि अनेक लहान मुस्लिम प्रदेश वेगळे काढावे, आणि इतरत्र राहत असलेल्या मुसलमानांनी स्थलांतर करून त्यांत सामील व्हावे आणि त्यांच्या बदल्यात ह्या प्रदेशांतील हिंदूंनी उर्वरित हिंदुस्थानात जावे असा तोडगा सुचविला. एप्रिल १९३९ मध्ये दिल्ली येथे भरलेल्या मुस्लिम लीग काउन्सिलच्या बैठकीत अखिल भारतीय संघराज्याला ज्या वेगवेगळ्या पर्यायी योजना सुचविण्यात आल्या होत्या त्यांचा विचार करण्यासाठी एक समिती नेमण्यात आली असल्याचे जाहीर केले.

१९३९ मध्ये दुसरे महायुद्ध सुरू झाल्यावर १९३५ च्या कायद्याखालील संघराज्याची योजना स्थगित करण्यात आली. लोकांची संमती घेतल्याशिवाय भारत सरकारने युद्ध जाहीर केले ह्याचा कॉंग्रेसने निषेध केला. प्रांतिक कॉंग्रेस मंत्रिमंडळाने राजीनामे दिले. युद्धाविषयी कॉंग्रेसची चित्तवृत्ती दोलाचल होती. नात्सी जर्मनीविरुद्ध लढणाऱ्या लोकशाही राष्ट्रांशी तिची पूर्ण सहानुभूती होती; पण युद्धाचा आपत्काल संपल्यानंतर भारतात लोकशाही राजवट येईल असे आश्वासनही तिला हवे होते. ब्रिटिश सरकारने आपली युद्धविषयक उद्दिष्टे जाहीर करावी असे आवाहन कॉंग्रेसने केले. व्हाइसरॉय लिन्लिथगो यांनी राजकीय पक्षांचे ५२ पुढारी आणि संस्थानिकांचे प्रतिनिधी ह्यांच्या भेटी घेऊन झालेल्या बोलण्याचा निष्कर्ष म्हणून जे निवेदन प्रसिद्ध केले त्यात वेगवेगळ्या पक्षांत असलेल्या मतभेदांवर भर दिला होता. युद्धाच्या समाप्तीनंतर सर्व जमाती, पक्ष, हितसंबंध आणि संस्थानिक यांच्या प्रतिनिधींशी सल्लामसलत करून इष्ट ठरतील त्या घटनात्मक सुधारणा ब्रिटिश सरकार करील आणि भारतात वसाहतीचे स्वराज्य स्थापन करायला साहाय्य करील असे आश्वासन होते. असेच निवेदन भारतमंत्री झेटलंड ह्यांनी केले. आपल्या भाषणात भारतमंत्र्यांनी एक सूचक वाक्य उच्चारले होते. "भारताच्या राजकीय एकतेला अजून विघातक असलेल्या जातीय वितुष्टांचे निराकरण करण्याचा प्रयत्न

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

आपण केला पाहिजे." म्हणजे हे निराकरण झाले नाही तर देशाची एकताही राहणार नाही. देशाची फाळणी शक्यतेच्या कोटीतील आहे अशी सूचना ब्रिटिश सरकारच्या प्रवक्त्याकडून मिळण्याची ही पहिली वेळ.

काँग्रेसने ह्या निवेदनाविषयी असमाधान व्यक्त केले. भारतीय पुढाऱ्यांमधील मतभेदांची ढाल पुढे करून ब्रिटिश भारतीय स्वातंत्र्याविषयीची आपली उद्दिष्टे स्पष्ट करण्याचे टाळत आहे असा तिने आरोप केला. भारतीय जनतेचा स्वातंत्र्याचा, आणि घटनासमितीद्वारा राज्यघटना बनविण्याचा हक्क ब्रिटिश सरकार मान्य करीपर्यंत त्याच्याशी समझोता होणार नाही असे काँग्रेसने जाहीर केले. नेहरूंनी जीनांशी बोलणी करण्याचा फिरून प्रयत्न केला पण ती सुरू होण्यापूर्वीच काँग्रेस राजवटीपासून सुटका झाल्यामुळे झालेला संतोष व्यक्त करण्यासाठी २२ डिसेंबर हा दिवस मुसलमानांनी मुक्तिदिन म्हणून साजरा करावा असा आदेश दिला. काँग्रेस राजवटींवरील आरोपांची फेडरल कोर्टाचे सरन्यायाधीश मॉरिस ग्वॉयर यांच्याकरवी चौकशी करावी अशी राजेंद्रप्रसादांची सूचना जीनांनी धुडकावून लावली. जीनांशी बोलणी करायला अजून अवसर आहे का, असे नेहरूंनी विचारले असता मुस्लिम लीग ही भारतीय मुसलमानांची एकमेव प्रतिनिधी आहे हे काँग्रेस मान्य करीत नसल्यामुळे आणि काँग्रेसची घटनासमितीची कल्पना लीगला अमान्य असल्यामुळे अवसर नाही असे त्यांनी उत्तर दिले.

अखेरीस मार्च १९४० मध्ये लीगचे लाहोरला ऐतिहासिक अधिवेशन भरले. एक लाखाहून अधिक मुसलमान उपस्थित होते. आपल्या अध्यक्षीय भाषणात जीनांनी आपली भूमिका स्पष्ट केली.

"भारतातील समस्या आंतरजातीय स्वरूपाची आहे असे मानणे गैर आहे. ती आंतरराष्ट्रीय स्वरूपाची आहे आणि ह्या दृष्टीने तिला हाताळले पाहिजे. जी राज्यघटना ह्या मूलभूत वस्तुस्थितीवर आधारली जाणार नाही तिच्यापासून केवळ आपत्ती निष्पन्न होईल. इस्लाम आणि हिंदुधर्म ह्या दोन भिन्न सामाजिक व्यवस्था आहेत आणि हिंदू व मुसलमान कधीही समान राष्ट्रीयत्व विकसित करू शकणार नाहीत. त्यांची धार्मिक तत्त्वज्ञाने, सामाजिक प्रथा, साहित्य भिन्न आहेत. त्यांच्या संस्कृती भिन्न आहेत... हिंदुस्थानची कृत्रिम एकता ब्रिटिशांनी देश पादाक्रांत केला यावर आधारली आहे आणि ब्रिटिश बागनटांनी ती टिकवून धरली आहे. बहुसंख्य हिंदूंचे सरकार स्थापन करील अशी राज्यघटना मुस्लिम हिंदुस्थान कधीही मान्य करणार नाही. मुसलमान ही अल्पसंख्य (जमात) नाही; ते एक राष्ट्र आहे आणि त्याला स्वतःचा गृहप्रांत (होमलँड), स्वतःचा प्रदेश आणि स्वतःचे राज्य असले पाहिजे. ह्या उपखंडात शांतता आणि सुख नांदावे अशी ब्रिटिश सरकारला खरी आच असेल तर भारताची स्वायत्त राज्यांमध्ये फाळणी करून ह्या मोठ्या राष्ट्रांना त्यांचे गृहप्रांत उपलब्ध करून देणे हा एकमेव मार्ग आहे."

फाळणीची मागणी करणारा ठराव फजलुल हक यांनी मांडला. "... पुढील मूलभूत तत्त्वाला अनुसरून जिची रचना झालेली नाही अशी कोणतीही घटनात्मक योजना काम देऊ शकणार नाही किंवा मुसलमानांना मान्य होणार नाही. हे तत्त्व असे की, भौगोलिकदृष्टया सलग असलेल्या भूखंडांची अशा रीतीने सीमा–आखणी करावी की ज्या प्रदेशांत, भारताच्या वायव्य आणि पूर्व दिशांना असलेल्या भूभागांप्रमाणे मुसलमान बहुसंख्य असतील, ते प्रदेश स्वतंत्र राज्ये म्हणून एकत्रित आणि ह्या राज्यांतील घटक स्वायत्त आणि सार्वभौम असतील."

मुसलमान अल्पसंख्य असलेल्या प्रांतांतील लीगच्या प्रतिनिधींनी ह्या ठरावाला बहुसंख्य प्रांतांतील प्रतिनिधींइतकाच उत्साही पाठिंबा दिला. 'हिंदू' प्रांतांतील मुसलमानांच्या भवितव्याची काळजी बहुसंख्य मुसलमानी प्रांतांनी करू नये असे सयद अब्दुर रॉफ शहा यांनी सांगितले. "बहुसंख्य प्रांतांतील मुसलमानांप्रमाणे तेही स्वतंत्र होतील असा एक दिवस उजाडेल असा त्यांचा अल्लावर विश्वास आहे" असे आश्वासन त्यांनी दिले.

हा ठराव म्हणजे देशाला हादरून टाकणारा धक्का होता. एप्रिल १९४० मध्ये 'अखिल भारतीय आझाद मुस्लिम परिषद' ह्या नावाने लीगेतर मुस्लिमांची परिषद भरविण्यात आली. तिच्यात

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष

स्वीकृत करण्यात आलेले ठराव असे होते : मौलाना हफिझुर रेहमान यांनी मांडलेल्या ठरावाप्रमाणे–(१) प्रौढ मताधिकारावर आधारलेली घटना-समिती ताबडतोब बोलविण्यात यावी आणि (२) ह्या समितीच्या निवडून आलेल्या मुस्लिम सदस्यांनाच केवळ मुस्लिम जमातीच्या हितसंबंधांचे आणि हक्कांचे संरक्षण करण्यासाठी आवश्यक त्या घटनात्मक तजवीज करण्याचा हक्क असावा अशा मागण्या केल्या होत्या. आसफ अली ह्या काँग्रेसपक्षीय पुढाऱ्याने मांडलेल्या ठरावाप्रमाणे २७ पुढाऱ्यांचे एक मंडळ पुढील प्रश्नांविषयी आवश्यक त्या शिफारशी करण्यासाठी नेमण्यात आले होते : (१) मुस्लिम संस्कृती, वैयक्तिक कायदा आणि धार्मिक हक्क यांचे संरक्षण; (२) मुस्लिमांचे राजकीय हक्क आणि त्यांचे संरक्षण; (३) न–एकात्म (नॉन-युनिटरी), संघ-संघ-राज्यात्मक राज्यघटना, जिच्यान्वये संघ-राज्याच्या सरकारला मर्यादित सत्ता असेल; (४) मुस्लिमांच्या आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक हक्कांना संरक्षण; (५) मुस्लिमांचा सार्वजनिक सेवांतील हिस्सा. सारांश, 'राष्ट्रवादी' मुसलमानांनी पाकिस्तानाची मागणी सोडली तर जातीयवादी मुसलमानांच्या इतर सर्व मागण्या मान्य केल्या होत्या.

जीनांनी द्विराष्ट्रवादाचा तर्कशुद्ध निर्धाराने पाठपुरावा केला. व्हाइसरॉय यांना लिहिलेल्या पत्रात लाहोर ठरावाविरुद्ध जाईल अशी कोणतीही घोषणा ब्रिटिश सरकारने करू नये आणि मध्यवर्ती व गव्हर्नर-शासित सरकारांत मुसलमानांना हिंदूइतकाच (काँग्रेसइतकाच) हिस्सा असावा अशा मागण्या केल्या. काँग्रेस वर्किंग कमिटीने ७ जुलै १९४० रोजी केलेल्या ठरावात भारताला संपूर्ण स्वातंत्र्य देण्यात येईल अशी ब्रिटिश सरकारने घोषणा करावी आणि ह्या दिशेने टाकलेले पहिले पाऊल म्हणून मध्यवर्ती कायदेमंडळाला जबाबदार असणारे हंगामी राष्ट्रीय सरकार स्थापन करावे असे आवाहन काँग्रेसने केले. जीनांनी त्याला विरोध केला.

ऑगस्ट ८ व १४ ह्या दिवशी अनुक्रमे व्हाइसरॉय आणि भारतमंत्री एमरी यांनी महत्त्वाच्या घोषणा केल्या. लिन्लिथगो म्हणाले की, "भारताच्या राष्ट्रीय जीवनातील मोठे आणि समर्थ घटक ज्याचा अधिकार सरळ अमान्य करीत आहेत अशा शासनव्यवस्थेकडे भारतातील शांतता आणि भारताचे कल्याण ह्यांविषयीच्या आपल्या जबाबदाऱ्या संक्रांत करण्याचे मनात आणणे, किंवा अशी शासनव्यवस्थेला त्यांनी मान तुकवावी म्हणून त्यांच्यावर जबरदस्ती करण्यात सहभाग घेणे शाही (ब्रिटिश) सरकारला शक्य नाही हे सांगायलाच नको." एमेरी ह्यांनी केलेले विधान असे की "ह्या घटकांतील सर्वप्रमुख घटक म्हणजे महान मुस्लिम जमात. ही ९ कोटी आहे आणि वायव्य आणि ईशान्य भारतात बहुसंख्य आहे, पण अल्पसंख्य म्हणून सबंध उपखंडात विखुरलेली आहे. धार्मिक व सामाजिक दृष्टिकोण, ऐतिहासिक परंपरा व संस्कृती ह्या बाबतीत ते आणि त्यांचे हिंदू देशबांधव यांच्यामधील भेद युरोपातील अशाच भेदांइतकेच खोल, कदाचित अधिक खोल आहेत." ह्या विधानांद्वारे ब्रिटिश सरकारने द्विराष्ट्रवाद मान्य केला आणि मुस्लिम लीगला घटनात्मक सुधारणांच्या बाबतीत नकाराधिकार (व्हीटो) दिला असा त्यांचा जीनांनी अर्थ लावला. तो गैर होता असे म्हणता येत नाही.

हळूहळू राष्ट्रवादी मुसलमानांत गळती सुरू झाली. अलाहाबाद समझोत्यावर सही केलेले मलिक बरकत अली, लियाकत अली खान, चौधरी खलिक उझमन आणि इतर अनेक नेते पाकिस्तानवादी आंदोलनात सामील झाले. अनेक प्रमुख खिलाफतवाद्यांनी त्यांचे अनुकरण केले. १९४० व ४१ मध्ये जवळजवळ प्रत्येक प्रांतातील मुस्लिम विद्यार्थी परिषदेने पाकिस्तानवरील आपल्या निष्ठेची ग्वाही दिली. १९४० च्या अखेरीपर्यंत बहुतेक सुशिक्षित मुसलमानांनी जीनांचे नेतृत्व स्वीकारले होते.

पाकिस्तानची धूसर संकल्पना हळूहळू आकार धारण करू लागली. जानेवारी १९४१ मध्ये मुंबई येथे केलेल्या एका भाषणात सर्व संबंधित पक्षांनी पाकिस्तानची योजना स्वीकारावी, आणि हिंदू व मुसलमान यांनी आपापल्या गृहभूमीमध्ये वसती करावी असे आवाहन जीनांनी केले. ह्याचा अर्थ लोकसंख्येची मोठ्या प्रमाणावरील अदलाबदल जीना यांना अभिप्रेत होती. फेब्रुवारी १९४१ मध्ये अखिल भार-

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

तीय मुस्लिम लीगच्या परराष्ट्र समितीने पाकिस्तानच्या योजनेचा तपशील प्रसिद्ध केला. तिच्याप्रमाणे भारतात तीन मुस्लिम राज्ये होणार होती. दिल्लीपर्यंत पसरलेले वायव्येकडील मुस्लिम राज्य, बंगाल व आसाम हे पूर्वेकडील राज्य आणि हैद्राबाद व वऱ्हाड मिळून बनलेले निजामाचे राज्य. एप्रिल १९४१ मध्ये मजलिस–इत्तेहद–उल्–मुसलमीन ही संघटना हैद्राबाद संस्थानात स्थापन करण्यात आली. तिच्या स्थापना-परिषदेत हैद्राबाद राज्याचे सार्वभौमत्व मुसलमानांत अधिष्ठित आहे आणि निजाम हे त्याचे प्रतीक आहे अशी घोषणा करण्यात आली. जीनांनी द्रविडिस्तानलाही आशीर्वाद दिला.

"ह्या उपखंडात दोन भिन्न समाज आहेत– मुस्लिम समाज आणि हिंदू समाज– आणि विशेषत: ह्या भूमीत आणखी एक राष्ट्र आहे– ते म्हणजे द्रविडिस्तान. ही भूमी खरे म्हणता द्रविडिस्तान आहे आणि कल्पना करा की ३ टक्के असलेले उच्चजातीय ब्राह्मण कौशल्याने खटपटी करून आणि निवडणुका लढविण्याच्या कुशल पद्धतींचा वापर करून बहुमत मिळवितात. ही लोकशाही आहे की तमाशा (फार्स) आहे ? म्हणून मला ब्राह्मणेतरांविषयी पूर्ण सहानुभूती आहे व मी त्यांना पूर्ण पाठिंबा देतो. मी तुम्हाला असे सांगतो की, तुम्हाला आपले स्वत्व प्रस्थापित करायचे असेल तर तुम्ही आपल्या संस्कृतीप्रमाणे, आपल्या भाषेप्रमाणे आपले जीवन जगले पाहिजे– हे अल्लाचे उपकार आहेत की हिंदी येथे फार पसरली नाही– आपल्या इतिहासाला अनुसरून तुम्ही जगले पाहिजे– तुम्ही पुढे चला. मला पूर्ण सहानुभूती आहे, तुम्हाला मी सर्व साहाय्य करीन आणि तुम्ही द्रविडिस्तान स्थापन करू शकाल आणि ७ टक्के मुसलमान प्रजा आपला मैत्रीचा हात पुढे करील आणि तुमच्या समवेत सुरक्षितता, न्याय आणि ऋजुता यांना अनुसरून जगेल."

असे विषारी जातीय विद्वेषाचे विघातक राजकारण जीना खेळत होते.

पाकिस्तानी चळवळीला मुसलमानांकडून विरोध होत नव्हता असे नाही; पण तो क्षीण होता. लाहोरला मार्च १९४१ मध्ये खान अब्दुल गफार खान ह्यांच्या अध्यक्षतेखाली जातीयताविरोधी परिषद झाली. तिच्यात पाकिस्तानची योजना देशद्रोही, राष्ट्रविरोधी आणि देशहिताच्या विरुद्ध आहे म्हणून तिचा धिक्कार करण्यात आला. आझाद मुस्लिम परिषदेने ९ मुसलमान संघटनांच्या वतीने पाकिस्तानविरोधी भूमिका व्यक्त केली आणि देशाचे राजकीय स्वातंत्र्य तांबडतोब मान्य करण्यात यावे अशी मागणी केली. पण ह्या ९ संघटना कोणत्या ह्याचा हिशोबही लागत नाही असे व्हाइसरॉयने भारतमंत्र्याला कळविले. जीनांची मुस्लिम लीग आणि सर्व मुस्लिम नेतृत्व यांवरील पकड अतिशय मजबूत होत गेली. व्हाइसरॉय ह्यांनी जेव्हा राष्ट्रीय संरक्षण मंडळावर पंजाब, बंगाल व आसाम यांच्या पंतप्रधानांची 'महान मुस्लिम जमातीचे प्रतिनिधी' म्हणून नेमणूक केली व जीनांना तसे कळविले तेव्हा मुस्लिम जमातीचा एकमेव प्रतिनिधी असलेल्या मुस्लिम लीगशी सल्लामसलत न करता अशी परस्पर नेमणूक केली म्हणून जीनांनी क्रोध व्यक्त केला आणि ह्या पंतप्रधानांना– शिकंदर हयतखान, फजलूल हक आणि सादुल्ला यांना– राजीनामा द्यायला भाग पाडले. पंजाबमध्ये शिकंदर हयतखान आणि बंगालमध्ये फजलूल हक मुस्लिम लीगची शिस्त पूर्णपणे पाळत होते असे नाही. पण ह्या प्रांतांत मुसलमानांचे असलेले बहुमत अल्प असल्यामुळे त्यांना तडजोडी कराव्या लागतात असा ह्याचा अर्थ जीनांनी लावला आणि मुसलमानांचे भरघोस बहुमत प्रस्थापित करण्यासाठी पंजाब व बंगाल ह्या प्रांतांची फाळणी करण्याकडे त्यांच्या मनाचा कल होऊ लागला. ह्याचा सुगावा अल्पसंख्य प्रांतांतील मुसलमानांना लागला तेव्हा त्यांच्या मनाला भीती चाटून गेल्याशिवाय राहिली नाही. खलिक उझ्झमान ऑक्टोबर १९४२ मध्ये जीनांना लिहिलेल्या पत्रात म्हणतात, "शिवाय पाकिस्तानच्या कल्पनेमागील एक मूलभूत तत्त्व असे आहे की, हिंदू प्रांतांत जे मुसलमान असतील त्यांना अनुलक्षून मुस्लिम प्रांतांत (हिंदू) ओलीस ठेवावेत. जर आपण लक्षावधी हिंदूंना आपल्या प्रभावक्षेत्राच्या बाहेर जाऊ दिले तर अल्पसंख्य प्रांतांतील मुस्लिमांची सुरक्षितता खूपच कमी होईल."

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष

युद्धकाळात व्हाइसरॉय लिन्‌लिथगो हे खरा राजकारभार भारतीय पुढाऱ्यांच्या हाती देण्याला उत्सुक नव्हते. दीर्घकालीन दृष्टिकोणातूनही भारतातील ब्रिटिश सत्ता शक्य तितका काळ टिकवून धरावी असेच त्यांचे धोरण होते. पण १९४२ च्या सुमाराला युद्धपरिस्थिती इंग्लंड-अमेरिका यांच्या दृष्टीने बिकट झाली होती. भारतीय राजकीय पुढाऱ्यांना सरकारात सामावून घेण्यात आले तर युद्धप्रयत्नाला जोर येईल आणि हे युद्ध लोकशाही मूल्यांसाठी आहे हे त्याचे स्वरूपही स्पष्ट होईल ह्या विचाराने अमेरिका आणि ब्रिटिश मजूर पक्ष यांचे भारत सरकारने काँग्रेसशी समझोता करावा म्हणून दडपण वाढत होते. चीनचे नेते मार्शल चिआंग-कै-शेक यांनीही १९४२ मध्ये केलेल्या भारतभेटीत अशा आशयाचे आवाहन ब्रिटिश सरकारला केले होते. मुस्लिम लीगची कोणतीही तडजोड स्वीकारायला तयार नसलेली भूमिका ह्या दडपणाला तोंड देण्यासाठी भारतमंत्री व व्हाइसरॉय ह्यांना उपयोगी पडत होती. तरीही भारतात राजकीय समझोता घडवून आणण्यासाठी ब्रिटिश सरकारने पावले टाकावी ह्या अमेरिकन आणि अंतर्गत ब्रिटिश मागणीमागचा आग्रह वाढत असल्याने तिचे समाधान करण्याचा प्रयत्न आपण करीत आहोत असा देखावा करणे चर्चिल सरकारला आवश्यक वाटले. ब्रिटिश सरकारचे राजकीय सुधारणांविषयीचे काही प्रस्ताव घेऊन स्टफर्ड क्रिप्स मार्च १९४२ मध्ये भारतात आले. ह्या प्रस्तावांविषयी स्वतः भारतमंत्री एमेरी ह्यांची वृत्ती काय होती हे त्यांनी १० मार्चला लिन्‌लिथगो ह्यांना लिहिलेल्या पत्रातील एका विधानावरून स्पष्ट होते. "काँग्रेसविषयी बोलायचे तर सप्रूंनी सुचविल्यासारखे (म्हणजे कायदेमंडळाला जबाबदार असलेले) सरकार त्यांना मिळणार नाही आणि (ह्या प्रस्तावांच्या) घरट्यात कोकिळेचे पाकिस्तानी अंडे आहे तिची विरोधी प्रतिक्रिया अधिकच तीव्र होईल." क्रिप्स प्रस्तावांना काँग्रेसची मान्यता मिळणार नाही अशी एमेरी ह्यांची खात्री होती आणि ते त्यांना हवेही होते.

क्रिप्स प्रस्तावाचे दोन भाग होते. युद्धकाळापुरत्या भागात सर्व सत्ता विशेषतः संरक्षणविषयक बाबीविषयीची म्हणजे युद्ध चालविण्याविषयीची सत्ता व्हाइसरॉयच्या हातात केंद्रित राहणार होती; पण भारताच्या नैतिक, भौतिक व लष्करी सामग्रीचा युद्धप्रयत्नासाठी विनियोग व्हायला चालना मिळावी म्हणून व्हाइसरॉयच्या एक्झिक्यूटिव्ह काउन्सिलमध्ये भारतीय पुढाऱ्यांना प्रवेश मिळणार होता. युद्धसमाप्तीनंतर प्रांतिक निवडणुका घेऊन जे प्रतिनिधी निवडून येतील त्यांनी निवडून दिलेल्या सदस्यांची घटनासमिती स्थापन होणार होती. तिच्यात संस्थानिकांनी नेमलेल्या सदस्यांचा अंतर्भाव होणार होता. ब्रिटिश भारतातील प्रजेचे तिने अप्रत्यक्षरीत्या निवडलेल्या घटनासमितीतील सदस्यांशी जे प्रमाण असेल तेच संस्थानी प्रजेचे संस्थानिकांनी नेमलेल्या सदस्यांचे राहणार होते. ह्या घटनासमितीने बनविलेली राज्यघटना अमलात आणण्याचे अभिवचन ब्रिटिश सरकारने पुढील दोन अटींवर दिले होते : १) कोणत्याही प्रांताला किंवा संस्थानला नवीन भारतीय संघराज्यात सामील न होण्याचे स्वातंत्र्य राहणार होते. सामील न होणाऱ्या घटकांना ब्रिटिश सरकार स्वतःची राज्यघटना बनविण्यासाठी आवश्यक त्या सोयी उपलब्ध करून देणार होते आणि भारतीय संघराज्याशी समान दर्जा देणार होते. २) ब्रिटिश सरकारने वांशिक आणि धार्मिक अल्पसंख्याकांना संरक्षणाच्या ज्या हमी दिलेल्या आहेत त्यांना अनुसरून ह्या घटनासमितीशी किंवा घटनासमित्यांशी आवश्यक ते करारमदार करणार होते.

ह्या भावी राज्यघटनेविषयीच्या तरतुदींचे संभाव्य परिणाम काय होणार होते ? एमेरींच्या स्वतःच्या विवेचनानुसार भारताचे अनेक स्वतंत्र घटकांत भाग पडणार होते. 'हिंदू' भारत, वायव्येकडे आणि ईशान्येकडे दोन मुस्लिम राज्ये, सर्व संस्थानांचे मिळून बनलेले राज्य, डोंगराळ आदिवासी प्रदेशांचे राज्य ही स्वतंत्र राज्ये आणि ह्या कोणत्याही राज्याला स्वतःचे वेगळे लष्कर ठेवण्याचे सामर्थ्य असणे शक्य नसल्यामुळे संरक्षणाची जबाबदारी 'भारत सरकार'वर म्हणजे ब्रिटिश गव्हर्नर जनरलवर राहणार होती. भारतातील ब्रिटिश उपस्थिती कायम होणार होती.

क्रिप्स मसुद्याला काँग्रेसचा विरोध होता तो मुख्यत्वे दोन कारणांसाठी होता. एक, नजीकच्या भविष्यात युद्धप्रयत्नाला लोकांचा खराखुरा पाठिंबा

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे

मिळविण्यासाठी लोकमान्य पुढाऱ्यांना नजीकच्या भविष्यामध्ये सत्तेत जो सहभाग मिळणे आवश्यक होते तो नाकारण्यात आला होता. आणि भविष्यातल्या घटनासमितीत आपले प्रतिनिधी नेमण्याचा संस्थानिकांना देण्यात आलेला अधिकार काँग्रेसला सर्वथैव अमान्य होता. भावी संघराज्यापासून फुटून निघण्याच्या प्रांतांना दिलेल्या स्वातंत्र्याबद्दल काँग्रेसने घेतलेली भूमिका अशी होती : "भारताचे स्वातंत्र्य आणि एकता ह्यांना काँग्रेस वाहिलेली आहे आणि ह्या एकतेचा कोणताही भंग हानिकारक ठरेल. त्याचा विचारही काँग्रेसला दु:खद आहे. तथापि कोणत्याही प्रादेशिक घटकाला त्याच्या जाहीर आणि प्रस्थापित इच्छेविरुद्ध भारतीय संघराज्यात रहायची सक्ती करावी असा विचार वर्किंग कमिटी करू शकत नाही; विभिन्न घटकांना एक समान आणि सहकार्याधिष्ठित राष्ट्रीय जीवन घडविण्याला साहाय्य करील अशी परिस्थिती निर्माण करण्यासाठी शक्य ते प्रयत्न केले पाहिजेत असे तिला वाटते."

जीनांनी क्रिप्स यांच्याबरोबर झालेल्या भेटीत योजनेविषयी पूर्ण समाधान व्यक्त केले. पण काँग्रेसने ती नाकारल्यानंतर भावी घटनासमितीच्या निवडणुकांच्या संदर्भात मुसलमानांना स्वतंत्र मतदारसंघाद्वारा आपले प्रतिनिधी निवडण्याचा अधिकार तिच्यात नाकारण्यात आला आहे ह्या कारणास्तव ती फेटाळून लावली. कारण जरी प्रांतिक कायदेमंडळांतील मुसलमान प्रतिनिधी स्वतंत्र मतदारसंघांतून निवडून येणार होते, तरी पुढे घटनासमितीवर सदस्यांना निवडून देण्यासाठी प्रांतिक कायदेमंडळांतील मुस्लिम व इतर सदस्यांचा मिळून एकच निर्वाचन-संघ (इलेक्टोरल कॉलेज) बनणार होता. तसेच संघराज्यात एखाद्या प्रांताने सामील व्हायचे की नाही ह्याविषयी अंतिम निर्णय घेण्यासाठी ज्या सार्वमताची योजना होती तीतही स्वतंत्र मतदारसंघाला स्थान नव्हते.

ह्या कारणास्तव मुस्लिम लीगने क्रिप्स योजना फेटाळली. पुढे ही मुस्लिग लीगची नेहमीची चाल ठरली. कोणत्याही योजनेविषयी काँग्रेसने निर्णय घेतल्यानंतर मुस्लिम लीग निर्णय घेऊ लागली.

युद्धकालात जीनांची मुस्लिम लीग आणि ब्रिटिश (भारतीय) सरकार यांचे अनौपचारिक पण दृढ असे सहकार्य होते. भारतीय एकता टिकवून धरण्याचे महत्व एमेरी व लिन्लिथगो मधूनमधून प्रतिपादन करीत. जीनाही ब्रिटिश सरकारवर मधूनमधून कडक ताशेरे झाडीत. पण हे नाटक होते. आपली राजवट टिकवून धरायला ब्रिटिशांना लीग हा सच्चा सहकारी लाभला होता.

एप्रिल ८, १९४३ रोजी राजाजींनी गांधीजींच्या आशीर्वादाने लीगशी कायम समझोता करण्यासाठी म्हणून पुढील योजना जीनांकडे पाठविली. "वायव्य व पूर्व भारतातील ज्यांच्यात सरळ मुस्लिम बहुमत आहे अशा सलग जिल्ह्यांच्या सीमा निश्चित करण्यासाठी एक आयोग नेमण्यात येईल आणि फाळणीच्या प्रश्नावर तेथे सार्वमत घेण्यात येईल... जर बहुसंख्यांचा निर्णय सार्वभौम राज्य स्थापन करायला अनुकूल असेल तर तो अमलात आणण्यात येईल ... लोकसंख्येची अदलाबदल केवळ ऐच्छिक पायावर होईल." पण गांधीजींनी देऊ केलेले पाकिस्तान ही केवळ छाया, टरफल आहे, ते पांगळे, छिन्नविछिन्न, कसरीने खाल्लेले पाकिस्तान आहे अशी त्याची संभावना करून जीनांनी ते धुडकावून लावले. ते पांगळे, इ. होते; कारण त्यात पंजाब आणि बंगाल यांची फाळणी अभिप्रेत होती. पंजाबमध्ये पाकिस्तानची स्थापना झाल्यानंतर शीख, दलित, ख्रिस्ती, इत्यादिकांचे हितसंबंध सुरक्षित राहतील अशी आश्वासने ते देत होते. पाकिस्तानच्या भावी राजवटीचे स्वरूप काय असेल ह्याविषयी काही बोलून इतर धर्मीयांना बिथरवू नये असे आपल्या अनुयायांना सूचित करीत होते.

१० ऑगस्ट १९४५ ला जपानने शरणागती पत्करल्यानंतर युद्ध संपले. युद्धानंतरची पहिली निवडणूक लीगने अर्थात पाकिस्तानच्या मुद्द्यावर लढविली. साठ लक्ष मुस्लिम मतांपैकी ४५ लक्ष मते लीगला मिळाली. लीगेतर मुस्लिम पक्षांना– सिंधमधला जी. एम्. सैद यांचा पक्ष किंवा पंजाबमधील मुस्लिम युनियनिस्ट पक्ष– यांना मिळालेली मते पाकिस्तानविरोधी होती असे म्हणता येत नाही; कारण ह्या पक्षांनी पाकिस्तानला पाठिंबा दिला होता. बंगालमध्ये लीगला ८२ टक्के मते

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष

अनुक्रमणिका

पडली. मध्यवर्ती कायदेमंडळावर काँग्रेसचे जे ५७ उमेदवार निवडून आले, त्यांतील एकही मुसलमान नव्हता.

युद्धानंतर ब्रिटनमध्ये मजूर मंत्रिमंडळ सत्तेवर आले. ब्रिटिश सरकारची भारताविषयीची वृत्ती व धोरण बदलले. पंतप्रधान ॲटली ह्यांनी ब्रिटिश कॅबिनेटतर्फे एक 'मिशन' भारतात पाठविण्यात येईल अशी घोषणा ९ फेब्रुवारी १९४६ ला करताना संस्थाने आणि अल्पसंख्य ह्यांना भारताच्या स्वातंत्र्याच्या आड येऊ दिले जाणार नाही हे स्पष्ट केले. काँग्रेसने ह्या स्पष्टीकरणाचे स्वागत केले. जीनांनी अर्थात नापसंती व्यक्त केली.

२४ मार्चला त्रिसदस्य कॅबिनेट प्रतिनिधिमंडळ भारतात आले. निवडून आलेल्या लीग सदस्यांच्या एप्रिलमध्ये भरविलेल्या परिषदेत लाहोर ठरावाला मुरड घालून मुस्लिम लीगला एकच पाकिस्तान हवे असे जाहीर करण्यात आले. मुस्लिम प्रांत आणि उरलेले प्रांत ह्यांच्यासाठी दोन भिन्न घटनासमित्या स्थापन करण्यात याव्या, पाकिस्तान मान्य केल्याशिवाय हंगामी सरकार स्थापन करण्याचा प्रयत्न करण्यात येऊ नये अशा मागण्या करण्यात आल्या.

प्रारंभिक बोलण्यात कॅबिनेट मिशनने दोन पर्यायी योजना मांडल्या : एक योजना खंडित पाकिस्तानची, ज्याला जीनांनी टरफल म्हटले होते त्या पाकिस्तानची. दुसरी योजना तीन प्रांतसमूहांच्या (ब्लॉक) महासंघाची (कॉन्फेडरेशन); मुस्लिम प्रांतसमूह, इतर प्रांतसमूह आणि संस्थानांचा समूह. ह्या महासंघाच्या केंद्राकडे फक्त संरक्षण, परराष्ट्रव्यवहार आणि दळणवळणाची साधने एवढे विषय राहणार होते. मुस्लिम लीग, काँग्रेस व इतर पक्ष यांच्या पुढाऱ्यांशी बऱ्याच वाटाघाटी केल्यानंतर आपला निवाडा कॅबिनेट मिशनने जाहीर केला. ह्यांत पुढील तरतुदी होत्या. (१) प्रांतांची तीन गटांत विभागणी करण्यात आली. 'हिंदू' किंवा सामान्य प्रांत ह्यांचा 'A' गट (मुसलमान, शीख आणि 'सामान्य' (जनरल) एवढ्याच तीन जमाती कॅबिनेट मिशनने ओळखल्या होत्या.); वायव्य सरहद्द प्रांत, सिंध व पंजाब ह्यांचा 'B' गट; आणि बंगाल व आसाम ह्यांचा 'C' मुसलमानी गट. (आसाम हा मुस्लिम बहुसंख्य प्रांत नसतानाही त्याला मुसलमानी गटात ढकलले होते.) (२) ब्रिटिश भारताचे प्रांत आणि संस्थाने ह्यांचे मिळून बनलेले भारतीय संघराज्य असेल. संघराज्याचे स्वतःचे सरकार (एक्झिक्युटिव्ह) जसे असेल त्याप्रमाणे त्याचे कायदेमंडळही असेल. परराष्ट्रसंबंध, संरक्षण आणि दळणवळण एवढे विषय संघराज्याकडे असतील. संघराज्याला ह्या विषयांसाठी पैसा उभा करण्याचे अधिकार असतील. उरलेले सर्व विषय आणि अवशिष्टाधिकार प्रांतांकडे राहतील. संस्थाने ब्रिटिश आधिपत्यापासून मुक्त होतील आणि संघराज्याकडे सुपूर्द केलेले विषय वगळता इतर सर्व कारभार आणि अधिकार त्यांच्याकडे राहतील. (३) प्रांतांचे जे गट पाडण्यात आले होते त्या गटांची सरकारे आणि कायदेमंडळे असतील आणि गटाकडे कोणते समान प्रांतिक विषय सोपवावेत हे गटाने ठरवायचे आहे. (४) कोणत्याही प्रांताला त्याच्या कायदेमंडळाने बहुमताने तसा निर्णय घेतला तर प्रारंभीच्या दहा वर्षांनंतर व त्यानंतर दर दहा वर्षांनी घटनेचा पुनर्विचार करण्याची मागणी करण्याचा अधिकार राहील अशी तरतूद संघराज्याच्या व गटाच्या राज्यघटनेत असेल. (५) घटनासमितीत कायदेमंडळे आपले प्रतिनिधी निवडून पाठवतील. (६) 'जातीय नकाराधिकार' मान्य करण्यात येईल. कोणत्या ठरावामुळे जातीय प्रश्न उपस्थित होतो ह्याचा निर्णय घटनासमितीचे अध्यक्ष घेतील आणि त्या त्या जातीच्या सदस्यांनी बहुमताने तशी मागणी केली तर अध्यक्ष आपला निर्णय घेण्यापूर्वी फेडरल न्यायालयाची संमती घेतील. (७) घटनासमितीची प्राथमिक बैठक झाल्यानंतर A, B आणि C ह्या गटांचे प्रतिनिधी वेगवेगळे बसून प्रांतिक व आवश्यक वाटले तर गटाची राज्यघटना ठरवतील. (८) सबंध राज्यघटना तयार झाल्यानंतर कोणत्याही प्रांताला गटातून फुटता येईल; पण हा निर्णय नव्या राज्यघटनेखाली झालेल्या तरतुदीप्रमाणे निवडून आलेल्या प्रांतिक कायदेमंडळाने घ्यायचा असेल. (९) नवीन राज्यघटना अमलात येईपर्यंतच्या काळासाठी व्हाइसरॉय प्रमुख राजकीय पक्षांशी सल्लामसलत करून पूर्णपणे भारतीय असे हंगामी सरकार बनविण्याचा प्रयत्न करतील.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

कॅबिनेट मिशनच्या १६ मेच्या ह्या योजनेने जीनांना त्यांचे पाकिस्तान बहाल केले यात शंका नाही. पश्चिम आणि पूर्व पाकिस्तान संघराज्याकडे सुपूर्द केलेले विषय वगळून आपापली राज्यघटना बनवायला मोकळे झाले होते. हिंदू बहुमत असलेला आसाम बंगालला जोडण्यात आला होता. आसामला सक्तीने 'C' गटात कोंबण्यात आले होते. नव्या राज्यघटनेनंतर त्याला फुटून निघण्याचे स्वातंत्र्य होते; पण त्या राज्यघटनेत प्रमाणाधिक्य देऊन आसाममध्ये मुसलमानांचे आसामच्या कायदेमंडळात बहुमत राहील अशी व्यवस्था नव्या राज्यघटनेत मुस्लिम लीगला करता आली असती. ह्या कारणासाठी आणि संस्थानातील प्रजेला घटनासमितीवर आपले प्रतिनिधी निवडण्याचा अधिकार देण्यात न आल्यामुळे कॉंग्रेसला ही योजना नापसंत होती. कॅबिनेट मिशन योजनेप्रमाणे संस्थानांवरील ब्रिटिश आधिपत्य संपुष्टात येणार होते. ते भारतीय संघराज्याकडे संक्रांत होणार नव्हते. निजाम ह्याचा फायदा घेऊन स्वातंत्र्य जाहीर करणार होता आणि त्याचे तसे प्रयत्न होते हे कॉंग्रेसला माहीत होते. (हैद्राबादला दिवाण म्हणून नाझीमुद्दिन ह्या जीनांना पसंत असलेल्या लीग पुढाऱ्याची नेमणूक व्हावी आणि स्वतःची हंगामी सरकारात युद्ध-मंत्री म्हणून नेमणूक करून घ्यावी असा जीनांचा डाव होता) कॉंग्रेसला समर्थ आणि 'केंद्रीय' असे मध्यवर्ती सरकार हवे होते. ते मिशनच्या योजनेत नव्हते. कॉंग्रेस ही योजना फेटाळून लावील अशी सर्वांची अपेक्षा होती.

जीनांच्या मागण्या केंद्र सरकारचे कायदेमंडळच असू नये आणि असलेच तर त्याच्यात पाकिस्तानी गट व हिंदुस्थानी गट ह्यांना समान प्रतिनिधित्व असावे, मध्यवर्ती मंत्रिमंडळातही दोन्ही गटांना समान प्रतिनिधित्व असावे अशा होत्या. त्या मान्य झाल्या नाहीत म्हणून त्यांनी योजनेचा शाब्दिक निषेध केला तरी आपल्याला हवे असलेले पाकिस्तान ह्या योजनेद्वारा मिळाले आहे हे त्यांना दिसत होते. तेव्हा सार्वभौम पाकिस्तान हे आपले साध्य आहे ह्याचा पुनरुच्चार करून आणि प्रांत, गट आणि संघराज्य ह्या पातळ्यांवरील राज्यघटना तयार झाल्यावर आपण आपले अंतिम मत व्यक्त करू असे जाहीर करून, नवी घटना तयार होईपर्यंत कधीही आपण हा निर्णय बदलण्याचे स्वातंत्र्य राखून ठेवत आहोत हे नमूद करून मुस्लिम लीगने योजना स्वीकारली. कॉंग्रेसने योजना फेटाळली तरी हंगामी सरकार स्थापन होईल असे आश्वासन त्यांनी व्हाइसरॉयकडून मिळविले होते. त्यात अर्थात सत्ता लीगची राहणार होती. कॉंग्रेसने योजना स्वीकारलीच तर कॉंग्रेसचे ५, लीगचे ५, आणि इतर २ असे मंत्री मंत्रिमंडळात असावेत असा जीनांचा आग्रह होता. तो मान्य झाला नाही हे खरे; पण व्हाइसरॉय जीनांचे इतर अनेक हट्टी आग्रह तत्परतेने पुरवीत आहेत हे कॉंग्रेसला दिसून येत होते. शिवाय कॉंग्रेस मिशनची योजना नाकारील व केवळ लीगच्या साहाय्याने हंगामी सरकार बनवावे लागेल अशी व्हाइसरॉयची अपेक्षा होती.

पण पटेल यांच्या सांगण्यावरून कॉंग्रेसने योजना स्वीकारली. जीनांचा डाव उधळला गेला. लीगने योजनेचा केलेला स्वीकार मागे घेतला आणि १६ ऑगस्ट हा पाकिस्तान मिळविण्यासाठी 'प्रत्यक्ष कृति'-दिन म्हणून पाळण्यात येईल असे जाहीर केले. लीगने योजना नाकारल्यामुळे आणि कॉंग्रेसने स्वीकारल्यामुळे नेहरूंना कॉंग्रेसच्या वतीने हंगामी सरकार बनविण्यासाठी पाचारण करण्यात आले. लीगच्या प्रत्यक्ष–कृति-दिवशी बंगालचे मुस्लिम लीगचे पंतप्रधान सुऱ्हावर्दी यांच्या पुरस्काराने कलकत्त्यात हत्याकांड झाले आणि जातीय दंगलींच्या ज्वाला देशभर भडकू लागल्या. पूर्व बंगालमध्ये हिंदूंवर झालेल्या अत्याचारांचे मुरिएल लेस्टर यांनी केलेले वर्णन असे : "सर्वांत वाईट दुर्दशा बायकांची झाली. अनेकींना आपल्या नवऱ्यांचे खून झालेले आणि त्यानंतर आपल्याला सक्तीने बाटवून आपल्या नवऱ्यांच्या खुनाला जबाबदार असलेल्यांशी लग्न लावून दिलेले पहावे लागले. ह्या बायकांच्या चेहऱ्यावर प्रेतकळा आहे. ही निराशा नाही, निराशेत असतो तो जिवंतपणा तिच्यात नाही. तो केवळ काळोख आहे... जाळपोळ आणि हिंसा ह्यांच्या ह्या थैमानाविषयी जे निश्चितपणे म्हणता येईल ते एवढेच की त्याच्यामागे खेड्यातल्या लोकांनी उत्स्फूर्तपणे केलेले उत्थान नव्हते." मुस्लिम लीगच्या गुंडांची ती कारवाई होती.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष

ह्या दंगलीच्या पार्श्वभूमीवर, जीनांच्या नेतृत्वाखालील मुस्लिम लीगचा पाकिस्तानविषयीचा आग्रह ध्यानात घेता पाकिस्तान मान्य करण्याशिवाय इलाज नाही हे हळूहळू सर्वांना स्पष्ट होत गेले. लीगला हंगामी सरकारात आणण्याचे खूप प्रयत्न करण्यात आले आणि बऱ्याच वाटाघाटींनंतर लीग मंत्रिमंडळात आली. पण "पाकिस्तानचे आमचे जे वांछित साध्य आहे त्याच्या प्रीत्यर्थ लढण्यासाठी पाय रोवायला जागा हवी म्हणून आम्ही हंगामी सरकारात जात आहोत" असे गझनाफर अली यांनी जे स्पष्टीकरण केले ते यथार्थ होते हे लीगमंत्र्यांच्या वागणुकीवरून दिसून आले. घटनासमितीत लीग आलीच नाही. देशातील दंगली भडकत राहिल्या. अखेरीस पंजाब व बंगालची फाळणी करून मुस्लिम बहुसंख्य असलेल्या विभागांचे पाकिस्तान स्वीकारण्याशिवाय पर्याय नाही ह्या राष्ट्रीय सममतीवर (कॉन्सेन्सस) औपचारिक शिक्कामोर्तब व्हायचे काय ते बाकी राहिले. असले छिन्न पाकिस्तान जीनांना नको होते; पण देशाची फाळणी करायची तर प्रांताची फाळणी करावी लागेल ह्या निर्णयाबाबत काँग्रेस तडजोड करू शकणार नाही हे जीनांना माहीत होते. सबंध वांछित पाकिस्तान हवे असेल तर ते ब्रिटिशांच्या पाठिंब्यावरच मिळू शकेल, पण ब्रिटिश स्वतःच्या कारणांसाठी सत्तांतर करायला अधीर झाले आहेत ही परिस्थिती त्यांना दिसत होती.

३ जून १९४७ रोजी माउन्टबॅटन यांच्या पंजाब आणि बंगाल यांची फाळणी करून देशाची फाळणी करणाऱ्या व पाकिस्तानची निर्मिती करणाऱ्या योजनेला मान्यता देणारी भाषणे पंडित नेहरू व जीना ह्यांनी रेडिओवरून भारतीय जनतेला उद्देशून केली.

मागे वळून पाहता, द्विराष्ट्रवादाचा सिद्धांत जीनांनी एकाएकी निर्माण आणि प्रसृत केला असे मानणे गैर ठरेल. जीना द्विराष्ट्रवादाचे जनक नव्हेत. वरिष्ठ मुसलमानांत आपल्या धार्मिक व सांस्कृतिक अलगतेची भावना पहिल्यापासून होती. त्यांची पाळेमुळे जुन्या इस्लामी राजवटीत खोल गेलेली होती. त्यांची सत्ता, ऐश्वर्य, सामाजिक दर्जा ह्यांचा इस्लामी राजवट हा आधार होता. तो उलथून गेल्यावर त्यांनी ब्रिटिश राजवटीशी जुळवून घेतले. त्यांना भारतात लोकशाही नको होती, कारण तिच्यामुळे त्यांचे पारंपरिक विशेषाधिकार नष्ट होणार होते. ह्या बाबतीत त्यांचे व ब्रिटिशांचे हितसंबंध एक होते. म्हणून ब्रिटिशांनी मुस्लिम जातीयवादाला, अलगतेच्या भावनेला खतपाणी घातले आणि काँग्रेसच्या चळवळीला अटकाव करण्यासाठी तिचा उपयोग केला. मुस्लिम राजकारण हे लाचारीचे राजकारण होते; पुढारी ब्रिटिशांचे मिंधे होते.

१९३० पासून मुसलमानांत आधुनिक शिक्षणाचा पुरेसा प्रसार झालेला दिसतो. तेव्हा जुन्या जमीनदारी, जातीयवादी नेतृत्वाची जागा व्यावसायिक मध्यमवर्गीय, आधुनिक नेतृत्व घेईल, भारतीय राष्ट्रीयत्वाच्या व लोकशाहीच्या चौकटीत मुसलमानांनी आपले योग्य ते स्थान घ्यावे म्हणून प्रयत्न करील, मुस्लिम राजकारणाला विधायक वळण देईल अशी आशा होती. प्रथमपासूनच असा मतप्रवाह मुसलमानांत निर्विवादपणे होता व शेवटपर्यंत तो टिकून राहिला. पण तो नेहमीच क्षीण राहिला. हे का घडले ह्याचा शोध घ्यायचा तर मुस्लिम सांस्कृतिक परंपरेच्या वैशिष्ट्यांकडे वळावे लागेल.

ह्या संदर्भात जीनांची भूमिका विशेषेकरून ध्यानात घेतली पाहिजे. जीना आधुनिक, उदारमतवादी होते, हिंदू-मुस्लिम ऐक्याचे पुरस्कर्ते होते, त्यांचा विभक्त मतदारसंघाला विरोध होता, ते ब्रिटिश राजवटीच्या विरुद्ध होते, त्यांना भारतीय स्वातंत्र्य हवे होते असे म्हणण्यात येते. ह्या सर्व विधानांत तथ्य होते. पण उदारमतवादी लोकशाहीच्या विचारप्रणालीच्या अधिष्ठानावर जातीयवादी मुसलमानी नेतृत्वाला जीनांनी कधी विरोध केला नाही. जातीयवादी नेतृत्वाशी त्यांनी केवळ तडजोड केली नाही तर त्याच्या आश्रयाने आपले नेतृत्व त्यांनी टिकविले व वाढविले, अतिरेकी जातीयवादी मागण्यांचा ते सातत्याने पुरस्कार करीत राहिले. गांधीजींनी अंधश्रद्ध खिलाफती चळवळीला पाठिंबा दिला, घटनात्मक राजकारणाचा मार्ग सोडून जमावाचे राजकारण सुरू केले, म्हणून सेक्युलर जीना विटले व त्यांनी काँग्रेसचा त्याग केला असे अनेकदा म्हणण्यात येते; पण ते पूर्णपणे पोकळ आहे. जीना धर्मांध मुसलमानी नेतृत्वाबरोबर जन्मभर सुखाने

नांदले. लिबरल पुढाऱ्यांना गांधीजींच्या जमावाच्या राजकारणाचा मनापासून तिटकारा होता. त्यांनी ह्या कारणासाठी गांधीजींना अखेरपर्यंत तत्त्वनिष्ठ विरोध केला. उलट, जीनांनी जमावाचे विधिनिषेध-शून्य आणि अत्यंत निर्घृण असे राजकारण केले. जीनांची वैयक्तिक जीवनातील नेकी प्रसिद्ध आहे. ती त्यांच्या राजकीय जीवनात उतरली नाही. सोयीचे असेल तेव्हा त्यांनी असत्याचा आश्रय घ्यायला कमी केले नाही.

लोकशाही येणार हे स्पष्ट झाले तेव्हा जातीय-वादी मुस्लिम मागणीचे स्वरूप द्विराष्ट्रवादाला अनुसरून राहिले. मध्यवर्ती सत्तेत हिंदूंएवढी समान भागीदारी आणि मुसलमानांच्या बाबतीत हस्तक्षेप करण्यापासून राज्यसंस्थेला आडकाठी. म्हणजे मुसलमानांनी जी तडजोड केली ती ही की मुसल-मानांचे हिंदूंवर राज्य असणार नाही; तर भारता-वर मुसलमान व हिंदू या दोन जमातींचे मिळून राज्य असेल आणि शिवाय ह्या देशात मुसलमानांचे स्वतःपुरते स्वायत्त राज्यही असेल. ह्याचा अर्थ असा की केंद्रसरकारपासून खेडेगावापर्यंत द्विदल सत्ता असेल. भारत भौगोलिक दृष्ट्या अभंग राहिला असता; पण तेथे दोन राष्ट्रांची, दोन भिन्न सत्तांची वसती राहिली असती. द्विराष्ट्रवादाचा दुसरा आवि-ष्कार म्हणजे मुसलमानांचे अलग सार्वभौम राज्य होणे. जीनांनी दोन्ही पर्याय शेवटपर्यंत रेटले. दुसरा पर्याय कितीतरी कमी हानिकारक म्हणून काँग्रेसने स्वीकारला. काँग्रेसने फाळणी स्वीकारली याचे ज्यांना वाईट वाटते ते फाळणी टाळण्यासाठी मुस्लिम लीगने मागितलेली किंमत ध्यानात घेत नाहीत. किंवा फाळणी कोणत्या स्वरूपात स्वीका-रावी एवढाच काँग्रेसपुढे पर्याय होता हे त्यांना समजत नाही. कितीही बौद्धिक बावळटपणा अंगी असला तरी जीनांना फाळणी खरोखर नको होती, ते त्यांचे 'बार्गेनिंग काउन्टर' होते, काँग्रेसने ती त्यांच्यावर लादली असे कुणी म्हणू शकणार नाहीत. केवळ भोंदू माणसे असे म्हणतील. §

§ ह्या लेखात नमूद करण्यात आलेली माहिती डॉ. रफीक झकेरिया यांच्या 'राइज ऑफ् मुस्लिम्स इन् इन्डियन पॉलिटिक्स' (सोमैय्या पब्लिकेशन्स, मुंबई, १९७२) आणि श्री. वसंतराव नगरकर यांच्या 'जेनेसिस ऑफ् पाकिस्तान' (अलाइड पब्लिशर्स, मुंबई, १९७५) ह्या पुस्तकांवरून घेतली आहे. लेखातील जवळजवळ प्रत्येक वाक्याला ह्या दोन पुस्तकांचे पृष्ठ-संदर्भ द्यावे लागतील आणि तळ-टीपांची गर्दी अनावर होईल ह्या भयाने ह्या एकाच खुलासेवजा तळटीपेवर भागवावे असा संशोधकाला न साजेसा निर्णय मी घेतला आहे. लेख संशोधनात्मक नसून संकलनात्मक असल्यामुळे ह्या निर्णयाने फारशी हानी झालेली नाही असा भरवसा वाटतो. जिज्ञासू वाचकांनी ह्या दोन पुस्तकांचा अभ्यास करावा अशा योग्यतेची ती आहेत.

⊙ ⊙ ⊙

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष

अनुक्रमणिका